(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

मान्यता नसलेल्या स्टेंट्स बाजारात मिळत असल्याबाबत

(1) * 12750 डॉ. दीपक सावंत , श्री. अरविंद सावंत , श्री. अनंत तरे , श्री. विलास अवचट , डॉ. नीलम गोऱ्हे , श्री. मधुकर सरपोतदार , श्री. दिवाकर रावते : तारांकित प्रश्न क्र. 9356 ला दिनांक 12 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) हृदयविकारावरील शस्त्रक्रियेत लागणाऱ्या स्टेंट्स वापरण्यापूर्वी ड्रग कंट्रोल ऑफ इंडियांची नियमानुसार मान्यता न घेणाऱ्या मुंबईच्या शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत तसेच मान्यता नसलेले स्टेंट्स बाजारात मिळत असल्याबाबतच्या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याकरिता सेवानिवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(3) असल्यास, अहवालानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : (1) होय.

(2) नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) कार्यवाही सुरु आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या स्टेंट्स प्रकरणाच्या बाबतीत या सभागृहामध्ये तीन अधिवेशनांमध्ये चर्चा झाली. तारांकित प्रश्न क्रमांक 9356 हा दिनांक 12 डिसेंबर, 2005 रोजी विचारला गेला होता. त्यावेळी दिलेले उत्तर आणि आता दिलेले उत्तर यामध्ये काहीच फरक नाही. त्यावेळी जे उत्तर दिले होते तेच उत्तर आता दिलेले आहे. डॉ. बन्सल यांची चौकशी करण्यासाठी शासनाने जी समिती नेमली होती त्या समितीचा अहवाल अद्याप शासनाला का प्राप्त झालेला नाही ? शासनाला यामध्ये सभागृहाला आणखी काही माहिती द्यावयाची आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12750....

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ही समिती 18.11.2005 ला नेमलेली होती. सुरुवातीच्या काळामध्ये या समितीला एक महिन्याचा कालावधी दिलेला होता. परंतु जे न्यायाधीश या समितीवर काम करतात त्यांना चौकशीचा जो स्कोप दिलेला आहे तो लक्षात घेतल्यानंतर हे काम एक महिन्यात पूर्ण करणे शक्य नाही आणि यासाठी सहा महिन्यांची मुदत वाढवून द्यावी अशा प्रकारची त्यांनी विनंती केली आणि राज्य सरकारने ती विनंती मान्य केलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : शासनाचे हे उत्तर बरोबर आहे काय ? माझ्याकडे जी माहिती आहे ती वेगळी आहे. सभापती महोदय, मी आपल्या मार्फत सभागृहाला माहिती देऊ इच्छितो. ज्यावेळी ही समिती नेमली गेली त्यावेळी डॉ. बन्सल आणि त्यांचे सहकारी कोर्टात गेले आणि या समितीमध्ये काम करणारे जे डॉक्टर्स आहेत ते आपल्यापेक्षा ज्युनिअर आहेत आणि ते माझी चौकशी कसे करु शकतात ? यासंबंधी त्यांनी कोर्टात अपील केले. त्या अपिलाचा निर्णय गेल्या दहा दिवसांपूर्वी लागलेला आहे. त्या निर्णयासंबंधीची माहिती माननीय मंत्रिमहोदय सभागृहाला देतील काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये ज्यावेळी उत्तर दिले जाते त्यावेळी ते जबाबदारीनेच दिले जाते. ही वस्तुस्थिती आहे की, ज्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे त्यांनी या चौकशीसाठी मुदत वाढवून मागितलेली आहे. सन्माननीय सदस्य जी अधिकची माहिती सांगत आहेत त्याबाबत सांगू इच्छितो की, डॉ. बन्सल हे कोर्टामध्ये गेले आणि कोर्टाने इंटरिम ऑर्डर दिली आणि इंटरिम ऑर्डर दिल्यानंतर राज्य सरकारने त्या अनुषंगाने जी कृती करावयास पाहिजे ती केलेली आहे. परंतु त्याचा परिणाम या चौकशीवर होऊ शकत नाही. निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली ही समिती असल्यामुळे त्यांना तेवढा वेळ देणे अपेक्षित आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य शासन विचारात घेत नाही असे माझे मत बनले आहे. हृदयावरील शस्त्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असणारे जे स्टेंट्स आहेत ते बोगस मिळतात. ते चांगल्या क्वालिटीचे किंवा ज्याला सर्टिफाईड म्हणतो तसे किंवा ॲप्रूव्हड असे मिळत नाहीत यासबंधीचा हा प्रश्न आहे. हृदयावरील शस्त्रक्रिया मुंबई शहरामध्ये रोज होतात. त्यातील काही शस्त्रक्रिया यशस्वी होतात तर काही शस्त्रक्रिया अयशस्वी होतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र. 12750.... श्री. मधुकर सरपोतदार....

काही लोकांचा जीव जातो तर काही लोक वाचतात. त्यामध्ये आणखी या बाबीची भर पडत आहे. याचे गांभीर्य या शासनाला कळत नाही काय ? हृदयाच्या शस्त्रक्रियेसाठी जे स्टेंट्स वापरले जातात ते क्वालिटीचे असावेत असे शासनाला वाटत असेल तर ते आपण तपासून घ्यावे. याची चौकशी करण्यासाठी सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे. हा काय प्रकार आहे ? आपल्याकडे अनेक प्रकारची रुग्णालये आहेत, एक्स्पर्ट डॉक्टर्स आहेत त्यांना विचारा. त्यांचा सल्ला घेऊन आपण हा निर्णय घेऊ शकत नाही काय ?

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.12750 पुढे सुरु...)

श्री. दिलीप वळसे-पाटील : या प्रश्नातील संपूर्ण गांभीर्य शासनाला कळलेले असल्यामुळे यामध्ये थोडासा विलंब लागत आहे. विलंबाचे कारण असे आहे की, शासकीय रुग्णालयामध्ये जी स्टेंट्सची खरेदी झाली त्यामधून हा प्रश्न सभागृहासमोर आला. जी स्टेंट्स वापरली जातात ती सर्टिफाईड की नॉन-सर्टिफाईड वापरली जातात, त्यांची खरेदी कशी होते, सॅम्पल स्टेंट्स वापरली जातात काय ? यासंबंधीची चर्चा सभागृहामध्ये झाली. शासकीय रुग्णालयामध्ये स्टेंट्सच्या खरेदीमध्ये अनियमितता झालेली आहे हे शासनाने मान्य केल्यानंतर एक समिती नेमण्यात आली. या प्रकरणाची माहिती घेत असताना ही बाब निदर्शनास आलेली आहे की, ज्या स्टेंट्सच्या बाबतीत आपण प्रश्न उपस्थित केलेला आहे ती स्टेंट्स मुंबईतील अनेक हॉस्पिटलमध्ये वापरली जातात. त्यामुळे या प्रश्नाची व्याप्ती ही एखाद्या हॉस्पिटलपुरती मर्यादित राहात नाही. प्रश्नाची व्यापी वाढते. त्यामुळे ड्रग्ज कंट्रोल ॲक्ट, केन्द्र सरकारचा विभाग, राज्य सरकारचा विभाग या सर्व विभागांनी एकत्रितपणे चर्चा करुन समितीला जे टर्म्स ॲण्ड रेफरन्स दिलेले आहेत त्यामध्ये या प्रश्नाचा विचार करायला सांगितलेले आहे. हा प्रश्न शासनाने गांभीर्याने घेतलेला आहे. हा रुग्णांच्या जिविताचा तसेच आरोग्याचा प्रश्न आहे. त्यामुळे समितीला वेळे देणे आवश्यक आहे असे वाटते.

डॉ. एन.पी.हिराणी : हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे याबद्दल शंका नाही. या बाबतीत शासन योग्य ती उपाययोजना करीत आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. स्टेंट्स वापरणा-यांनी सरळ सरळ हृदयाला हात घातलेला आहे. हृदय रोगाच्या संदर्भात एक बायपास सर्जरी केली जाते आणि दुसरी एन्जोप्लास्टी केली जाते. एन्जोप्लास्टीमध्ये ही स्टेंट्स वापरली जातात. बाजारात असलेली स्टेंट्स कशा प्रकारची आहेत ? स्टेंट्सच्या किंमती काय आहेत ? कोण कशा प्रकारची स्टेंस्टस वापरतात ? इत्यादी बाबतीत शासनाचे नियंत्रण आहे की नाही याबद्दल मला शंका आहे. जर एखादे औषध सब-स्टॅण्डर्ड अथवा स्प्युरिअस असेल तर मॅन्युफॅक्चरर किंवा ते औषण विकणा-या दुकानदाराला अटक होते त्याप्रमाणे ही सब-स्टॅण्डर्ड स्टेंट्स वापरली जात असतील तर त्यावर शासनाचे नियंत्रण आहे काय ? असेल तर अशा प्रकारची स्टेंट्स बाजारात कशी येतात ?

श्री दिलीप वळसे-पाटील : वेगवेगळया रुग्णालयांमध्ये स्टेंट्स वापरली जातात. त्याबाबतीत सर्वेक्षण करण्याची एक पध्दत असून त्यामध्ये केन्द्र आणि राज्य सरकारची यंत्रण काम करते. दोन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.12750 पुढे सुरु...) (श्री. दिलीप वळसे पाटील...)

यंत्रणांच्या मार्फत जी स्टेंट्स सर्टिफाइड केलेली आहेत तीच वापरली जावीत अशी अपेक्षा आहे. जेव्हा मुंबईतील एका शासकीय रुग्णालयामध्ये वापरली जाणारी स्टेंट्स सर्टिफाईड नसल्याचे निदर्शनास आले आणि त्यासंबंधी तक्रार झाली त्यावेळी हा प्रश्न समोर आला. एफडीअे आणि केन्द्र सरकारचे म्हणणे वेगळे आहे आणि आपले म्हणणे वेगळे आहे. सर्टिफाईड केलेले, अॅप्रुव्हड केलेले स्टेंट्स वापरले पाहिजेत ही शासनाची भूमिका असून शासकीय आणि अन्य रुग्णालयांमध्ये याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासन विचार करीत असून शासन तशी कारवाई करील.

...नंतर श्री. कानडे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12750 पुढे सुरु ...

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहामध्ये आता माहिती देताना असे सांगितले की, डॉ.बन्सल यांची चौकशी करण्यासाठी निवृत्त न्यायाधिशांची चौकशी समिती नेमली आहे. या समितीला अहवाल देण्यासाठी एक महिन्यांचा कालावधी दिलेला होता. मध्यंतरीच्या काळामध्ये कोर्टातून अंतरिम आदेश दिलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, कोर्टातून निश्चित कोणत्या प्रकारचे आदेश आलेले आहेत ? तसेच चौकशी समिती नेमली आहे त्या समितीचा चौकशी अहवाल किती दिवसात प्राप्त होणार आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, चौकशी समितीला अहवाल सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदत वाढवून दिलेली आहे. अहवाल सादर झाल्यापासून एक महिन्यांच्या आत शासन त्यावर निर्णय घेईल. कोर्टाचे जे इंटरिम आदेश होते त्यामध्ये समितीचे सदस्य,त्यांची ज्येष्ठता याबाबत हरकत घेण्यात आली होती. फायनल ऑर्डर्स कोर्टाने दिलेल्या नाहीत. कोर्टाच्या इंटरिम ऑर्डर्स प्रमाणे शासनाने योग्य तो निर्णय घेतलेला आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या माध्यमातून जनतेच्या हृदयालाच हात घातलेला आहे. त्यामुळे अत्यंत महत्वाच्या अशा या प्रश्नाच्या बाबतीत माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, हृदयविकारावरील शस्त्रक्रियेमध्ये अँजिओप्लॅस्टी करताना जे स्टेंट्स वापरले जातात त्याबाबतीत तक्रारी आल्या होत्या आणि त्या तक्रारींमध्ये असे म्हटले होते की, अँजिओप्लॅस्टी करताना विशिष्ट मेडिकल शॉपमधून विशिष्ट प्रकारचे स्टेंट्स वापरले जावेत अशा प्रकारचे निर्देश दिले जातात. शासकीय रुग्णालयांमधून किंवा राज्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या शस्त्रक्रिया होत असतील त्या ठिकाणी ज्या स्टेंट्स वापरल्या जातात त्या सर्टिफाईड असतात. परंतु सर्टिफाईड केलेल्या स्टेंट्स जर सबस्टँडर्ड असतील तर अशा प्रकरणात शासन संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, हा अतिशय जनरल प्रश्न आहे. सभागृहासमोर जो प्रश्न आहे तो याप्रकरणी चौकशी करणसाठी जी समिती नेमली आहे त्या समितीचा अहवाल किती दिवसात येणार आहे आणि शासन त्याबाबतीत केव्हा निर्णय घेणार आहे ? खाजगी रुग्णालयांमध्ये काय होते हे मला माहीत नाही. परंतु शासकीय रुग्णालयांमध्ये स्टेंट्स खरेदीची पध्दत आहे. सगळया कंपन्यांचे सर्टिफाईड स्टेंट्स असतात. रुग्णालयात स्टॉक

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12750

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

असतो. कुठल्या कंपनीचे स्टेंटस् घ्यावयाचे आणि त्याची किंमत याबाबतीत पेशंटच्या नातेवाईकांना विचारले जाते. स्टेंट्सची अंतिम पसंती पेशंटचे नातेवाईक ठरवीत असतात.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी दिलेल्या उत्तरामध्ये विसंगती दिसते आहे. कोर्टाचे इंटरिम आदेश आलेले आहेत त्यामध्ये सर्टिफाईड स्टेंट्स वापरु नका असे आदेश आहेत काय ? चौकशी अहवाल येण्यासाठी सहा महिन्यांची मुदत वाढवून दिली आहे आणि अहवाल आल्यानंतर शासन एक महिन्यात त्यावर निर्णय घेणार आहे असे मंत्रीमहोदयांनी सांगितले. हायकोर्टाने जे आदेश दिलेले आहेत त्यामध्ये फक्त सर्टिफाईड स्टेंट्स वापरा अन्य कुठलेही वापरु नयेत असे म्हटले आहे काय ? मंत्रीमहोदय ज्या पध्दतीने उत्तरे देत आहेत त्यामुळे गोंधळ उडतो. स्पेसिफिक प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर द्यावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये सर्टिफाईड स्टेंट्स वापराव्यात अशा सूचना आहेत. सर्टिफाईड स्टेंट्स वापरली नाही म्हणून तक्रार आल्यानंतर चौकशी समिती नेमली. आता शासकीय रुग्णालयांमध्ये सर्टिफाईड स्टेंट्सशिवाय दुसरी स्टेंट्स वापरीत नाहीत.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैं माननीय मंत्री महोदय से पूछना चाहती हूँ कि जो चौकशी समिति बनाई गई है, उसका स्कोप क्या है, उसके अहवाल में आपको क्या अपेक्षित है ? क्या इस समिति को पहले चरण में केवल सरकारी रुग्णालयों के बारे में अहवाल सादर करने के लिए कहा गया है ? क्या यह समिति शासकीय रुग्णालयों के अलावा प्राईवेट रुग्णालयों के बारे में भी जांच करेगी ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापति महोदय, मैंने साफ साफ बताया है कि इस समिति को इन्क्वायरी के लिए 6 महीने का समय दिया गया है और रिपोर्ट आने के बाद शासन एक महीने के अन्दर एक्शन लेगा. इस समिति के टर्म्स एन्ड रिफरेंसस का जी.आर. मैं सभागृह के पटल पर रख दूंगा.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : माननीय मंत्री महोदय या ठिकाणी जे उत्तर देत आहेत ते सभागृहाची दिशाभूल करणारे आहे. मी जबाबदारीने सांगू इच्छितो की, आपल्याकडे हया स्टेंट्स तपासण्यासाठी कुठलीही यंत्रणा नाही. साधे इंट्रा-व्हेन्स कार्डुल तपासण्यासाठी देखील यंत्रणा नाही. जे इक्विपमेंट मिळते ते खरेदी केल्याचे फक्त सर्टिफिकेट पाहिले जाते आणि डॉक्टरच्या हाती देतात आणि ते बरोबर आहे की नाही हे सांगतात, त्याची सायंटिफिक तपासणी करण्यासाठी वेगळी कुठलीही यंत्रणा आपल्याकडे नाही. फक्त मॅन्युअली सर्टिफिकेट तपासू शकतात पण खरोखरच चांगल्या प्रकारची आहे की नाही, केमिकली आणि त्याचे जे नॉर्म्स आहेत ते तपासण्यासाठी यंत्रणा आहे काय ? दुसरे म्हणजे ही चौकशी एक महिन्यात पूर्ण करण्याचे आदेश शासन या समितीला देणार काय ? कारण गेल्या आठ महिन्यापासून हा प्रश्न समोर आला आहे, त्याला एक वर्ष होईल आणि त्यामुळे यातील गांभीर्य निघून जाईल. फक्त डॉ. बन्सल यांना सस्पेंड करुन चालणार नाही तर त्यांना काढून टाकले पाहिजे. कारण माणसाच्या आरोग्याशी खेळणाऱ्या लोकांना शासनाने पाठीशी का घालावे ? याबाबत शासनाने स्पष्टीकरण करावे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, येथे सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रश्नच नाही. कारण यासंदर्भातील सर्टिफिकेशनची जी प्रक्रिया आहे ती फुड अँड ड्रग्ज ॲडमिनिस्ट्रेशनच्या माध्यमातून, Either it is a State or Central Government, त्यांच्या मार्फत या सर्व कंपन्यांना आपले सर्टिफिकेशन करुन घ्यावे लागते. ज्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या स्तरावरील संस्थांनी सर्टिफाईड केलेले आहे, अशा संस्था आलेला प्रत्येक आयटेम जो असतो त्यासाठी जी प्रचलित पध्दती राज्यभर आणि देशभर आहे त्याप्रमाणे सर्टिफाईड करतात. त्यापेक्षा वेगळी पध्दती जर सन्माननीय सदस्यांना अपेक्षित असेल तर Let us have a separate discussion on this subject. Let us all sit together and come out with the solution. तसेच दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात मी असे स्पष्ट करु इच्छितो की, न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली ही समिती असल्यामुळे तसेच त्यांनी लेखी स्वरुपात आपल्याला कालावधीबाबत दिलेले असल्यामुळे त्यांना एक महिन्यात अथवा पंधरा दिवसात अहवाल देण्याबाबत सांगणे उचित ठरणार नाही. त्यांना जेवढा वेळ अपेक्षित आहे तेवढा वेळ आपण दिला पाहिजे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ससून रुग्णालय (पूणे) येथील वैद्यकीय अधिक्षक यांना
लाच स्विकारतांना पकडल्याबाबत

(2) * 15735 **श्री. धोंडीराम राठोड , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत , श्रीमती सुधा जोशी , श्री. यशवंतराव गडाख , श्री. सुधाकर गणगणे , श्री. नतिकोद्दीन खतिब , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. शिवाजी पाटील** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पूणे येथील ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक यांनी दिनांक 5 फेब्रुवारी, 2006 रोजी वा त्या सुमारास वैद्यकीय प्रमाणपत्र देण्यासाठी दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वैद्यकिय अधिकारी यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, डॉ. विमल मुंदडा यांच्याकरिता : (1) सदर वैद्यकीय अधिक्षकास दिनांक 5 जानेवारी,2006 रोजी ॲन्टी करप्शन ब्यूरोने पकडले आहे.

(2), (3) व (4) सदर प्रकरणी ॲन्टी करप्शन ब्युरोकडून तपास सुरु आहे. तसेच संबंधित वैद्यकीय अधिक्षकांना दिनांक 16/1/2006 रोजी शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

श्री. धोंडीराम राठोड : महोदय, या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्यामुळे माझे समाधान झाले असल्याने मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, केवळ ससून रुग्णालयातच नव्हे तर अशी प्रकरणे राज्यात नेहमीच घडत असतात. विशेष करुन जिल्हा परिषद आरोग्य विभागामध्ये जे प्राथमिक आरोग्य केंद्रावरील डॉक्टर्स असतात त्यांच्या बाबतीत मोठया प्रमाणावर लोकांच्या तक्रारी येत असतात. हे डॉक्टर्स त्या भागातील लोकांना वैद्यकीय सर्टिफिकेट्स देण्यास टाळाटाळ करतात. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, याबाबतीत संपूर्ण राज्यात चौकशी होणे आवश्यक आहे व आपले खाते कसे काम करीत आहे हे पाहिले पाहिजे. दुसरे म्हणजे प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जे डॉक्टर्स असतात त्यांना खाजगी व्यवसाय करण्यासाठी परवानगी दिलेली आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : महोदय, या प्रश्नातील गांभीर्य असे आहे की, ससून रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकांनी वैद्यकीय प्रमाणपत्र देतांना काही हजार रुपयाची लाच स्वीकारली. अलिकडच्या काळात सिव्हील सर्जन, उप संचालक, सार्वजनिक आरोग्य अथवा वैद्यकीय अधीक्षक असोत या क्षेत्रात भ्रष्टाचाराची बजबजपुरी माजलेली आहे, त्याच्याशी निगडीत हा प्रश्न आहे.

यानंतर श्री. भारवि .....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15735...

प्रा.जोगेंद्र कवाडे...

येथे एकच उदाहरण असले तरी आज वैद्यकीय क्षेत्रामध्ये बजबजपुरी निर्माण झाली आहे. त्यावर कठोर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनातर्फे प्रयत्न केले जाणार आहेत काय ? असा माझा प्रश्न आहे. प्रश्न क्रमांक 2,3 आणि 4 च्या संदर्भात ॲन्टी करप्शन ब्युरोकडून तपास चालू आहे, असे लेखी उत्तर शासनातर्फे देण्यात आले आहे. ॲन्टी करप्शन ब्युरोच्या चौकशीमध्ये काय आढळून आले आहे, याचे उत्तर शासनाने दिलेले नाही. ॲन्टी करप्शन ब्युरोच्या चौकशीमध्ये खरोखर लाच घेतल्याचा प्रकार आढळून आला आहे काय ? याचा खुलासा शासनाने करावा.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, ॲन्टी करप्शन ब्युरोचा तपास अंतिम टप्प्यवर आलेला आहे. पैसे घेताना शिपायाला पकडण्यात आले आहे. यासंबंधीचा अहवाल येत्या 10-15 दिवसात ॲन्टी करप्शन ब्युरोकडून येणार आहे. तो आल्यानंतर विभागीय चौकशी सुरू करू किंवा गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करू.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जर स्पेसिफिक केस सांगितली तर त्यावर निश्चित कारवाई करण्यात येईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, प्रतिष्ठित अशा वैद्यकीय व्यवसायामध्ये उच्च शिक्षित डॉक्टरांनी गरीब आणि गरजू लोकांकडून वैद्यकीय प्रमाणपत्र देण्याकरिता लाच घेणे ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. हे राज्यात घडलेले एकच उदाहरण आहे असे नाही. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे म्हणाले ते खरे आहे की, आपल्या राज्यात अशी अनेक उदाहरणे आहेत.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपला प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15735 ...

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, ॲन्टी करप्शन ब्युरोकडून डॉक्टरांची चौकशी होत आहे. लाच प्रकरणात डॉक्टरांना पकडल्यामुळे त्यांना दिनांक 16.1.2006 रोजी निलंबित करण्यात आले आहे. तेव्हा त्यांच्या जागी पर्यायी वैद्यकीय अधीक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे काय ? असल्यास, तेथे नेमण्यात आलेल्या डॉक्टरांनी असे काही कृत्य केले आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, वैद्यकीय अधीक्षकांच्या जागी दुसऱ्या वैद्यकीय अधीक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे.

...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

व्ही.जे.टी.आय या संस्थेतील संचालकांनी संस्थेच्या कारभारात केलेली अनियमितता

(३) * १२८०९ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , श्रीमती संजीवनी रायकर : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्ही.जे.टी.आय या स्वयंपूर्ण संस्थेतील संचालकांनी संस्थेच्या कारभारात अनेक प्रकरणात अनियमितता केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत सदर संस्थेच्या कर्मचारी संघटनेने शासनाकडे तक्रार केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार ज्या संचालकांनी गैरकारभार केला आहे त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री.सुरेश शेट्टी, श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता: (१) काही प्रकरणी कार्यवाही करताना प्र. संचालकांनी विहीत कार्यपध्दतीचा तंतोतंत वापर केला नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) संस्थेच्या प्रभारी संचालकांकडून अतिरिक्त कार्यभार काढून तो प्रथम संस्थेतील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. लांडे यांच्याकडे सूपूर्द करुन तद्नंतर संस्थेत नियमित संचालकांची नियुक्ती केली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, व्ही.जे.टी.आय.ला भारत सरकारच्यावतीने आतापर्यंत किती रुपयांची केंद्रीय मदत देण्यात आली आहे ? डॉ.कृष्णा नारायण केळकर यांची व्ही.जे.टी.आय.च्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना पगारापोटी मूळ वेतन म्हणून रुपये 2500/- अधिक विशेष भत्ता रुपये 25000/- अधिक घरभाडे भत्ता रुपये 11000/- असे मिळून रुपये 70 ते 80,000/- देण्यात येतात. संचालकासारख्या पदाला एवढा पगार आणि भत्ता शासन का देत आहे ?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, राज्यातील तांत्रिक आणि शैक्षणिक संस्थाना एक्सलन्सी प्राप्त होण्याच्या दृष्टीने स्वायत्ता देण्यात आलेली आहे. व्ही.जे.टी.आय., यु.डी.सी.टी., नांदेड, पुणे येथील इंजिनिअरिंग कॉलेजचा दर्जा वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. यासाठी आपण जागतिक बँकेबरोबर करार केला आहे. या सगळया फिल्डसाठी आपल्याला जागतिक बँकेकडून गुंतवणुकीसाठी निधी मिळतो. तो आपल्याला मिळण्याससुध्दा सुरूवात झालेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12809....

श्री.दिलीप वळसे-पाटील....

म्हणून व्ही.जे.टी.आय. च्या संचालकांच्या पोस्टचा दर्जा आय.आय.टी. बरोबरचा व्हावयाचा असेल तर तेथील डायरेक्टर हे देखील त्याच दर्जाचे असले पाहिजे. या क्षेत्रात चांगले लोक आले पाहिजेत. वास्तविक पाहता डायरेक्टरच्या सेवा आणि शर्ती ठरविण्याचे अधिकार बोर्ड ऑफ गव्हर्नन्स यांना आहेत आणि त्यांनीच यासंदर्भात निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे यामध्ये अनुचित असे काही घडलेले नाही.

श्री.विनोद तावडे : या संस्थेला जागतिक बँकेकडून किती निधी मिळाला ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : जागतिक बँकेकडून या संस्थेला 22.50 कोटी रुपये मिळालेले आहेत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने शासनाने मान्य केले आहे की, काही प्रकरणी कार्यवाही करताना प्रभारी संचालकांनी विहीत कार्यपध्दतीचा तंतोतंत वापर केला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. माझा प्रश्न आहे की, कोणत्या बाबतीत अशा प्रकारची अनियमितता झाली आहे आणि त्याचे स्वरुप काय आहे ? तसेच त्या सचालकांवर काय कारवाई करण्यात आली आहे ? कारण उत्तरामध्ये संस्थेच्या प्रभारी संचालकांकडून अतिरिक्त कार्यभार काढून घेण्यात आला आहे असे म्हटले आहे. त्यामुळे केवळ कार्यभार काढून घेणे कारवाई होत नाही, म्हणून या प्रकरणी शासनाकडून कोणती स्पेसिफिक कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्यामध्ये चार-पाच बाबी अंतर्भूत आहेत. प्रभारी संचालकांनी कन्सलटंटची अपॉईंटमेंट करताना आणि टेंडर देताना जे नियम आहेत ते फॉलो केले नव्हते. अकाऊंटस डिपार्टमेंटच्या एका व्यक्तीने मिस ॲप्रोप्रिएशन केल्यावरही प्रभारी संचालकांनी त्या व्यक्तीवर कसल्याही प्रकारची कारवाई केली नसल्यामुळे, प्रभारी संचालकांवर कारवाई करण्याचे आम्ही ठरविले होते. परंतु प्रभारी संचालिका श्रीमती दिक्षित यांनी सेवानिवृत्ती घेतल्यामुळे त्यांच्या जागी दुसऱ्या संचालकांना नेमण्यात आले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : तक्रार कोणत्या संघटनेने केली होती ? तसेच त्यांनी केलेल्या तक्रारींची चौकशी कोणी केली ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12809....

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, भारतीय कामगार सेनेच्या वतीने या अनियमिततेसंदर्भात निवेदन देण्यात आले होते. या निवेदनात श्रीमती दिक्षित यांच्यावर आरोप करण्यात आले होते. त्यानंतर या आरोपांची चौकशी तंत्रशिक्षण विभाग संचालनालयाच्या माध्यमातून झाली आहे. जोपर्यंत या संस्थेला ॲटोनॉमी दिली नव्हती तोपर्यंत त्याचे संपूर्ण व्यवहार तंत्रशिक्षण आणि राज्य शासनामार्फत केले जात होते. आतापर्यंत व्ही.जे.टी.आय. या संस्थेला जागतिक बँकेच्या माध्यमातून 22.50 कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. संस्थेच्या ज्या प्रभारी संचालिका होत्या त्या निवृत्त झालेल्या आहेत. या संस्थेला ॲटोनॉमी दिल्यानंतर संस्थेमध्ये संचालकाची पोस्ट क्रिएट केली. त्यामुळे रेग्युलर संचालक नियुक्त होईपर्यंत श्रीमती दिक्षित यांच्याकडे प्रभारी कार्यभार दिला होता. परंतु त्यांच्यावर टेंडर काढण्याच्या संदर्भात अनियमितता, तसेच काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या करणे या संदर्भात त्यांच्यावर आरोप करण्यात आले होते. या सर्व बाबी समोर आल्यानंतर श्रीमती दिक्षित यांच्याकडून चार्ज काढून तो संस्थेतील वरिष्ठ प्राध्यापक डॉ.लांडे यांच्याकडे देण्यात आला आहे. आता रेग्युलर संचालकांची नियुक्ती झाली असल्यामुळे डॉ.लांडे यांच्याकडे असलेला चार्ज संपुष्टात आला आहे. या संदर्भात बोर्ड ऑफ गव्हर्नन्स यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, या संस्थेमध्ये 2001 सालापासून अनियमितता सुरु आहे. 2002 मध्ये या संस्थेने एक परिसंवाद आयोजित केला होता. परंतु निधी मात्र कॉलेजच्या नावावर जमा करण्यात आला नाही. जो निधी जमा झाल्या त्यापैकी दोन लाख रुपये खर्च झाला असून, दीड लाख रुपये संस्थेने अवांतर कामावर खर्च केले आहेत. या संस्थेने पावत्यांची खाजगी पुस्तके सुध्दा छापलेली होती. त्यातच या संस्थेला जागतिक बँकेकडून 15 कोटी रुपये मिळाले होते. परंतु संस्थेकडे या रकमेचा सुध्दा व्यवस्थित हिशेब नाही.

नंतर श्री.कांबळे....

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12809 ....

श्रीमती संजीवनी रायकर ....

आपण किती गुळमुळीतपणे हे सांगितले आहे. सभापती महोदय, त्या क्लर्कने 10 लाख रुपये खाल्लेले आहेत. त्याचप्रमाणे या संदर्भातील एफ.आय.आर. देखील वेळेवर दाखल करण्यात आलेला नाही. सभापती महोदय, दुसरे म्हणजे, आपण कॉंट्रॅक्ट बेसिसवर असणाऱ्या त्या संचालकांना पगार म्हणून 83 हजार रुपये देतो आहोत आणि हा पैसा शासनाचाच आहे. आपण साबुसिद्दिक पॉलिटेकनिकची स्वायत्तता काढली. या स्वायत्त संस्था कशाप्रकारे वागायला लागल्या आहेत याचा आपण रिव्ह्यू समिती नेमून विचार केला पाहिजे असे मला वाटते. तरी, शासन त्याप्रमाणे करणार आहे का ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देण्याचा निर्णय घेतल्यानंतर आणि बोर्ड ऑफ गव्हर्नन्सची त्या ठिकाणी नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या कुठल्याही कारभारामध्ये राज्य सरकारमार्फत किंवा अन्य कोणा यंत्रणेमार्फत ढवळाढवळ करणे योग्य नाही. त्या संस्थांना संपूर्ण अधिकार दिलेले आहेत. फक्त राज्य सरकारचा निधी खर्च करण्याचाच अधिकार त्यामध्ये नाही तर त्यांनी स्वत: देखील निधी उभा करावयाचा आहे. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, डॉ. माशलकर यांना आपण यू.डी.सी.टी च्या अध्यक्ष पदावर नेमले. त्यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांना एकत्र करुन 8 कोटी रुपये बाहेरुन गोळा करुन गुंतवणूक केली. आपण त्यासाठी बजेटमध्ये फार मोठी प्रोव्हिजन देऊ शकत नसताना दुसऱ्या बाजुला वर्ल्ड बँकेकडून पैसे मिळविणे किंवा आणखी काही मार्गाने पैसे उभे करुन सेंट्रल ऑफ एक्सिलेन्स तयार करणे या सगळया बाबींची जबाबदारी आपण त्यांच्यावर टाकलेली आहे. जुन्या काळात ज्या घटना घडल्या असतील, त्या घटनांच्या संदर्भात शासनामधील जी ऑडीटची, सी.ए.जी.ची किंवा ए.जी.ची जी प्रोसेस आहे, त्यामध्ये जे कर्मचारी दोषी आढळतील त्यांच्यावर आपण नेहमीच कारवाई करत असतो.

श्रीमती संजीवनी रायकर : आपण त्यावर रिटायर्ड लोकांनाच का नेमता ?

(उत्तर आले नाही.)

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12809 ....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, सेंट्रल गव्हर्नमेंटच्या डायरेक्ट असिस्टंटमधून साडे पाच कोटी रुपये आलेले असून बाकीचे पैसे अजून यावयाचे आहेत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, वर्ल्ड बँकेच्या माध्यमातून व्ही.जे.टी.आय. ला 22 कोटी रुपये आलेले आहेत आणि संपूर्ण राज्याला एकूण 168 कोटी रुपये आलेले आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, त्यामध्ये ॲकॅडेमिक एक्सिलेन्सवरील खर्च आहे, हे मी समजू शकतो. तेथील स्थितीचे काही फोटो मी आपल्याकडे पाठवितो. 22 कोटी रुपये आल्यानंतर ॲकॅडेमिक एक्सिलेन्स गाठण्यासाठी आपल्याला 83 हजार रुपये पगार घेणारा डायरेक्टर असला पाहिजे. ते आता आय.आय.टी.तून लीनवर येणार आहेत. ते महिन्याच्या कॉंट्रक्टवर असून त्यांचे 6 महिने अजून शिल्लक आहेत. नाही पटले तर ते परत जातील. आपण हा सर्व खर्च करत आहात. परंतु आपण तेथील वर्गांची आणि लॅबोरेटरीची अवस्था पाहिली आहे का ? त्यावर कोणी नियंत्रण ठेवणारे आहेत का ? सभापती महोदय, हे 22 कोटी रुपये व्ही.जे.टी.आय.ची दुरुस्ती करण्यासाठी कधी पर्यंत खर्च होतील ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्यामध्ये तथ्य आहे. शासनाच्या आणि राज्याच्या दृष्टीकोनातून ज्या महत्वाच्या संस्था आहेत, मग त्यामध्ये व्ही.जे.टी.आय., यू.डी.सी.टी, इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, इंजिनिअरिंग कॉलेज आहेत, यामध्ये ज्या प्रमाणात गुंतवणूक व्हायला पाहिजे तेवढी होत नसल्यामुळे या संस्थांना अशी अवस्था प्राप्त झालेली आहे. सभापती महोदय, 22 कोटी रुपये आले असून ते खर्च करताना 1 छोटीशी गडबड झालेली आहे. त्या गडबडीमध्ये डायरेक्ट अफरातफर असे काही नाही फक्त नियमातील अनियमितता आहे. म्हणजे ग्लोबल टेंडर काढायचे की लोकल टेंडर काढायचे, त्या संस्थांचे अधिकार काय आहेत याबाबत गडबड झालेली आहे. मी फक्त ॲकॅडेमिक एक्सिलेन्सचीच चर्चा करत नाही तर माझी अशी खात्री आहे की, या संस्थांना वेळेवर पैसे मिळून त्या पैशांचा उपयोग संस्थांचा दर्जा सुधारणामध्ये होईल. त्याचप्रमाणे सभापती महोदय, इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये सुधारणा करण्यासाठीही हे पैसे मिळणार आहेत. यामधून या सर्व संस्था पुन्हा एकदा नावारुपाला आणण्याचाच आपला प्रयत्न

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

राहणार आहे. सर्वच संस्थांना पैसे आलेले आहेत. ते पैसे टाईमबाऊंड खर्च करण्याबाबत बोर्ड ऑफ गव्हर्नन्सला सूचना देण्यात येतील व हे पैसे खर्च झाल्यानंतर त्या पुढील पैसे मिळण्याबाबत प्रयत्न केला जाईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, जेवढे पद मोठे तेवढी अनियमितता मोठी असे चित्र आज येथे दिसत आहे. व्ही.जे.टी.आय. ही संस्था राज्यातीलच नव्हेतर देशातील अत्यंत ख्यातीप्राप्त अशी स्वायत्त संस्था आहे. या स्वायत्त संस्थांचे नियंत्रण कदाचित राज्य सरकारकडे येत नसेल. परंतु त्यांची अकाऊंटीबिलीटीचे काय ? सभापती महोदय, आता प्रामुख्याने आर्थिक अनियमितता इ ाल्याबाबत चर्चा करण्यात आली.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12809...

प्रा. जोगेंद्र कवाडे...

परंतु त्या संस्थामध्ये काम करणारे कर्मचारी, तेथे काम करणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक, ग्रंथपाल, सहाय्यक प्राध्यापक, सहाय्यक ग्रंथपाल यांच्या नेमणुकीबाबत सुध्दा अनियमितता झालेली आहे. त्या संदर्भात राज्यशासनाने कशा पध्दतीने उपाय योजना केलेली आहे याबाबतचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा असा माझा प्रश्न आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, व्ही.जे.टी.आय. ही स्वायत्त संस्था आहे. तेथील नियुक्त्या करण्याचे अधिकार बोर्ड ऑफ गर्व्हनन्स् यांना आहेत. त्यांच्या नियुक्त्या आपल्या पध्दतीने ते करीत असतात. या विभागाच्या प्रधान सचिवांना त्यांचा रिपोर्ट सादर करण्यात येतो. या संस्थामध्ये अशा प्रकारे अनियमितता घडू देणार नाही असे प्रयत्न करण्यात येत आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या मुंबई शहरामध्ये वीर माता जिजाऊ तांत्रिक संस्था व दुसरी सरदार पटेल अभिनव महाविद्यालय हया दोनच संस्था इंजिनिअरिंगच्या सुरुवातीला होत्या. आता यामध्ये खाजगी संस्थाची भर पडत आहे. या संस्थाच्या संदर्भातील मूळ प्रश्न बाजूला राहिला आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, तेथील अधिकारी व कर्मचारी यांनी बदल्यांच्या संदर्भात मिस-ॲप्रोप्रिएशन केलेले आहे, असा त्यांच्यावर आरोप आहे. तसचे टेंडरची फाईल ही कंत्राटदारांना दिलेली आहे अशा ज्या अनियमितता ज्या अधिकाऱ्यांकडून झालेल्या आहेत त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आलेली आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सदर अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे व आता तो फरार आहे.

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हाफकीन संस्थेमध्ये साप व विंचू यांच्या विषावरील औषधी म्हणून उत्पादीत होणाऱ्या लसीबाबत

(४) * १५५९५ श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जितेंद्र आव्हाड : दिनांक १६ डिसेंबर, २००५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक १९ डिसेंबर, २००५ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक ९५१९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साप आणि विंचवांच्या विषावर उतारा म्हणून प्रतिजैविकांची निर्मिती करण्यासाठी मुंबईतील हाफकीन मधील विषाचा साठा संपत आला आहे, तसेच संशोधनासाठी लागणारा साप, विंचू पकडण्यासाठीचा परवाना मिळावा यासाठी सुमारे तीन वर्षापूर्वी वनविभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे व त्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेता आवश्यक ती उपाययोजना करणेसाठी लवकरात लवकर कार्यवाही व्हावी यासाठी कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : (१) प्रतिजैविकांची निर्मिती करण्यासाठी हाफकिन महामंडळात विषाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

साप,विंचू पकडण्यासाठीचा परवाना देण्याबाबतचा हाफकिन संस्थेचा प्रस्ताव वन विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

(२) व (३) साप, विंचू पकडण्यासाठीचा परवाना देण्याबाबतचा हाफकिन संस्थेचा प्रस्ताव वन विभागाकडे विचाराधीन आहे, वन विभागाकडे याबाबत पाठपूरावा करण्यात येत आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, साप आणि विंचू पकडण्यासाठीचा परवाना देण्याबाबतचा प्रस्ताव वन विभागाकडे पाठविलेला आहे. तो कधी पाठविलेला आहे व तो केव्हापासून प्रलंबित आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, उत्तरामध्ये सुधारणा आहे " हाफकिन संस्थेचा प्रस्ताव वन विभागाकडे विचाराधीन आहे" या ऐवजी " वन विभागाने निर्णय घेतलेला असून सदर ऑर्डर निर्गमित करण्यात आलेल्या आहेत " असे वाचावे.

.....3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15595...

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, सदरच्या ऑर्डर कधी निघाल्या आहेत मुंबईच्या जवळपासच्या शहरामध्ये काही एनजीओ साप पकडण्याचे काम करीत असतात. पंरतु साप म्हटले की सर्व माणसे घाबरतात. परंतु वन विभागाचे कर्मचारी एनजीओ यांनी साप पकडला तर त्यांना ते त्रास देतात, सर्प मित्रांना त्रास देत असतात, ठाणे मुंबई परिसरामध्ये जी जंगले आहेत तेथे हे घडत आहे. यासंदर्भातील माहिती सादर झालेली आहे काय ? तसेच साप व विंचू चावल्यानंतर त्यास प्रतिजैविकांची निर्मिती आपणाकडे किती प्रमाणात उपलब्ध आहेत.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भात वन विभागाने 16 मार्च, 2006 रोजी शासन निर्णय काढलेला आहे. त्यासंदर्भातील शासन निर्णय माझ्याकडे आहे. वन विभागाने यामध्ये काही निर्णय घ्यावयाचे होते त्यासाठी वेळ लागणार होता. त्यासंदर्भात आम्ही प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करीत होतो. आज प्रश्न चर्चेला येण्यापूर्वी वन विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. यासंदर्भात त्यांचे अभिनंदन आपण केले पाहिजे. हा प्रश्न ज्यांनी विचारला त्यांचे सुध्दा मी आभार मानतो. वन विभागाच्या संदर्भातील प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. वन विभागाच्या वतीने मी उत्तर देणे योग्य होणार नाही.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15595

श्री.जी.एल. अैनापुरे : या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी विषाचा साठा पुरेसा उपलब्ध असल्याबाबत सांगितले आहे. गेल्या 5 महिन्यांपूर्वी आजारी असलेल्या एका कुटुंबाला त्या औषधाची आवश्यकता असताना वेळेवर मिळाले नाही, पूर्वी ते औषध मिळत होते. याबाबत चौकशी केली असता हाफकिनमधून औषधांचा पुरवठा होत नसल्याचे व त्या औषधांचे उत्पादन होत नसल्याचे सांगण्यात आले. परंतु आताच या ठिकाणी औषधांचा साठा असल्याचे सांगण्यात आले आहे याबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे. साप, विंचू पकडण्यासाठी वन पशूसंवर्धन खात्याचा नवीन कायदा झालेला असल्यामुळे त्याचा काही परिणाम होणार आहे काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : या संदर्भात एक लस तयार केली जाते व त्याचे उत्पादन मोठया प्रमाणात केले जाते. हाफकिन बायो फार्मा हे राज्य शासनाच्या अंतर्गत येते. हाफकिन इन्स्टिटयूट ही वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अंतर्गत येते. लस तयार करण्यासाठी आवश्यक असलेले सँपल मिळण्यासाठी ज्या काही अडचणी होत्या त्याबाबतचा निर्णय झालेला आहे व हे काम बंद होते असे नाही, ते काम सुरुच होते. आज त्यांचा तुटवडा आहे असे मला तरी वाटत नाही. दि.14/3/2006 पर्यंतची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. उत्पादन 1,25,214 एवढे झालेले आहे व तेवढाच पुरवठा झालेला आहे. तसेच विंचवाच्या बाबतीत मागणीप्रमाणे 3579 एवढाच पुरवठा केलेला आहे. तसेच विषाचा साठा शिल्लक असल्यामुळे काही अडचण नाही असे मला वाटते.

डॉ.एन.पी. हिराणी : सध्याची सरासरी पाहता केवळ 1-2 टक्केच कोब्रा विषारी साप उपलब्ध आहेत. त्यामुळे अशाप्रकारचे साप चावले तरच त्रास होतो. उर्वरित साप चावल्यास त्रासाचे प्रमाण कमी असते. परंतु विषारी साप चावल्यानंतर दवाखान्यात वेळेवर ॲन्टीव्हेनम व्हॅक्सीन मिळाले नाही तर सदर रुग्ण दगावल्याशिवाय राहत नाही. आज ग्रामीण व जिल्हा रुग्णालयाची अशी अवस्था आहे की, त्या ठिकाणी ॲन्टीव्हेनम व्हॅक्सीन उपलब्ध नसते. विषारी साप चावल्यानंतर रुग्णाला ग्रामीण हॉस्पीटमध्ये घेऊन गेल्यास ते जिल्हा रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी सांगतात, जिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णाला उपचारासाठी आणल्यानंतर तेथून रुग्णाला मेडिकल कॉलेजमध्ये उपचारासाठी पाठविले जाते. परंतु अशाप्रकारे रुग्णाची ने-आण करेपर्यंत रुग्ण दगावल्याशिवाय राहत नाही. म्हणून ग्रामीण व जिल्हा रुग्णालयांमध्ये विशेष करुन पावसाळयामध्ये ॲन्टीव्हेनम व्हॅक्सीनची उपलब्धता कायमची राहावी यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.15595

डॉ.एन.पी. हिराणी ....

माझा मंत्रिमहोदयांना दुसरा प्रश्न आहे की, हाफकिन इन्स्टिटयूला साप व विचंवाच्या विषाचा उतारा म्हणून प्रतिजैविकांची निर्मिती करण्यासाठी प्रत्येक वेळेला वन विभागाची परवानगी घेण्याची आवश्यकता आहे काय ? त्यांना कायमस्वरुपी परवानगी मिळू शकेल काय ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी. हिराणी यांनी उपस्थित केलेल्या पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, ग्रामीण व तालुका पातळीपर्यंत ॲन्टीव्हेनम व्हॅक्सीनची उपलब्धता होण्यासाठी हाफकिन बायो फार्मा, हाफकिन इन्स्टिटयूट आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्यांसमवेत नजीकच्या 10 - 15 दिवसांत बैठक घेण्यात येऊन याबाबत शासनाच्या वतीने निर्णय घेण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत प्रतिजैविकांची निर्मिती झाली पाहिजे. दुस-या प्रश्नाच्या संदर्भात सजेशन फॉर ॲक्शन.

(यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 15595 ....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विशेष करून पावसाळ्यात आणि उन्हाळ्यामध्ये विंचू दंशाचे प्रकार अधिक होतात आणि त्यासाठी त्यावरील औषध सर्वत्र उपलब्ध होणे आवश्यक असते. त्याबाबतीत मंत्री महोदयांनी 'सजेशन फॉर ॲक्शन' असे उत्तर दिले आहे. सभापती महोदय, मध्यंतरी हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये अजगर सापडला होता आणि त्यामुळे वनखात्याने आपला परवाना रद्द केला होता. जवळपास दोन वर्षे आपल्याला हा परवाना नव्हता. तर या इन्स्टिट्यूटकडे अजगर कसा आला याची चौकशी आपण केली आहे काय ? आणि त्याबद्दल कारवाई काय केली आहे ? कारण परवाना नव्हता त्या कालावधीमध्ये जे कोणी बाधित झाले त्यांचेवर काय कारवाई केली गेली ? या संदर्भात मुख्य वन संरक्षक आणि प्रधान सचिव जे आहेत त्यांनी वृत्तपत्रातून मुलाखती दिल्या आहेत. तेव्हा तेथे अजगर सापडल्याने आपला परवाना रद्द झाला होता त्याबद्दल खात्याने काय कारवाई केली आहे आणि दुसरे म्हणजे या संस्थेने स्वामित्व शुल्क आणि दंडही भरला नव्हता त्यामुळे सुद्धा हे रखडले होते. आता हा प्रश्न आल्यानंतर त्याचा फॉलोअप सुरू झाला. तेव्हा यावर सरकारने काही कारवाई केली आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, याबाबतीत संपूर्ण चौकशी करून जे कोणी दोषी असतील त्यांचेवर कारवाई केली जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विषाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे असे या ठिकाणी लेखी उत्तरात सरकारने म्हटले आहे. परंतु आम्ही या मूळ प्रश्नामध्येच विचारले आहे की, 3 वर्षापूर्वी असा प्रस्ताव वन विभागाकडे सादर केला आहे हे खरे आहे का ? तर त्यावर उत्तर असे दिले आहे की, असा प्रस्ताव वन विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. तेव्हा हा प्रस्ताव नेमका केव्हा वन विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, जो प्रस्ताव आपण वन विभागाकडे पाठविला होता त्यावर वन विभागाने निर्णय घेतलेला आहे अशी दुरूस्ती मी सुरूवातीसच या लेखी उत्तरामध्ये केलेली आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, परंतु हा प्रस्ताव केव्हा पाठविला आहे याचे उत्तर आपण दुरूस्त केलेल्या उत्तरामध्येही दिलेले नाही आणि मूळ उत्तरामध्ये देखील दिलेले नाही. आपल्याकडे त्याची माहिती नसेल तर तसे आपण स्पष्ट सांगावे.

.... जे 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 15595 ...

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ती तारीख आता माझ्याजवळ नाही. परंतु याबाबतीतील जो प्रस्ताव आपण वन विभागाकडे पाठविला होता त्याबाबत वन विभागाने निर्णय घेऊन आता मान्यताही दिलेली आहे असे मी यापूर्वीच सांगितले आहे.

*****

..... जे 3 ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्वयंरोजगार खात्याचे प्रधान सचिव यांनी केलेला गैरव्यवहार

(5) * 12832 श्री. मधुकर चव्हाण, श्री. विनोद तावडे, श्रीमती कांता नलावडे : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रोजगार व स्वयंरोजगार खात्याचे प्रधान सचिव यांनी पूर्वी फिल्मसिटीचे व्यवस्थापकीय संचालक असताना राष्ट्रीय एकात्मता या विषयांवर हम सब एक है नावाच्या कार्यक्रमाचे आयोजन पाच शहरात 26 जानेवारी,2001 या दिवशी करावयाचे ठरविले होते हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याकरीता झी व बीफोरयु या टी.व्ही कंपन्याबरोबर करोडो रुपयांचा करार करण्यात आला होता व या करारानुसार जमा झालेली मोठी रक्कम ओशिवरा येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत जमा केली हे खरे आहे काय,
(3) असल्यास, काही कारणाने हा कार्यक्रम रद्द झाल्यावर बँकेतील रकमेचा गैरव्यवहार करुन तसेच आपल्या अधिकाराचा गैरवापर करुन संबंधीत प्रधान सचिवाने पैसे दुसरीकडे वळविले हे खरे आहे काय,
(4) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या सचिवांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री. अशोक चव्हाण यांच्याकरिता : (1) होय.
(2) होय.
(3) व (4) या प्रकरणाची चौकशी करण्याकरीता चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली होती. चौकशी पूर्ण करुन अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यामधील चौकशी अधिकाऱ्यांच्या निष्कर्षास असहमती दर्शवून चौकशी अहवालाची प्रत शासनाच्या असहमतीच्या टिप्पणीसह श्री. गोविंद स्वरुप तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे नियमानुसार पाठविण्यात आली होती. त्यावरील त्याचे अभिवेदन सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झाले असून त्यावरील पुढील प्रक्रीया सुरु आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, यावर प्रश्न विचारताना आपल्या परवानगीने या प्रश्नातील गांभीर्य मी आपल्या लक्षात आणून देण्यासाठी थोडी अधिक माहिती येथे देऊ इच्छितो. खरे तर या खात्याचे प्रधान सचिव श्री.गोविंद स्वरूप हे अधिकारी आता जेलमध्ये असले पाहिजे होते एवढा भयानक भ्रष्टाचार त्यांनी केलेला आहे आणि त्यांना वाचविण्यासाठी हे उत्तर येथे दिलेले आहे. वास्तविक त्यांचेवर फौजदारी कारवाई करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शासनाची परवानगी मागितली होती. कारण त्यांना 'बी 4 यू' या वाहिनीबरोबर इव्हेंट मॅनेजमेंट संबंधीचा करार करताना 1.75 कोटी रूपये दिले होते. त्यानंतर 'झी टीव्ही'साठी त्यांना 2 कोटी रूपये दिले होते. पण प्रत्यक्षात तो कार्यक्रम त्या ठिकाणी झालाच नाही. तरीही त्यांनी हे पैसे

.... जे 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू...) ता.प्र.क्र.12832 ...

स्वत:च्या नावे आणि फिल्मसिटीचे श्री. जी.शुक्ला आणि शहाब अहमद यांच्या नावे महाराष्ट्र बँकेत ठेवले होते. गुजरात मधील भूकंपामुळे हा कार्यक्रम गोत्यात आला होता. मात्र तरीही या कार्यक्रमाच्या आयोजनावर 20 कोटी 35 लाख रूपये खर्च झाले आणि 6 कोटी 42 लाख रूपयांचा तोटा झाला. श्री.शहाब अहमद यांना 6 कोटी रूपये रूपयांचे कर्ज देण्यात आले होते. त्यांनी ही रक्कम परत केली नाही. त्यामुळे ही रक्कम फेडण्यासाठी श्री.गोविंद स्वरूप यांनी महामंडळाची 20 कोटी रूपयांची मुदत ठेवीतील रक्कम मोडून पैसे दिले. त्यानंतर दूरदर्शनकरिता 'सुपरस्टार धमाका' हा कार्यक्रम तयार करण्यारिता श्री.गोविंद स्वरूप यांनी इंटर्नल ड्रीम्स प्रा.लि. या कंपनीबरोबर 31 डिसेंबर 2001 रोजी 25 लाख रूपयांचा करार केला आणि या कंपनीला 12.50 लाख रूपये दिल्यानंतर ही कंपनी अचानक गाशा गुंडाळून पळून गेली. त्यानंतर 8 एप्रिल 2002 रोजी सोनी एंटरटेनमेंट टेलिविजन या कंपनीबरोबर एक मालिका तयार करण्यासाठी करार केला आणि त्यासाठी दिलेले 3 कोटी रूपये 'हम सब एक है' या कार्यक्रमाची रक्कम ज्या बँक अकौंटमध्ये जमा केली त्यातच जमा करण्यात आली. म्हणजे महामंडळावर हा बोजा टाकण्यात आला आणि त्यासाठी संचालक मंडळाची परवानगी देखील घेण्यात आली नाही. संचालक मंडळाची मंजुरी न घेताच कंपनीला 75 लाख रूपये देण्यात आले. संचालकांनी हा प्रस्ताव फेटाळल्यावर याबाबतचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे प्रलंबित असताना देखील श्री.गोविंद स्वरूप यांनी आपल्या अधिकारात 1 कोटी 20 लाख रूपये नीलमुद्राला दिले हे खरे आहे काय ? तसेच मुख्यमंत्र्यांचे आदेश डावलून मुख्य सचिव श्री.प्रेमकुमार यांनी, लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने फौजदारी कारवाई करण्यास परवानगी मागितली असतादेखील त्यांची खातेचौकशी करण्याकरिता नेमलेल्या समितीने त्यांना क्लीन चीट दिली हे खरे आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र चित्रपट व रंगभूमी तसेच चित्रपट विकास महामंडळ यांच्या 2 नोव्हेंबर 2002 च्या बैठकीमध्ये असे लक्षात आले की, काही तरी आर्थिक गैरव्यवहार झालेला आहे म्हणून त्यामध्ये एक उपसमिती निर्गमित करण्यात आली होती. ..

(यानंतर श्री.सरफरे .. के 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील....

अशा परिस्थितीत शासनाकडे ही माहिती पाठविण्यात आली होती. त्या अनुषंगाने विभागीय चौकशीची कार्यपध्दती ठरविण्यात आली. ही चौकशी अंतिम टप्प्यामध्ये असून पुढील महिना दोन महिन्यात त्याबाबत अंतिम निर्णय होईल. त्याचप्रमाणे श्री. गोविंद स्वरुप हे आय.ए.एस. अधिकारी असल्यामुळे त्यांच्यावर करावयाच्या कारवाईबाबत केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागते. आपण या ठिकाणी अे.सी.बी. चा उल्लेख केला आहे व आकडेवारी सादर केली आहे ती अधिकांश बरोबर आहे. डिटेल आकडेवारी सांगावयाचे म्हटले तर झी टी.व्ही. कडून 5 कोटी ॲडव्हान्सची रक्कम घेतली आहे, "बी फोर यू" या टी.व्ही. चॅनेलकडून जाहीरातीचे व व्यवस्थापनाचे 2 कोटी 30 लाख रुपये घेतले. यामध्ये एकूण महामंडळाला 6 कोटींचे नुकसान झाले आहे. "हम सब एक है" या कार्यक्रमामधून महामंडळाला 6 कोटी 42 लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. झालेल्या आर्थिक नुकसानीला कोण जबाबदार आहे यासंबंधीचा चौकशी अहवाल प्राप्त झाला असून तो अंतिम टप्प्यामध्ये आहे. आणि परमिशन फॉर प्रोसीजरसाठी तो शासनाकडे आला आहे. यामध्ये सांस्कृतिक कार्य विभाग, विधी व न्याय विभाग या दोन विभागांचा संबंध असल्यामुळे व माननीय मुख्यमंत्र्यांकडे ती फाईल जाणे आवश्यक असल्यामुळे या तिनही ठिकाणी ही फाईल गेल्यानंतर पुढील महिना दोन महिन्यात अंतिम निर्णय होईल.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर ऐकल्यानंतर या चर्चेचे महत्व आपल्याला कळले आहे. मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर आणि छापील उत्तर यामध्ये विसंगती आढळते. प्रश्न असा आहे की, एका बाजूला आपण चौकशी अधिकाऱ्याकडे प्रकरण सोपविल्याचे मान्य करता. आणि उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "त्यामधील चौकशी अधिकाऱ्यांच्या निष्कर्षास असहमती दर्शवून चौकशी अहवालाची प्रत शासनाच्या असहमतीच्या टिप्पणीसह श्री. गोविंद स्वरुप तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे नियमानुसार पाठविण्यात आली होती". या प्रश्नावरील चर्चेचे महत्व लक्षात घेता या विसंगतीवर आपण कोणता प्रकाश टाकणार आहात?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे यामध्ये चौकशीच्या दोन स्वतंत्र प्रक्रिया आहेत. त्यामध्ये विभागीय चौकशीबाबत मी आता उत्तर दिले असून त्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्या आधारावर करण्यात आलेल्या चौकशीचे अभिप्राय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील...

मागण्यात आले आहेत. त्या अहवालातील चौकशी अधिकाऱ्याने काढलेले निष्कर्ष, मत हे शासनाला मान्य नाही. हे दोन्ही अहवाल शासनाकडे देण्यात आले असून त्यावर अंतिम निर्णय एक-दोन महिन्यात होईल. या ठिकाणी विभागीय चौकशी करण्यात आली आहे त्याचबरोबर अे.सी.बी. मार्फत चौकशी करण्यात आली आहे. यामध्ये दोन्ही वेगळया केसेस आहेत.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, ज्यावेळी गैरप्रकार होतात, त्यावेळी शासनामार्फत चौकशी करण्यात येते. त्या चौकशीमध्ये जरी निष्कर्ष् वेगळे निघाले असले तरी त्याबाबत कारवाई होते. या राज्यामध्ये तशाप्रकारची उदाहरणे झालेली आहेत. ज्या दिवशी राज्याचे मुख्य सचिव निवृत्त झाले त्या दिवशी त्यांनी श्री. गोविंद स्वरुप यांना निर्दोष सोडले. शासनाच्या कार्यपध्दतीप्रमाणे ज्या दिवशी अधिकारी शासकीय सेवेतून निवृत्त होतो त्याच्या एक महिना अगोदर पर्यंत त्यांना कोणतेही स्थायी आदेश किंवा निर्णय देता येत नाही. तरीसुध्दा याठिकाणी मुख्य सचिवांनी निर्णय दिल्याबद्दल त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : मुख्य सचिवांनी अशाप्रकारे निर्णय घेतल्याचे दिसत नाही.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी या ठिक्राणी उत्तर देतांना सांगितले की, आय.ए.एस. अधिकारी असल्यामुळे त्यांच्यावरील कारवाईसाठी केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागते. तुमच्याकडे चौकशी अहवाल आला असून त्यामध्ये त्यांनी गैर व्यवहार केल्याचे स्पष्ट झाले आहे. तेव्हा या राज्याचे मुख्यमंत्री व संबंधित खात्याचे मंत्री म्हणून त्या अधिकाऱ्यांनी गैर व्यवहार केल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्यांना तात्काळ निलंबित कां करीत नाही. त्यांना निलंबित करण्याचा आपल्याला अधिकार आहे, तेव्हा ती कारवाई करणार काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : यासंबंधीची लीगल डयू प्रोसेस आम्ही फॉलो करीत आहोत.

(यानंतर श्री. किल्लेदार...)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12832 (पुढे सुरु.....

...(अडथळा)...

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलतात.)

श्री.मधुकर चव्हाण : भ्रष्टाचार झालेला आहे. या प्रकरणी त्यांना निलंबित केले पाहिजे.

प्रा.बी.टी.देशमुख : जे काही आरोप आहेत ते मंत्री महोदयांनी वाचून दाखविले. अशा परिस्थितीत त्यांना सस्पेंड केले पाहिजे. परंतु मंत्री महोदय डयु प्रोसेस ऑफ लॉ फॉलो केला पाहिजे, असे व्हेग उत्तर देतात. ते आय.अे.एस. अधिकारी असल्यामुळे केंद्र सरकारची परवानगी पाहिजे असे सांगत आहेत. तसा केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविलेला आहे काय ? ते सांगावे. माझा पॉईन्टेड प्रश्न आहे की, त्यांच्यावर हे गंभीर आरोप असतांना त्यांना निलंबित करण्यास विलंब का होत आहे ? त्यांना निलंबित करण्यासाठी केंद्र सरकारची परवानगी पाहिजे असेल तर प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे का ? तसे आपण सांगावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (बसून) : त्यांना निलंबित केले पाहिजे.

प्रा.बी.टी.देशमुख : निलंबित करण्यासाठी केंद्र सरकारची परवानगी पाहिजे, असे म्हणत असाल तर तसे म्हणावे, तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविलेला आहे काय ? तसा प्रस्ताव पाठविण्याची आवयकता नसेल तर त्यांना निलंबित करण्यामध्ये अडचण काय आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : चुकीची कृती करणाऱ्यांना पाठिशी घालण्याची शासनाची भूमिका नाही. विभागीय चौकशीची कार्यपध्दती अशी आहे की,.....

अनेक सन्माननीय सदस्य (एकाचवेळी) : त्यांना निलंबित करणार की नाही ? ते सांगा.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सस्पेंड करण्यासाठी प्रोसिजर आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मला आपल्याकडून संरक्षण पाहिजे.

सभापती : मंत्री महोदय, सन्मानीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देत असतांना आपण सांगितले की, त्यांच्याकडून काही चुका झालेल्या आहेत. तसे उत्तरामध्ये आपण मान्य केलेले आहे. त्याबाबतीत विभागीय चौकशीचा एक भाग आहे आणि अे.सी.बी.ची चौकशी हा दुसरा भाग आहे. विभागीय चौकशीच्या अनुषंगाने काही भाग पूर्ण झाला. त्याबाबतीतील काही ऑब्जेक्शन्स उत्तरामध्ये दिलेली आहेत. अे.सी.बी.च्या चौकशीच्या संबंधात काय करायचे ? हे सांगितलेले आहे. ते आय.अे.एस.ऑफीसर असल्यामुळे केंद्र सरकारची परवानगी घेण्याची गरज आहे, असे सांगितले. पंरतु एकंदरीत हा प्रकार गंभीर आहे. त्याबाबत दोन्ही बाजूच्या सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती (पुढे सुरु.....

सदस्यांकडून मागणी आहे. या प्रकरणी कोणालाही पाठिशी घातले असे न दिसता कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने उत्तर देणे अभिप्रेत आहे.

Adv.Gurunath Kulkarni: Mr. Chairman, Sir, he should be suspended. That is the only thing.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलतात.)

...अडथळा....

श्री.राणा जगजितसिंह पाटील : माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मला आपले संरक्षण पाहिजे. मी पॉईन्टेड प्रश्न विचारलेला आहे.

सभापती : बरोबर आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : मी डिपार्टमेंट इन्क्वायरीचे प्रोसिजर विचारलेले नाही. मला आपले संरक्षण पाहिजे. या प्रश्नाच्या आऊट ऑफ स्कोपमध्ये जाऊन मी प्रश्न विचारलेला आहे काय ?

The CHAIRMAN: The hon. Member's question is not out of scope.

श्री.राणा जगजितसिंह पाटील :सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भाने सोमवारी सकाळी मी निवेदन करीन, त्यासाठीस मला परवानगी द्यावी.

प्रा.बी.टी.देशमुख : तोपर्यन्त हा प्रश्न राखून ठेवावा.

सभापती : मी हा प्रश्न राखून ठेवतो. हा प्रश्न पुन्हा सोमवारी घेण्यात येईल. या प्रश्नावर चर्चा पुष्कळ झालेली आहे, फक्त उत्तरासाठीच मी हा प्रश्न राखून ठेवलेला आहे.

अनेक सन्माननीय सदस्य : नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी उभे राहून बोलतात.)

....अडथळा....

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12832....

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, दोन्ही बाबतीमध्ये घोटाळा होत आहे..

सभापती : मी असे सांगितले की, या प्रश्नावर किमान 20 मिनिटे चर्चा केलेली आहे. या प्रश्नाबाबत सोमवारपर्यंत आपण वाट बघू. या प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देणार आहेत. सोमवारी जेव्हा या प्रश्नाबाबत चर्चा करु त्यावेळी अन्य प्रश्न न विचारता आपला जो शेवटचा प्रश्न आहे त्याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांकडून अपेक्षित आहे.

प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महापालिका तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये अपंगत्वाच्या दाखल्यावर अपंगांना नोकऱ्या देण्याचे कामकाज चालू आहे. त्यामध्ये जे कुष्ठरोगमुक्त आहेत त्यांना नोकरी देण्याचे काम केले जाते. यामध्ये प्रश्न असा आहे की, जे कुष्ठरोगमुक्त आहेत त्यांना 40 टक्के अपंगत्व असल्याबद्दलचा दाखला घेऊन या असे सांगितले जाते. जे कुष्ठरोगातून मुक्त झाले आहेत त्यांना अपंगत्वाचा दाखला देता येत नाही. जे कुष्ठरोगी आहेत त्यांना काम करता येत नाही. त्यांना जर जखम झाली तर कुष्ठरोग वाढत जातो. मला सभागृहाच्या माध्यमातून शासनाला विनंती करावयाची आहे की, जे कुष्ठरोगमुक्त आहेत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने त्वरित निर्णय घेणे आवश्यक आहे. या कुष्ठरोग्यांना नोकरीसाठी इंटिमेशन दिलेले आहेत, अपॉइन्टमेंट लेटर्स दिलेले आहेत अशा कुष्ठरोगमुक्तांना अपंगत्वाचा दाखला देऊन नोकरीमध्ये घ्यावे.

सभापती : अपंगांना सर्टिफिकेट देण्याबाबतचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे. त्याची नोंद माननीय मंत्रिमहोदयांनी घ्यावी.

श्री. दिलीप वळसे-पाटील : ठीक आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, माझा आणखी एक औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, काल या ठिकाणी साहित्यिक श्री. विंदा करंदीकर यांचे आपण अभिनंदन केले. महाराष्ट्राच्या दृष्टीने आणखी एक अभिमानाची गोष्ट काल घडलेली आहे. तेजस्विनी सावंत या ग्रामीण भागातील आपल्या भगिनीने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत नेमबाजीमध्ये सुवर्णपदक मिळविलेले आहे. सभागृहाने त्यांचेही अभिनंदन करावे. महाराष्ट्राची उज्ज्वल परंपरा अशी वाढत राहो अशी आपण शुभेच्छा देऊ या.

सभापती : महाराष्ट्राच्या दृष्टीने ही अत्यंत गौरवास्पद बाब आहे म्हणून या मुलीचे, या खेळाडूचे आपण या ठिकाणी अभिनंदन करीत आहोत.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल नेरुळ येथे झालेली दंगल आणि तेथील वातावरणाची भरपूर चर्चा या ठिकाणी झालेली आहे. सध्या इयत्ता दहावीची शालांत परीक्षा सुरु आहे. या परीक्षेच्या निमित्ताने काल काही पेपर्स सुरु होते. परंतु नवी मुंबईतील, घणसोलीतील वातावरण गंभीर स्वरुपाचे होते. त्या ठिकाणी कर्फ्यू होता त्यामुळे अनेक विद्यार्थी या परीक्षेला बसू शकले नाहीत. त्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण वर्ष वाया जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. त्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या संदर्भात काही निर्णय घेण्यासंबंधी आपण निदेश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी याची नोंद घ्यावी.

श्री. दिलीप वळसे-पाटील : ठीक आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, त्या ठिकाणी जावयाचे कसे असा प्रश्न आहे...

सभापती : सन्माननीय मंत्रिमहोदय, श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी आणखी एका बाबीची नोंद घ्यावी. नेरुळ आणि अन्य ठिकाणी वाहतूक आणि अन्य बाबी सुरु आहेत काय याबाबत सुध्दा लोकांना पूर्ण कल्पना नाही. त्यांनी माझ्या दालनात येऊन असे सांगितले की, याबाबतीत टी.व्ही. किंवा अन्य माध्यमातून त्यांना कल्पना दिली तर लोकांना सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय सभापती पुढे सुरु...)

त्या ठिकाणी चांगले वातावरण तयार होण्याच्या दृष्टीने आपण गृह विभागाशी चर्चा करावी.

श्री. दिलीप वळसे-पाटील : माननीय सभापती महोदय, आपण व्यक्त केलेल्या भावना मी तातडीने गृह विभागाला कळवीन आणि नागरिकांना लवकरात लवकर माहिती देण्याच्या संदर्भात विनंती करीन.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, मला एक प्रश्न उपस्थित करावयाचा आहे.

सभापती : आपण माझ्या दालनात येऊन माझी परवानगी घेतली असती तर मी आपणास परवानगी दिली असती.

आता नियम 93 अन्वयेच्या सूचना घेण्यात येतील.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: _ नियम 93 अन्वये सूचना

सभापती : माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते व इतर वि.प.स. यांनी "उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक 17 जानेवारी 2004 च्या शासन निर्णयानुसार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील निदेशकांना 5500-9000 ची मूळ वेतनश्रेणी, 6500-10500 ची वरिष्ठ श्रेणी व 7500-12000 ची निवड श्रेणी दिनांक 1.1.1996 पासून लागू करणे, परंतु त्याचा लाभ सेवानिवृत्त कर्मचा-यांना न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी "उरण तालुकयातील (जिल्हा रायगड) घारापुरी येथील एलिफंटा लेणी येथे वर्षाकाठी दहा लाख पर्यटकांनी भेट देणे, तेथील पर्यटकांना दिनांक 22 मार्च 2006 पासून ग्रामस्थांनी मज्जाव करण्याचा घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे

यानंतर माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे, सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " दिनांक 4 मार्च 2006 रोजी वा त्या सुमारास मिरा रोड, जिल्हा ठाणे येथील शांती पार्क परिसरात राहाणा-या अल्पवयीन मुलीवर तीन जणांनी बलात्कार केल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 14 मार्च 2006 रोजी गोंडगाव, तालुका भडगाव, जिल्हा जळगाव येथे श्री. रामराव पाटील यांनी आपल्या सहा वर्षीय पुतण्याला ठार मारुन नरबळी दिल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय सभापती पुढे सुरु...)

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 18मार्च 2006 रोजी मुंबईत होणा-या वानखेडे स्टेडियममधील क्रिकेट सामन्यामध्ये बेटिंग करणारे बुकी यांना अटक करण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर वि.प.स. यांनी "मुंबईतील पूर परिस्थितीस तोंड देण्यासाठी तयार केलेला आपत्ती व्यवस्थापन आराखडा फोल ठरणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर माननीय सदस्य श्री. व्ही. यू. डायगव्हाणे व इतर वि.प.स. यांनी "महाराष्ट्र शासनाने राज्यातील मिडल स्कूल व प्राथमिक शाळांतील प्रशिक्षित व अपदवीधर (डी.एड.) शिक्षकांना केंद्रातील शिक्षकांप्रमाणे सुधारित त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर न करुन भेदभावपूर्ण वर्तणूक करणे, दिनांक 18 मार्च 2006 रोजी या संबंधात विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने आंदोलन करण्याचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

बाकीच्या आलेल्या 93च्या सूचना मी दालनात नाकारलेल्या आहेत.

...4..

अशुधारित प्रत / शोधनेसाठी नाही

पृ. शी. : ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळातील शिक्षकांच्या भविष्यनिर्वाह निधीचा झालेला अपहार

मु. शी : ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळातील शिक्षकांच्या भविष्यनिर्वाह निधीचा झालेला अपहार यासंबंधी सर्वश्री सुधीर सावंत, संजय दत्त, सुधाकर गणगणे, रमेशे निकोसे, गोविंदराव आदिक, धनाजी साठे व प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

श्री. मधुकर सरपोतदार : हा अतिशय महत्वाचा प्रश्न असून माननीय सदस्यांनी अनुपस्थित राहाणे योग्य नाही.

सभापती : दोन्ही बाजूंनी असे प्रकार होऊ नयेत. एक तर माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना देण्याच्या अगोदर हा विचार करायला पाहिजे होता. लक्षवेधी सूचना दिल्यानंतर ती या सभागृहामध्ये येत असताना माननीय सदस्यांनी जरुर उपस्थित रहाणे आवश्यक होते. याबाबतीत मी माननीय सदस्यांच्या प्रतोदांना सूचना देईन. याबाबतीत मी दोन्ही बाजूच्या माननीय सदस्यांना सूचना दिलेल्या आहेत.

.....नंतर श्री.कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनेसंबंधी.

सभापती : लक्षवेधी सूचना क्र. 2 डॉ. दीपक सावंत व इतर सन्माननीय सदस्य यांनी दिलेली आहे. ती मी पुढे ढकलली आहे. आता लक्षवेधी सूचना क्र. 3 घेण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्र. 3 ला उत्तर देण्यासाठी संबंधित खात्याचे मंत्री आणि राज्यमंत्री दोघेही सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

सभापती : लक्षवेधी सूचना क्र. 3 ला उत्तर देण्यासाठी संबंधित खात्याचे मंत्री आणि राज्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी त्या त्या विषयाच्या अनुषंगाने सभागृहाच्या कार्यक्रमपत्रिकेनुसार सदनामध्ये उपस्थित राहणे गरजेचे आहे. असे पुन्हा घडू नये याकरिता मी सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक 1 वाजून 11 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: शासकीय आश्रमशाळेतील कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेत शिक्षक व प्रयोगशाळेची सुविधा नसल्यामुळे मुलांच्या उच्च शिक्षणावर होत असलेला परिणाम.

मु.शी.: शासकीय आश्रमशाळेतील कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेत शिक्षक व प्रयोगशाळेची सुविधा नसल्यामुळे मुलांच्या उच्च शिक्षणावर होत असलेला परिणाम या विषयासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, डॉ. अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, श्री. प्रतापराव सोनवणे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मोरोशी, ता.मुरबाड, जि.ठाणे येथील शासकीय आश्रमशाळा आदिवासी विकास विभागाची असून या शाळेत विज्ञान शाखेचे उच्च माध्यमिकचे इयत्ता ११ वी व १२ वी चे वर्ग असणे, सदर शाळेतील विद्यार्थ्यांची इच्छा नसतांना देखील त्यांना जबरदस्तीने विज्ञान शाखेत प्रवेश घेण्यास भाग पाडणे, विज्ञान शाखेसाठी अध्यापनासाठी शिक्षक न नेमणे, इयत्ता ११ वी व १२ वी साठी भौतिकशास्त्र या विषयासाठी शिक्षक उपलब्ध नसणे, भौतिकशास्त्र या विषयाचे विद्यार्थ्यांना अध्यापन न होणे, जीवशास्त्र या विषयासाठी जानेवारी, २००६ मध्ये शिक्षक उपलब्ध करुन देणे, गेल्या दोन वर्षात या शाळेची प्रयोगशाळा उघडण्यात न येणे व त्यामुळे शाळेत प्रयोगांची प्रात्यक्षिके न होणे, बोर्डाच्या परिक्षेत मुलांनी कोरे पेपर देणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होणे, याबाबत शिक्षण क्षेत्रात व समाजात निर्माण झालेला तीव्र असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. विजयकुमार गावित (आदिवासी विकास मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय,.....

कर्नल सुधीर सावंत : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी क्र.1 विचारण्यासाठी मला परवानगी द्यावी.

उपसभापती : ज्यावेळेस चेअरवरुन लक्षवेधी सूचना पुकारण्यात आली त्यावेळी कोणतेही सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते. आता आपण पुढे गेलेलो आहोत, मी पुढची लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे.

श्री. रामनाथ मोते : महोदय, ठाणे जिल्हयातील मुरबाड तालुक्यातील आश्रमशाळेसंबंधीचा हा विषय आहे. आदिवासी विभागाअंतर्गत ही शासकीय आश्रमशाळा असून अकरावी व बारावीचे वर्ग या शाळेत आहेत पण गेल्या दोन वर्षांमध्ये या वर्गांना भौतिकशास्त्र या विषयासाठी शिक्षक नेमण्यात आलेला नाही व उत्तरात देखील तसे मान्य केलेले आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे आदिवासी विभागाने आश्रमशाळा सुरु केली, या ठिकाणी ज्युनियर कॉलेज सुरु केले परंतु विज्ञान शाखेसाठी विद्यार्थी मिळत नाहीत म्हणून पास झालेल्या विद्यार्थ्यांना जबरदस्तीने विज्ञान शाखेत शिका म्हणून प्रवेश देण्यात आलेले आहेत. परंतु गेल्या दोन वर्षांमध्ये भौतिक शास्त्राचे अध्यापन या शाळेतून झालेले नाही तसेच प्रयोगशाळेची व्यवस्थाही नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी बारावीचे पेपर कोरे दिलेले आहेत. म्हणून हे विज्ञानाचे वर्ग या कॉलेजमधून सुरु करण्यासाठी परवानगी का देण्यात आली ? तसेच या विषयांचे शिक्षक मिळविण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले ? तसेच जबरदस्तीने प्रवेश दिल्यामुळे या विद्यार्थ्यांने दोन वर्षाचे जे नुकसान झालेले आहे, ते बारावीच्या परीक्षेत नापास होण्याची शक्यता आहे, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना या गावाला करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे सन 2003 पासून या कॉलेजमध्ये शिक्षकाची पदे मंजूर नसल्यामुळे आपल्याला ताबडतोब विज्ञान विषयाचे शिक्षक भरण्याची कार्यवाही करता आली नाही. त्यानंतर ही पदे आम्ही मंजूर करुन घेतली आणि ही पदे भरण्यासंबंधीची प्रक्रिया सुरु केलेली आहे. त्याचबरोबर हे विषय शिकविण्यासाठी तासिका बेसिसवर शिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यात रसायनशास्त्र आणि भौतिकशात्र या विषयांसाठी श्री. थिटे आणि श्री. सुरोशे यांची नेमणूक केली होती. त्यांनी सन 2003 पर्यंत काम केले. त्यानंतर थिटे हे सोडून गेले व त्यांच्या जागी श्री. हातेकर यांना नेमण्यात आले आहे. श्री. सुरोशे यांनी डिसेंबर, 2005 पर्यंत काम केले होते व त्यानंतर माध्यमिक आश्रमशाळेच्या ठिकाणी कार्यरत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित .....

असलेले क्वॉलिफाईड टीचर यांची हा विषय शिकविण्यासाठी नेमणूक केली आहे. तसेच शिक्षकांची पदे मंजूर नाहीत म्हणून स्वयंसेवी संस्थांनी देखील आम्हाला मदत केली व श्री. दांडे आणि श्री. स्वामी हे दोन शिक्षक काम करीत आहेत. असे असले तरी आता आम्ही मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन ही पदे मंजूर करुन घेतलेली आहेत. पदे भरण्याच्या प्रक्रियेमध्ये शिक्षकांसाठी लेखी परीक्षा झाल्या आहेत व आता ताबडतोब तोंडी मुलाखती घेऊन सर्व त्रुटी पूर्ण होतील. तसेच माध्यमिक शाळेची जी लॅब होती तिचा वापर प्रयोगासाठी करण्यात येत आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित....

या कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल बघितला तर आपल्या लक्षात येईल की, सन 2003-2004 मध्ये 64 टक्के निकाल लागला आहे, तर सन 2004-2005 मध्ये 80 टक्के निकाल लागला आहे. आम्ही तेथे शिक्षकांची पदे भरण्याचा आमच्या परीने प्रयत्न केला आहे. त्यासाठी सर्व पदे मंजूर करून घेतली आहेत. ज्या काही त्रुटी होत्या त्या दूर करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, मूळात मंत्रिमहोदयांनी लेखी उत्तर नीट काळजीपूर्वक वाचले पाहिजे. या कनिष्ठ महाविद्यालयात मंजूर पदे नव्हती. शिक्षक तासिका पध्दतीने घेतले होते. त्याला कंटाळून शिक्षक नोकरी सोडून गेले. असे असताना शासन म्हणते की, "कोणत्या शाखेला विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावयाचा त्याची मुभा त्या विद्यार्थ्यांना होती." या विद्यार्थ्यांना कसली मुभा होती. शासन येथे जे उत्तर देत आहे ते तांत्रिक औपचारिकतेसाठी देत आहे. खरे म्हणजे शासन वेळ मारून नेत आहे. तेथे पदे मंजूर नाहीत म्हणून प्राध्यापक शिकवत नाहीत तसेच तासिका पध्दती असल्यामुळे ते कंटाळून निघून जातात. याचा अर्थ बैला गेला आणि झोपा झाला. आता पदे मंजूर झाली आहेत. पण ज्यांच्या गलथानपणामुळे हा प्रकार घडला आहे, त्याच्याविरूध्द शासन कोणती कारवाई करणार आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन 1999 साली शासकीय आश्रमशाळेला मान्यता देण्यात आली होती. परंतु, दोन वर्ष शासकीय आश्रमशाळा सुरू झाली नव्हती. सदर आश्रमशाळा सुरू करावी अशा पध्दतीचे आदेश दिल्यामुळे ती सरु करण्यात आली. दरम्यानच्या काळात शासनातील सवंर्गनिहाय अतिरिक्त किती पदे भरलेली आहेत याचा आढावा घेण्यात आला. तो पर्यंत शासकीय नोकरी भरतीवर निर्बंध घालण्यात आले होते. दरम्यानच्या काळात दोन वर्षाचा कालावधी गेला. त्यामुळे या आश्रमशाळेतील मंजूर केलेली पदे लॅप्स झाली. परंतु, अतिरिक्त पदांचा आढावा पूर्ण झाल्यानंतर सदर लॅप्स झालेली पदे पुन्हा मंजूर करून घेण्यात आली आहेत. ही पदे भरली जातील.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी "कोणत्या शाखेला विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावयाचा त्याची मुभा त्या विद्यार्थ्यांना होती" याचा अर्थ कसा काय लाववयाचा हे मला सांगावे. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, येथे कोणत्याही विद्यार्थ्याला फोर्स करण्याचा प्रश्नच नव्हता. आज कला शाखेमध्ये 41 विद्यार्थी आहेत, तर विज्ञान शाखेमध्ये 15 मुले आहेत. आम्ही जर प्रेशर टाकले असते तर कला शाखेतील 40 विद्यार्थ्यांना विज्ञान शाखेत टाकले असते. मुलांचे नुकसान होऊ नये, त्यांना शिक्षण मिळावे हीच आमची भूमिका आहे. या आश्रमशाळेसाठी शिक्षक मिळण्यासाठी आम्ही आमच्यापरीने प्रयत्न केले आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, परवा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी भाषा शिकविण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली तेव्हा सत्ताधारी पक्षाच्यावतीने बाके वाजवून स्वागत करण्यात आले. फक्त प्रसिद्धीसाठी शासनाने ही घोषणा केलेली आहे. पण आज आश्रमशाळेतील शिक्षणाची स्थिती काय आहे ? माझा शासनाला असा सवाल आहे की, या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्या अधिकाऱ्यांकडे काही तक्रार केली होती काय ?, असल्यास, त्या तक्रारीवर शासनाने कोणती कारवाई केली आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, शासनाला कोणतीही तक्रार अजून पर्यंत प्राप्त झालेली नाही.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आमच्याकडे तक्रारीची प्रत आहे.

उपसभापती : शासनाकडे विद्यार्थ्यांच्या तक्रारीची प्रत गेली नसेल.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, तक्रारीचा विषय बाजूला ठेवावा. शासनाने जे लेखी उत्तर दिले आहे ते आपण बघा....

उपसभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कृपया आपण खाली बसावे.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, खाजगी शाळांना मंजूरी मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. शिक्षक नाहीत तर मग तुकडया कशाला देण्यात येत आहेत ? माझा प्रश्न हा ठाणे जिल्हया पुरता मर्यादित नाही.

यानंतर श्री.बोर्डे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे....

महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी आश्रमशाळेला कनिष्ठ महाविद्यालय संलग्न असतील त्या सर्व महाविद्यालयांना येत्या सत्रापासून शासन शिक्षक पुरविणार काय ? वास्तविक पाहता ज्या ठिकाणी 15 पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असेल ती तुकडी विना अनुदानावर येते. त्यामुळे अशा तुकडयांना सुध्दा तुम्ही अनुदान व मान्यता देणार आहात काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, या शासकीय आश्रमशाळा असल्यामुळे त्यांना शासन सेवा देत असते. कनिष्ठ महाविद्यालयालयातील तुकडयांमध्ये कमी विद्यार्थी संख्या असेल तर त्या ठिकाणचे वर्ग बंद करुन, त्या विद्यार्थ्यांना एका ठिकाणी आणणार आहोत. तसेच जून महिन्यापासून सर्व पदे भरली जातील आणि कोणाचीही तक्रार राहणार नाही. तसेच विषयवार शिक्षक सुध्दा भरण्यात येतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नंदूरबार जिल्हयात "बर्ड फ्ल्यू" या रोगामुळे कुक्कुटपालन उद्योगास बसलेला जबरदस्त फटका.

मु.शी.: नंदूरबार जिल्हयात "बर्ड फ्ल्यू" या रोगामुळे कुक्कुटपालन उद्योगास बसलेला जबरदस्त फटका.यासंबंधी सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, रणजितसिंह मोहिते-पाटील, विनायकराव मेटे, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, श्रीकांत जोशी, मधुकर चव्हाण, डॉ. दिपक सावंत, सर्वश्री. मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, अनंत तरे, विलास अवचट, अनिल परब, दिवाकर रावते, डॉ. निलम गोऱ्हे, सर्वश्री. कन्हैयालाल गिडवानी, सागर मेघे, संजय दत्त, धनाजी साठे, रमेश निकोसे, गोविंदराव आदिक, सुधीर सावंत, डॉ. अशोक मोडक, श्रीमती कांता नलावडे, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. मुझफ्फर हुसेन, सदाशिवराव पोळ, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो व त्यांनी त्याबाबत निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात नंदुरबार जिल्हयात फेब्रुवारी, 2006 मध्ये कोंबडयांना "बर्ड फ्ल्यू" या रोगाचा प्रादुर्भाव होणे, त्यामुळे लाखो कोंबड्या खड्डयात पुरण्यात येणे, साथीमुळे कोंबड्या नष्ट कराव्या लागल्यामुळे कुक्कुटपालन उद्योगास बसलेला जबरदस्त फटका व त्यामुळे कोंबड्यांच्या निर्यातीवर झालेला अनिष्ट परीणाम, तसेच कोंबड्यांचे मांस, अंडी यांची निर्यात ठप्प होणे, शासनाने तीन महिने पोल्ट्री फार्म बंद ठेवण्याचे आदेश दिल्यामुळे या उद्योगाचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होणे, या व्यवसायात मजुरी करणाऱ्या व्यक्तींच्या आरोग्याची काळजी घेण्यात न येणे व त्यांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होणे, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेले भितीचे, चिंतेचे व संशयाचे वातावरण, कुक्कुटपालन व्यावसायिकांना मोठ्या कोंबडीसाठी 50 रुपये, मध्यम कोंबडीसाठी 30 रुपये तर पिल्लासाठी 10 रुपये जाहीर करण्यात येणे, सदर मदत अत्यंत अपुरी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असणे व ती व्यावसायिकांना मिळण्यात असंख्य अडचणी येणे, या अडचणी दूर करुन व्यावसायिकांना तातडीने सावरण्याची निर्माण झालेली आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या सभागृहात अतिशय महत्वाच्या अशा या विषयावर तब्बल 29 सन्माननीय सदस्यांनी एकमताने लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. नंदूरबारला "बर्ड फ्ल्यू" ची लागण झाल्यामुळे दिनांक 18 फेब्रुवारी, 2006 रोजी केंद्र सरकारने कृती आराखडयाची अंमलबजावणी केली. त्या ठिकाणी बर्ड फ्ल्यूमुळे मोठया प्रमाणावर कोंबडया मारल्या गेल्या. जवळजवळ 3 लाख 23 हजार 675 कोंबडया मारल्या गेल्या. तसेच 14 लाख 47 हजार 113 अंडी फोडून जमिनीमध्ये गाडण्यात आली. नंदूरबार मध्ये फार मोठी गंभीर परिस्थिती या बर्ड फ्ल्यू रोगामुळे निर्माण झाली होती. परंतु राज्य सरकारकडून कार्यवाही करण्यासंदर्भामध्ये मात्र विसंगती आढळून आली. त्या ठिकाणी आलेला रोग बर्ड फ्ल्यू होता की, राणी खेत होता याबद्दल शासनाकडून कसल्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्र्यांनी तर टोकाची भूमिका घेतली आणि सांगितले की, बर्ड फ्ल्यू झाला की नाही हे पाहण्यासाठी कोंबडयांच्या रक्ताचे नमुने तपासण्यासाठी लंडनला पाठविलेले आहेत. परंतु लगेच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, लंडनला अशा प्रकारचे कोणतेही नमुने पाठविलेले नाहीत, तर ते भोपाळला पाठविलेले आहेत. कोंबडया मारल्यामुळे पोल्ट्री फार्म व्यावसायिकांचे हजारो नव्हे करोडो रुपयांचे नुकसान झालेले आहे. वर्षानुवर्षे कोंबडी व्यवसायामध्ये काम करणाऱ्या मजुरांचे नुकसान झालेले आहे. त्या ठिकाणी अशी परिस्थिती असताना राज्याच्या मंत्र्यांनी कोंबडी खाताना इलेक्ट्रीक मिडियासमोर पोज दिली. ते कोंबडी मोडून-मोडून खात होते. परंतु त्याच दरम्यान जळगांवमध्ये बर्ड फ्ल्यूची लागण झाली. अशा प्रकारची अतिशय भयानक परिस्थिती राज्यामध्ये निर्माण झाली.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, यामध्ये करोडो रुपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे माझा माननीय मंत्रीमहोदयांना असा प्रश्न आहे की, उद्या जर अशा प्रकारचा ....

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, यासंबंधी माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य माननीय मंत्रीमहोदयांच्या विषयासंदर्भात बोलत आहेत. तरी माननीय मंत्री महोदयांनी उपस्थित असणे आवश्यक आहे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्रीमहोदय, माझी आणि सन्माननीय सदस्यांचे विचार माननीय मंत्रीमहोदयांपर्यंत नक्कीच पोहोचवतील असा मला विश्वास आहे. माझा माननीय मंत्रीमहोदयांना स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, बर्ड फ्ल्यू आणि रानीखेत या दोन रोगांमध्ये फरक काय आहे ? तसेच, बर्ड फ्लू किंवा रानी खेत या रोगांपासून प्रिव्हेन्शन करण्यासाठी कोणते कायमस्वरुपी उपाय सुचविण्यात आलेले आहेत ? त्याचप्रमाणे पिडीत लोकांना आपण जी मदत देणार होता, ती दिली आहे का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे की, पहिल्यांदा नवापूर व त्या भागातील कोंबड्यांना बर्ड फ्लू ची लागण झाली. दिनांक 8.2.2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात 30 हजार कोंबड्या मेल्याची बातमी आली. त्यानंतर मग शासनाने ताबडतोबीने दिनांक 10.2.2006 ला डी.आय.एस. म्हणून जी लॅबोरेटरी आहे, तिथे सँपल पाठविले. त्यावेळी त्यांनी तो रोग रानीखेत असल्याबाबत सांगितले. मग आम्ही ताबडतोबीने भोपाळ लॅबला सँपल पाठविले. सभापती महोदय, दिनांक 18.2.2006 ला केंद्र शासनाने राज्य शासनाला दुपारी 4 वाजता कळविले की, हा रोग "बर्ड फ्लू" आहे, "रानीखेत" नाही. त्यानंतर शासनाने ताबडतोबीने दिनांक 19.2.2006 पासून नवापूर व त्या भागातील 10 कि.मी. चा भाग सील केला. सभापती महोदय, जवळजवळ 42 पोल्ट्री फार्म्समधील 2,53,063 कोंबड्या मारल्या. तसेच घरात असलेल्या 70,612 कोंबड्या मारल्या.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा आकडा शासनाचा आहे की प्रशासनचा आहे ? कारण दोन्ही आकडे वेगवेगळे सांगण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा आकडा शासनाचा असून शासन आणि प्रशासनाचे असे दोन आकडे नाहीत. शासनाने त्या ठिकाणी 14,47,113 अंडी आणि त्यांची विष्टा नष्ट केली आहे. देशामध्ये एकूण 38 हजार कोटी रुपयांची पोल्ट्री फार्मची उलाढाल आहे. सभापती महोदय, जेथे बर्ड फ्लू झाला तेथील सर्व कोंबड्या आपण मारल्या, परंतु जेथे झाला नाही तेथे कोंबड्या आणि अंडी खपत नाहीत. तेथील सर्वांनी सांगितले की, हे आम्हाला परवडण्यासारखे नसून आम्ही आमच्या कोंबड्या मारुन टाकतो. त्यामुळे यातून मार्ग काढण्यासाठी आम्ही कोंबड्या खात होतो. 70 डिग्री सेल्सिअस तापमानावर कोंबडी शिजवली तर काही होत नाही हे सांगण्याचा हा छोटा प्रयत्न होता.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी "रानीखेत" व "बर्ड फ्लू" या रोगांमधील फरक अद्याप सांगितलेला नाही.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, रानीखेत हा रोग झाल्यास लस दिल्याने तो बरा होऊ शकतो. परंतु बर्ड फ्लू हा रोग संसर्गजन्य असल्यामुळे त्यामध्ये कोंबड्या मरतातच.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, गेल्या चार दिवसांपासून "बर्ड फ्लू" गेल्याच्या बातम्या येत होत्या. परंतु आता बर्ड फ्लूची जळगाव मध्ये लागण झालेली आहे. आम्ही टी.व्ही.वर आपण चिकन खाल्ल्याचे पाहत आहोत. आम्हाला तुमच्या असंवेदनशिलतेची कमाल वाटते. आपण म्हणता की, 70 डिग्री सेल्सिअसला कोंबडी शिजवली तर काही होत नाही. सभापती महोदय, चिकन खाणाऱ्या लोकांना काही होणार नाही. परंतु आपण एका गोष्टीकडे दुर्लक्ष केलेले आहे की, चिकनचा सांभाळ करणाऱ्याला, हॉटेलमध्ये चिकन करणाऱ्याला याची लागण होऊ शकते का याबाबत आपण काहीही माहिती दिलेली नाही.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

चिकन बनविणाऱ्या ज्या गृहिणी महिला आहे त्यांना या रोगाचा प्रादूर्भाव होऊ शकतो काय ? या संदर्भातील माहिती केंद्र सरकार किंवा राज्य सरकार यांनी आजपर्यंत दिलेली नाही तरी या संदर्भात शासनाने काय पावले उचलेली आहेत याबाबतची माहिती मंत्री महोदय देतील काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या यांनी सांगितलेली माहिती खरी आहे. कारण आपण 70 अंश सेल्सिअस् पर्यंत चिकन शिजविण्याअगोदर ते आणणे व त्याचे तुकडे करणे यामुळे त्या रोगाची लागण होऊ शकते यासाठी "टॅमी फ्लू " च्या रोग प्रतिकारक गोळया नवापूर येथील 10 किलोमिटरच्या परिसरामध्ये शासनातर्फे मोफत वाटण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भातील प्रचार आम्ही केलेला आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून माझा शासनाला असा प्रश्न आहे की, कोंबडी मारल्यानंतर पोल्ट्री फार्म मालकास त्याची भरपाई म्हणून प्रति कोंबडी 40 रुपये देण्याचे जाहीर केलेले आहे. परंतु त्या पोल्ट्री फार्म मालकांकडे जे रोजंदारीवर काम करणारे कर्मचारी होते त्यांना त्यातील एक पैसाही मिळालेला नाही. हे मजूर आजूबाजूच्या परिसरातील आदिवासी लोक आहेत, त्यांनी तेथे आपला जीव धोक्यात घालून त्या कोंबडया मारण्याचे काम केलेले आहे. रोजंदारीवर हे आदिवासी लोक काम करीत होते. या लोकांना मदत देण्याचा शासनाने विचार केलेला आहे काय ? तसेच माझा दुसरा प्रश्न असा आहे की, नवापूर येथे 7 फेब्रुवारी, 2006 रोजी नवापूर नगरपालिकेच्या हद्दीमध्ये 8-10 किलोमिटरच्या परिसरात 700 ते 800 कोंबडया मरुन पडल्याची तक्रार तेथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी व्हीडीओ फिल्म काढून तहसिलदार यांना सादर केली होती, तसेच ती आपल्या अधिकाऱ्यांना सुध्दा सादर केली होती काय ? या संदर्भात काय कार्यवाही केलेली आहे असा माझा प्रश्न आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पोल्ट्री फार्म मालकांकडे जे मजूर आहेत ते शासनाचे मजूर नाहीत तर खाजगी पोल्ट्री फार्म मालकांचे आहेत. शासनाने पोल्ट्री फार्म मालकांना नुकसान भरपाई दिलेली आहे.

श्री. विनोद तावडे : पोल्ट्री फार्मवर रोजंदारीवर मजूर होते त्यांना आपण मदत देणार आहात काय असा माझा प्रश्न आहे ?

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : ते खाजगी पोल्ट्री फार्मचे मजूर होते, ते शासनाचे नोकर नाहीत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, पोल्ट्री फार्म सुध्दा खाजगी आहेत, म्हणून तेथील मजूरांना सुध्दा शासनाने पैसा द्यावयास पाहिजे ? मी 7 फेब्रुवारी, 2006 च्या संदर्भात प्रश्न विचारला होता त्यांचे सुध्दा उत्तर दिलेले नाही ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, त्याच संदर्भात मी उत्तर देत आहे. ज्यावेळी वर्तमानपत्रामध्ये ही बातमी आली तेव्हा लगेच शासनाकडून योग्य ती पावले उचलण्यात आलेली आहेत. ज्या ज्या वेळी "बर्ड फ्लू " ची साथ येईल त्यावेळी 50 टक्के मदत केंद्र सरकार व 50 टक्के मदत राज्य सरकार करणार आहे. हा रोग जनतेमध्ये पसरू नये म्हणून सदर कोंबडया ताबडतोब मारुन टाकण्यात आलेल्या आहेत. जर सदर पोल्ट्री फार्म मालकांनी मजूरांना मजूरी दिली नसेल तर तसे आदेश त्यांना देण्यात येतील व मजूरांना मजूरी मिळेल असे पाहण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, ज्या ज्या वेळी नैसर्गिक आपत्ती येते त्यावेळी ते खाजगी मालक होते की, सरकारी होते यांचा कोणताही विचार न करता मदत देण्याची भूमिका शासनाकडून घेण्यात येते. मग तेव्हा केंद्र सरकार मदत देवो किंवा राज्य सरकार मदत देवो. ज्या कोंबडया मारलेल्या आहेत त्या पोल्ट्री फार्म मालकांना मदत दिलेली आहे त्याबाबत मी शासनाचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री. सांगळे.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे ...

माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, अशाप्रकारे पूर्वी कोंबडया झिमायला लागत असत त्यावेळी त्या मरतील म्हणून मरण्यापूर्वीच मारुन खाल्ल्या जायच्या. त्या कोंबडयांना कोणत्या रोगाची लागण झाली असावी, तसेच आज बर्ड फ्ल्यू च्या रोगाची मेडियाने बरीच प्रसिध्दी केली आहे. आज आपल्या देशात अनेक मल्टी नॅशनल कंपन्या येत आहेत. त्या कंपन्यांचा फायदा होण्यासाठी हे सर्व केले जात आहे किंवा कसे ?

श्री.हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी उपस्थित केलेल्या पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, त्यावेळी कोंबडयांना दैवी व राणीखेत या रोगांची लागण झालेली असावी. दुस-या प्रश्नाच्या संदर्भात या ठिकाणी माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही.

श्री.सागर मेघे : बर्ड फ्ल्यू या रोगामुळे 14.13 लाख एवढी अंडी नष्ट करण्यात आली त्यांना शासनाकडून काही मदत दिली जाणार आहे काय ? ज्या ठिकाणी कोंबडयांना बर्ड फ्ल्यू रोगाची लागण झाली तेथे असलेल्या कोंबडया नष्ट करुन शासनाकडून प्रति कोंबडी रु.40 एवढी मदत करण्यात आली. परंतु ज्या ठिकाणी बर्ड फ्ल्यू रोगाची लागण झालेली नसताना सुध्दा तेथील कोंबडया व अंडी विकली जात नाहीत. बॉयलर कोंबडया एक सव्वा महिन्यात पूर्णपणे तयार होऊन विकल्या जातात. बॉयलर कोंबडया एक सव्वा महिन्यापेक्षा जास्त काळ ठेवल्यास त्या जास्त अन्न खातात. परंतु आजच्या परिस्थितीत बर्ड फ्ल्यू रोगाची लागण झालेली नसताना सुध्दा बॉयलर कोंबडया विकल्या जात नसल्यामुळे पोल्ट्री मालक स्वत: कोंबडया नष्ट करीत आहेत. त्यामुळे पोल्ट्री फार्मच्या धंद्यामध्ये मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत कोंबडयांना खाद्य म्हणून देण्यात येणा-या फिडसाठी शासनाकडून सबसिडी देण्यात येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सन्माननीय सदस्य श्री.सागर मेघे यांनी उपस्थित केलेल्या पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात नष्ट केलेल्या अडयांच्या संदर्भात मदत करण्यासाठी शासनाकडून विचार केला जाईल. दुस-या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, बर्ड फ्ल्यू या रोगाची लागण न झालेल्या भागांमध्ये कोंबडया व अंडी घेण्यास कोणी तयार नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा पोल्ट्री धारकांना आधार देण्यासाठी शासनाकडून गांभीर्याने विचार केला जाईल. तिस-या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, 2,53,063 कोंबडया नष्ट केल्यानंतर पोल्ट्री धारकांना प्रती कोंबडी रु.40 प्रमाणे मदत करण्यात आली आहे व 70,612 कोंबडया नष्ट करण्यापूर्वीच घरात असलेल्या या प्रति

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सागर मेघे ...

कोंबडयांसाठी रु.40 प्रमाणे मदत करण्यात आली आहे आणि शेवटच्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी पोल्ट्री फार्मधारकांशी चर्चा करु त्यावेळी शासनाच्यावतीने कोंबडयांना खाद्य म्हणून देण्यात येणा-या फिडबाबत सबसिडी देता येईल किंवा कसे ? याबाबत विचार करण्यात येईल.

(यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, या बर्डफ्ल्यूचा प्रसार करणारे जे विषाणू आहेत ते मारण्यासाठी डब्ल्यूएचओने एक डिस्इन्फिक्टंट, एन्रोविन नावाचे औषध सांगितले आहे. ते मारले तर हा रोग आटोक्यात येऊ शकतो असे डब्ल्यूएचओचे म्हणणे आहे. तर महाराष्ट्रातील सर्व पोल्ट्री उद्योजकांना हे डिस्इन्फिक्टंट मारण्याचे बंधन शासन घालणार आहे का ? आणि दुसरे म्हणजे जळगाव, धुळे या भागामध्ये हा रोग पसरल्याने महाराष्ट्रातील तमाम पोल्ट्री उद्योग संकटात सापडला आहे. त्यांच्याकडील कोंबड्यांची विक्री ही अवघी 10-20 टक्क्यावर आली आहे. राज्यातील इतरत्र भागामध्ये बर्डफ्ल्यू आलेला नसतानाही तेथील पोल्ट्री उद्योगावर परिणाम झालेला आहे आणि त्याचा मोठा फटका या उद्योजकांना बसलेला आहे. तेव्हा शासन त्याची जबाबदारी स्वीकारणार काय ? तसेच यामुळे ज्यांचे धंदे डबघाईला आलेले आहेत, उदा. पुण्याला तर काही लोकांनी या संदर्भात मार्चासुद्धा काढला होता. तर या उद्योगातील लोकांना शासन मदतीचा हात पुढे करणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, जरूर आपण सांगितले त्याप्रमाणे निश्चितपणे विचार करण्यात येईल. त्यानंतर दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना मी सांगू इच्छितो की, याबाबत मी मघाशीच सांगितले आहे की, ज्या भागामध्ये बर्डफ्ल्यूचा प्रसार झालेला नाही पण त्याच्या भीतीमुळे तेथील पोल्ट्री उद्योग उध्वस्त झालेला आहे वा होत आहे त्यांना एकत्र करून राज्य सरकार आणि केंद्र सरकार मिळून त्यांच्याबाबतीत जरूर विचार करील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सहा महिन्यांपूर्वी जागतिक आरोग्य संघटनेने भारतामध्ये आणि विशेषतः महाराष्ट्रामध्ये बर्डफ्ल्यू येणार आहे अशी धोक्याची सूचना दिली होती काय ? आणि या बाबतीत डॉ.स्वाती पिरामल यांनी देखील शासनाला कळविले होते की, अशा अशा प्रकारचा रोग येणार आहे. हे खरे आहे काय ? असेल तर त्याबाबत शासनाने काय कारवाई केली वा खबरदारी घेतली ? तसेच किती लोकांना या रोगाची लागण झालेली आहे ? आणि आपल्याकडे प्रतिबंधक गोळ्यांचा साठा किती आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या रोगाची माहिती सहा महिन्यापूर्वी जागतिक आरोग्य संघटनेकडून आपल्याला देण्यात आली होती किंवा काय याची माहिती आता माझ्याकडे नाही, ती माहिती मी जरूर पटलावर ठेवीन. तसेच असा इशारा आपल्याला आलेला असतानाही

..... व्ही 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्या अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आहे त्यांच्यावर देखील कठोर कारवाई करण्यात येईल. दुसरे म्हणजे यासाठी प्रतिबंधक औषधाचा पुरेसा साठा आपल्याकडे आहे. तसेच ज्या 18 जणांचे नमुने घेतले होते त्यांची तपासणी करता या 18 जणांना या रोगाची लागण झाली नसल्याचे सिद्ध झाले आहे.

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांनी जो प्रश्न येथे उपस्थित केला त्याबाबतच मला येथे प्रश्न विचारावयाचा आहे. हा रोग फैलावल्यामुळे खरोखरी हा रोग झालेला आहे किंवा काय याबाबत दोन मते आहेत. त्यातील सत्य समजून घेण्यासाठी आपण काही नमुने लंडनला पाठविले आहेत असे खात्याच्या मंत्र्यांनी मध्यंतरी सांगितले होते पण त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी मात्र सांगितले की, असे कोणतेही नमुने लंडनला पाठविलेले नाहीत. तेव्हा याबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे, ते नमुने नेमके कोठे तपासणीसाठी पाठविले आहेत याचा खुलासा होणे आवश्यक आहे. तरी तो खुलासा माननीय मंत्री महोदय करतील का ?

श्री. अनिस अहमद : सभापति महोदय, हिन्दुस्तान में सबसे बड़ी प्रयोगशाला भोपाल में है. महाराष्ट्र में इस प्रकार की प्रयोगशाला नहीं है. हमने पहले सेम्पल पुना में भेजे थे, वहां पर जांच के बाद पता चला कि " रानीखेत " रोग है. चूंकि महाराष्ट्र में ऐसी कोई प्रयोगशाला नहीं है, जहां जांच करके बताया जा सके कि बर्ड फ्ल्यू है या नहीं. एव्हीएन इन्फ्लूएन्जा और बर्ड फ्ल्यू एच 1 से एच 9 तक इन सब की जांच भोपाल के प्रयोगशाला में ही हो सकती है इसलिए 3000 सेम्पल भोपाल की प्रयोगशाला में भेजे गए हैं. भोपाल की प्रयोगशाला जांच करके जो बताती है वह सही है.

(यानंतर श्री. सरफरे ... डब्ल्यू 1 ..

अशुद्धारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, नंदूरबार व जळगाव या दोन जिल्हयामध्ये कोंबडयांना बर्ड फ्लू झाला. परंतु त्याचा मानसिक परिणाम संपूर्ण देशभर झाला. हवाई सेवेमध्ये चिकन देणे बंद करण्यात आले, हॉटेलमध्ये चिकन खायला मिळत नाही. आज गोव्याच्या मार्केटमध्ये महाराष्ट्रातील कोंबडयांना बॅन आणला आहे. त्यामुळे पोल्ट्री उद्योग धंद्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. तेव्हा ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना भरपाई देणे शासनाचे काम आहे. जळगाव व नवापूरमधील नव्हेतर कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील पोल्ट्री व्यवसाय बंद पडायला लागला आहे. त्यासाठी शासन काय उपाय योजना करीत आहे. त्यांनाही आपण नुकसान भरपाई देणार आहात काय?

श्री. अनिस अहमद : मैं इस संबंध में यह जानकारी देना चाहता हूं कि जलगांव में बर्ड फ्ल्यू की रोकथाम का काम पूरा हो गया है. जलगांव की जिम्मेदारी पूरी हो गई है. दूसरी बात यह है कि महाराष्ट्र के अन्य जिलों में जैसे कि कोल्हापुर में मुर्गियों में बर्ड फ्ल्यू का प्रादुर्भाव नहीं हुआ है. लेकिन लोगों ने मुर्गी एवं अंडा खाना बंद कर दिया है. जिसकी वजह से पोल्ट्री फार्म में दो-तीन रुपये में मुर्गियां बिक रही है. मुर्गियों को खाने के लिए जो हाई प्रोटीन फुड दिया जाता है, उस पर प्रति मुर्गी दो रुपये खर्च होता है. ऐसे कई पोल्ट्री फार्म है जिनके पास दो दो लाख मुर्गियां हैं, जिन पर उन्हें हर दिन दो-दो लाख रुपये खर्च करने पड़ रहे हैं. जिससे उन्हें भारी नुकसान उठाना पड़ रहा है. अतः पोल्ट्री फार्म वालों ने सरकार से निवेदन किया है कि उनकी सहायता की जाए. मैं यह बताना चाहता हूं कि सरकार पोल्ट्री फार्म बचाने के बारे में विचार कर रही है. सरकार मदद करने की दृष्टि से सोच रही है. सरकार योजना बना रही है. केबिनेट की बैठक में इस संबंध में सारी बातों पर चर्चा होगी. मैं इस बारे में सदन में बताऊंगा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्ले□

पृ.शी. : मुंबईतील डेव्हीड ससून या ग्रंथालयास शासनाकडून आर्थिक मदत न मिळणे.

मु.शी. : मुंबईतील डेव्हीड ससून या ग्रंथालयास शासनाकडून आर्थिक मदत न मिळणेबाबत माननीय सदस्य श्री. विलास अवचट यां□ दिलेली विशेष उल्ले□ची सूच□.

उपसभापती : माननीय सदस्य श्री. विलास अवचट यां□ ए□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विलास अवचट (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"136 वर्षांचा सांस्कृतिक आणि ज्ञानवारसा लाभलेले मुंबईतील डेव्हीड ससून हे जुने ग्रंथालय राज्य आणि केंद्र शासनाकडून आर्थिक मदत मिळण्याच्या अपेक्षित असणे, याकरीता अनेक वेळा मुख्यमंत्र्यांकडे आर्थिक मदतीसाठी विनंती अर्ज करुनही अद्यापपर्यंत कोणतीच आर्थिक मदत मिळाली नसणे, याबाबत शासनाची भूमिका".

सभापती महोदय, या ग्रंथालयास आर्थिक मदत मिळावी म्हणून राज्य शासनाच्या उच्च पदस्थांशी संपर्क साधण्यात आला होता. मात्र सरकारकडून या ग्रंथालयाला कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत अजून प्राप्त झालेली नाही. या ग्रंथालयाच्या नूतनीकरणाचा पहिला टप्पा अलिकडच्या काळात पूर्ण करण्यात आला. त्याकरीता सर्वसामान्य मुंबईकर, या ग्रंथालयाचे सदस्य, व्यापारी व औद्योगिक कंपन्यांनी आर्थिक सहाय्य केले. संस्थेकडे असलेल्या दुर्मिळ पुस्तकांचे जतन व संरक्षण करण्यासाठी ग्रंथालयाच्या नूतनीकरणाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी हे ग्रंथालय आर्थिक मदतीच्या प्रतिक्षेत आहे. यापूर्वीच्या दोन्ही माननीय मुख्यमंत्र्यांकडे आर्थिक मदतीकरीता संपर्क साधण्यात आला होता. परंतु या ग्रंथालयाला राज्य व केंद्र सरकारकडूनही आर्थिक मदत मिळत नाही. ही मदत मिळाल्यास पुस्तकांचे व अन्य दस्तावेजांचे मायक्रोफिल्मिंग तसेच अंतर्गत दुरुस्ती, नूतनीकरण, नव्या पुस्तकांच्या खरेदी करावयाच्या तरतुदीत वाढ करणे सोपे होईल. याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयांचा पर्यटन विकास करण्यासाठी मुंबई-गोवा महामार्गाला पर्यटन महामार्गाचा दर्जा देणे

मु.शी. : सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयांचा पर्यटन विकास करण्यासाठी मुंबई-गोवा महार्गाला पर्यटन महामार्गाचा दर्जा देण्याबाबत माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयाचा विकास करण्यासाठी या जिल्हयातील पर्यटनाचा विकास करणे आवश्यक आहे. यासाठी मुंबई गोवा महामार्गाला पर्यटन महामार्गाचा दर्जा दिल्यास पर्यटन व या भागातील निर्यात होत असलेली उत्पादने उदा. आंबा, काजू, मत्स्य व्यवसाय इत्यादी व्यवसायाला चालना मिळेल. या ठिकाणी सी.आर.झेड. च्या निर्बंधामुळे सप्त तारांकित, पंचतारांकित हॉटेल होऊ शकत नसल्याने तेथे न्याहरी निवासासारख्या योजना कार्यान्वित करुन त्यास 1/9 भागभांडवल द्यावे तसेच बचत गटातून न्याहरी निवास बांधून त्यास 25 टक्के अनुदान द्यावे.

आरवली, वेळागर, मिठबांव, तारकर्ली इत्यादी गावांना पर्यटन ग्राम करुन तेथे सांस्कृतिक केंद्र, हस्तकला केंद्र, जलक्रीडा केंद्र या सारखे पर्यटकांना आकर्षित करणारे प्रकल्प राबवून त्या योगे त्या गावांचा विकास होऊन तेथे रोजगार निर्मिती होऊ शकेल.

सावंतवाडी येथील राजवाडयांचा विकास करुन तेथे हेरिटेज केंद्र स्थापन करण्यात यावे. त्याचप्रमाणे आंबोली येथील माजी सैनिक संघटना संचलित ॲडव्हेंचर व स्पोर्ट ॲकडमीला भरीव आर्थिक तरतूद देऊन आंबोली चौकुलगेळे क्षेत्राला पर्यटन प्राधिकरण स्थापन करण्यात यावे.

तसेच, सिंधुदुर्ग महोत्सव, आंबा महोत्सव हे शासन स्तरावर अथवा खाजगी कंपनीच्या सहकार्याने साजरे करुन येथील पर्यटनाला व्यापक स्वरुपात वाव देऊन पर्यटनाच्या बाबतीत अग्रेसर असलेल्या कोकण विभागात रोजगार निर्मिती करुन उपाय योजना करण्याची आवश्यकता यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

सभापती महोदय, कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयाचा विकास करण्यासाठी या जिल्हयातील पर्यटनाचा विकास करणे आवश्यक आहे. आणि म्हणून सर्वप्रथम मुंबई ते गोवा हा सागरी महामार्ग पर्यटन महामार्ग म्हणून घोषित करुन हा रस्ता चौपदरी करुन ताबडतोब पूर्ण करण्यात यावा. त्याचप्रमाणे या रस्त्याच्या आजूबाजूला जी बंदरे आहेत त्यांचाही विकास करण्यात यावा. त्याचबरोबर या भागातील आंबा, काजू व इतर फलोत्पादनावर प्रक्रिया करुन त्यांची निर्यात करण्यासाठी मोठया प्रमाणात काम होऊ शकते ते केले पाहिजे. सी.आर.झेड. च्या प्रश्नामुळे कोकण किनाऱ्यावर एकही हॉटेल उभे राहू शकत नाही. त्यामुळे सी.आर.झेड. च्या निर्बंधाबाबत पर्यटन व्यवसायाच्या दृष्टीने निर्णय घेतला गेला पाहिजे. त्याचप्रमाणे न्याहरी निवास योजनेसारख्या योजना कार्यान्वित करण्यासाठी ग्राम पर्यटनाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.आज भारतामध्ये 52 ग्राम पर्यटन प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये कोकणात नव्हेतर महाराष्ट्रात एकही प्रकल्प घेण्यात आलेला नाही. अशाप्रकारे बचत गट बनवून ग्राम पर्यटनाचा कार्यक्रम दोन्ही जिल्हयामध्ये कार्यान्वित करण्यात यावा.

(यानंतर श्री. किल्लेदार...)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत (पुढे सुरु.....

औद्योगिक पर्यटन सहकारी संस्था आहेत, त्यांना देखील 1:9 भागभांडवल देण्याचा कार्यक्रम करुन त्या औद्योगिक सहकारी संस्थांना चालना देण्याचा प्रयत्न करण्यात यावा. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील आरवली, वेळागर, मिळबाव, तारकर्ली गावे आहेत. त्यांना 'पर्यटन ग्राम' म्हणून जाहीर करुन त्या गावामध्ये सांस्कृतिक केंद्र, हस्तकला केंद्र, जलक्रिडा केंद्र निर्माण करावीत. पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी भारतीय संस्कृतीचे प्रदर्शन व दर्शन घडविण्यासाठी ही गावे 'पर्यटन ग्राम' म्हणून जाहीर करुन त्या गावांचा विकास करण्याचा प्रयत्न करावा. म्हणजे त्या ठिकाणी प्रचंड रोजगार निर्मिती होऊ शकेल.

त्याचप्रमाणे सावंतवाडी येथील राजवाडयांचा विकास करुन त्या ठिकाणी हेरिटेज केंद्र स्थापन करण्यात यावे. तसेच आंबोली येथील माजी सैनिक संघटना संचलित ॲडव्हेंचर स्पोर्ट अकॅडमीला भरीव आर्थिक तरतूद कोकण पॅकेजमध्ये केली होती, परंतु आजतागायत ही आर्थिक मदत मिळालेली नाही. त्यांना ही आर्थिक मदत पोहोचवावी. त्याचबरोबर गोव्यामध्ये किंवा परदेशामध्ये या भागातील मार्केटिंगची योजना तयार करण्यात यावी. त्याचबरोबर पर्यटनाच्या दृष्टीने सिंधुदूर्ग किल्ल्याचा देखील विकास करण्यात यावा. तसेच सिंधुदूर्ग महोत्सव, आंबा महोत्सव हे शासन स्तरावर अथवा खाजगी कंपनीच्या सहकार्याने साजरे करुन, तेथील पर्यटनाला व्यापक स्वरुपात वाव देऊन पर्यटनाच्याबाबतीत अग्रेसर असलेल्या कोकण विभागात रोजगार निर्मिती करुन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

--

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/

पृशी. : तंत्र शिक्षण विभागातील सेवकांना आकृतीबंध लागू करणे.

मु.शी. : तंत्र शिक्षण विभागातील सेवकांना आकृतीबंध लागू करणे,याबाबत श्रीमती संजीवनी रायकर,वि.प.स.यां□ दिलेली विशेष उल्ले□ाची सूच□.

उपसभापती : मा□□य सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

"महाराष्ट्रातील तांत्रिक शिक्षण विभागातील सेवकांसाठी नवा आकृतीबंध लागू करण्याबाबतचे पत्र सर्व शाळांमध्ये पोहोचले आहे. हा अभ्यासक्रम जसाच्या तसा लागू केल्यास सुमारे 45 टक्के कर्मचारी अतिरिक्त ठरतील अशी भीती कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा व सार्वजनिक हिताचा असल्यामुळे तो मी आज सभागृहात "विशेष उल्लेखा"द्वारे मांडू इच्छिते.

सभापती महोदय, दिनांक 16 मे 2001 ला सर्व शाळांना परिपत्रक काढण्यात आले आणि त्यानुसार नवीन आकृतीबंध लागू करण्याचे ठरले. यामुळे कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. आकृतीबंध जसाच्या तसा वापरला तर तांत्रिक शिक्षण विभागातील सुमारे 45 शिक्षक हे अतिरिक्त होणार आहेत. नवीन तुकडी काढण्यासाठी किती संस्था तयार होणार आहेत ? याची शंका आहे. शिक्षक अतिरिक्त झाले तर उर्वरित शिक्षकांवर त्याचा भार पडेल. शिवाय त्या विद्यार्थ्यांना पर्टीक्युलर विषयाचे ज्ञानही मिळणार नाही. असे सांगितले जाते की, त्यांना एक महिना प्रशिक्षण देणार. त्यांना एक महिन्याचे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांचे समाधान हे शिक्षक करु शकतील काय ? हा प्रश्न आहे. त्यामुळे बरेचसे विद्यार्थी या तंत्रशिक्षण विभागामध्ये प्रवेश घेणार नाहीत. शिक्षकांमध्ये विषयाची गोडी, कौशल्य निर्माण व्हायला पाहिजे. नवीन आकृतीबंधाच्या संबंधात एकदा चर्चा झालेली आहे, पण अजूनही शिक्षकांचे समाधान होत नाही. तेव्हा परत एकदा विचार व्हावा आणि मग तो आकृतीबंध लागू करावा अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/ KGS/ MHM/

पृशी. : रायगड जिल्ह्यातील (ता.मुरुड) फणसाड अभयारण्यालगत सोडण्यात आलेल्या बिबट्यांनी पाळीव जनावरांना ठार मारणे, यामुळे तेथील विद्यार्थ्यांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण.

मु.शी. : रायगड जिल्ह्यातील (ता.मुरुड) फणसाड अभयारण्यालगत सोडण्यात आलेल्या बिबट्यांनी पाळीव जनावरांना ठार मारणे, यामुळे तेथील विद्यार्थ्यांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"रायगड जिल्ह्यातील (ता.मुरुड) फणसाड अभयारण्यालगत असलेल्या वडघर, सुपेगांव आणि शेजारच्या भागात अभयारण्यामध्ये सोडण्यात आलेल्या एका बिबट्याने धुमाकूळ घालून 7 जनावरांना ठार करणे, या जनावरांत 4 दुभत्या गाई व तीन बैलांच समावेश आहे. याबाबत शेतकऱ्यांनी तेथील वन संरक्षकांकडे तक्रार केली असता, वन संरक्षकांनी शेतकऱ्यांना योग्य उत्तरे न देता तुमच्या जनावरांचा तुम्हीच बंदोबस्त करा, असे म्हटले आहे. सुपेगाव, वडघर व आजुबाजूच्या भागातील अनेक विद्यार्थी यशवंतनगर पंचक्रोशीतील शाळांतून शिकण्यासाठी मुरुडकडे जात असताना त्या विद्यार्थ्यांना या जंगल रस्त्याने येताना धोका निर्माण झाला आहे.

वन संरक्षकांकडून मिळालेली उर्मट उत्तरे, शेतकऱ्यांचे झालेले आर्थिक नुकसान आणि विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण यामुळे येथील नागरिकांत असंतोष पसरला आहे. तरी या घटनेकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी.: भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील सर्वेक्षकांना पदोन्नतीच्या संधी देऊन आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत.

मु. शी.: भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेतील सर्वेक्षकांना पदोन्नतीच्या संधी देऊन आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यां□□ ए□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या अनेक विभागांमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जी दुरावस्था ओढवलेली आहे, आंधळं दळतय आणि कुत्र पीठ खातय अशी जी अवस्था निर्माण झालेली आहे त्यासंदर्भात आपल्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

" पाणीपुरवठा आणि स्वच्छता या विभागांतर्गत येणाऱ्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेत "सर्वेक्षक" पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी नाही. इतर सर्व विभागात कालबध्द पदोन्नतीची व्यवस्था आहे. सदर जागेवर सर्वेक्षक पदी नियुक्ती झाल्यापासून निवृत्त होईपर्यंत या सर्वेक्षकांना पदोन्नती व वाढीव वेतनश्रेणीचा लाभ देण्यात येत नाही. हा अन्याय मागील अनेक वर्षांपासून सुरु आहे. सदर बाब माननीय संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांनी उपसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि. 4.8.2003 चे पत्र क्र. आस्था 2 / प्र.क्र.1 / सर्वेक्षण 5957 / 2003 व्दारे निदर्शनास आणून देऊन सर्वेक्षकांना सुधारित वेतनश्रेणी रुपये 5000-8000 मंजूर करावी, त्याचप्रमाणे आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यासाठी या संवर्गासाठी रुपये 5500-9000 ही वेतनश्रेणी ठेवण्यात यावी अशी शिफारस करण्यात येऊन सुध्दा मागील तीन वर्षापासून सदर प्रकरण शासनाकडे प्रलंबीत आहे. शासनाने यावर त्वरित कारवाई करावी अशी विनंती या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अठराव्या राष्ट्रकुल स्पर्धेत कोल्हापूरच्या तेजस्विनी सावंत हिने शूटिंग स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविल्याबाबत.

मु. शी. : अठराव्या राष्ट्रकुल स्पर्धेत कोल्हापूरच्या तेजस्विनी सावंत हिने शूटिंग स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविल्याबाबत श्री. जितेंद्र आव्हाड वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : महोदय, या विशेष उल्लेखमध्ये मी जो विषय दिलेला आहे तो विषय मी मघाशी औचित्याच्या मुद्याव्दारे सभागृहात उपस्थित केलेला आहे.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पणन मंडळाने आंबा निर्यात करण्यासाठी ठोस पाऊल उचलणे

मु. शी. : पणन मंडळाने आंबा निर्यात करण्यासाठी ठोस पाऊल उचलणे याबाबत कर्नल सुधीर सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य कर्नल सुधीर सावंत यां□ ए□ विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : महोदय, मी पुढील विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ मांडतो.

" कोकणातला आंबा आज जगप्रसिध्द आहे. गेल्या जूनमध्ये जपानचे पंतप्रधान यांना भेटून जपानमध्ये आंब्यावरची बंदी शिथिल करावी अशी मागणी करण्यात आली. तसेच अमेरिकेलाही विनंती करण्यात आली. त्याप्रमाणे दोन्ही देशांनी आंब्यावरची बंदी उठवली आहे. तरी देखील पणन मंडळाने या गोष्टीचा फायदा घेऊन आंबा निर्यात करण्यासाठी ठोस अशी पाऊले उचललेली नाहीत. तरी दोन्ही देशांमध्ये आंबा निर्यातीला प्रोत्साहन मिळण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात यावी. यासाठी आंबा बागायतदारांना आपल्या मालासकट जपान व अमेरिकेला जाण्यासाठी सर्व खर्च शासनाने द्यावा, खरेदी-विक्री भेटीचे आयोजन दोन्ही देशांमध्ये करण्यात यावे, उत्कृष्ट अशी पॅकींगची सोय करण्यात येणे, प्रिंटींग व पब्लिसिटीचा सर्व खर्च देण्यात यावा, ह्या बाबी आंबा निर्यातीसाठी करणे गरजेचे आहे व शासनस्तरावर यासाठी प्रयत्न व्हावे, यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना देण्यात येत आहे."

सभापती महोदय, कोकणामध्ये आंबा हे प्रमुख पीक आहे. जपान आणि अमेरिकेमध्ये आंब्यावर जो बॅन होता तो आताच त्यांनी उठविलेला आहे. गेली अनेक वर्षे प्रयत्न करुनही कोकणातील आंब्याला निर्यात बाजार मिळवून देण्यामध्ये शासन अपयशी राहिलेले आहे. केंद्र सरकारच्या मदतीने पणन मंडळाने निर्यात करण्याची व्यवस्था पूर्णपणे प्रस्थापित करावी. आजच्या परिस्थितीमध्ये बोटीने आंबा निर्यात करण्यासाठी कंटेनर्सची व्यवस्था करण्यात आलेली नाही. म्हणून शासनाने आंबा निर्यात करण्यासाठी एक विशेष कार्यक्रम जाहीर करावा आणि ठोस पावले उचलावीत आणि जास्तीत जास्त आंबा कसा निर्यात होईल याकडे लक्ष द्यावे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>कामकाजपत्रिकेवर दराखविण्यात आलेल्या विधेयकाबाबत</u>

श्री. मधुकर सरपोतदार : अध्यक्ष महाराज, आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या विधेयक क्रमांक 1, 11 आणि 10च्या संदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही विधेयके या विधानपरिषदेमध्ये दिनांक 16 मार्च 2006 रोजी मांडण्यात आली. त्यानंतर एकच दिवस मध्ये जाऊन आज ही विधेयके चर्चेला आलेली आहेत. हे नियमामध्ये बसते काय ? या सदनातील कामकाज नियमाप्रमाणे व्हावे अशी आमची अपेक्षा आहे. तेव्हा आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेली विधयक क्रमांक 1, 11, आणि 10 ही आज चर्चेसाठी घेऊ नयेत. नियमांचे पालन करुन ती चर्चेला घ्यावीत अशी माझी सदनाला विनंती आहे.

उपसभापती : कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे कामकाज घेतलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : कामकाज सल्लागार समितीमध्ये विधेयके घेण्याचे ठरले आहे. परंतु कोणती विधेयके घ्यावीत हे ठरलेले नाही. चर्चेच्या आधी ही विधेयके किमान आम्हाला वाचायला तरी मिळाली पाहिजेत. विधेयके सभागृहामध्ये चर्चेला येण्यापूर्वी ती माननीय सदस्यांना किमान 10 दिवस तरी अगोदर मिळाली पाहिजेत अशा आशयाचे पत्र माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दिलेले आहे.

उपसभापती : ही विधेयके विधानसभेने मंजूर केलेली आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : विधानसभेने मंजूर केलेली विधेयके विधानपरिषदेमध्ये 16 तारखेला मांडण्यात आली. विधेयकावर चर्चा करण्यासाठी ती विधेयके आम्हाला काही दिवस आधी मिळाली पाहिजेत अशी आमची विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : आम्हाला चेर्चेच्या आधी 10 दिवस विधेयके द्यावीत असे पत्र मी प्रधान सचिवांना दिलेले आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी पत्र दिलेले असले तरी कामकाजाच्या संदर्भात माननीय सभापतींनी निर्णय घेतलेला आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : ही विधेयके आम्ही वाचलेली नाहीत. नियमाला सोडून कामकाज करावयाचे असेल तर तसा निर्णय आपण घ्यावा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : यातील 11 नंबरचे जे विधेयक आहे त्यामध्ये "शासनाने 3 महिन्याच्या आत निर्णय घ्यावा" एवढेच वाक्य समाविष्ट करावयाचे आहे. तेव्हा हे विधेयक चर्चेला घेण्यास माननीय सदस्यांनी सहकार्य करावे अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार हे या सदनातील ज्येष्ठ सदस्य आहेत. मला त्यांचे म्हणणे मान्य आहे. कार्यक्रम जाहीर झालेला आहे. तेव्हा केवळ आजच्या कामकाजाच्या बाबतीत माझी माननीय सदस्यांना अशी विनंती आहे की, आजचे कामकाज आपण घ्यावे. माननीय सदस्यांनी केलेली सूचना मी माननीय सभापतींच्या निदर्शनास आणून देईन.

श्री. विलास अवचट : गेली 2 वर्षे या सदनामध्ये अशा प्रकारची विधेयके आल्यानंतर आणि माननीय सदस्यांनी विधेयके आधी देण्याची मागणी केल्यानंतर आजच्यापुरते कामकाज करावे, पुढच्या वेळेपासून विधेयके आधी दिली जाण्याची व्यवस्था केली जाईल असेच माननीय सभापतींनी सांगितलेले आहे.

श्री. अरविंद सावंत : कामकाज सल्लगार समितीमध्ये कोणकोणत्या क्रमांकाची विधेयके घेतली जावीत हे ठरविले गेले पाहिजे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सगळयात जास्त महत्वाचे जे बिल आहे ते चर्चेला घेऊ. सर्व सन्माननीय सदस्यांनी सहकार्य करावे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, कायदा करताना सहकार्य करा असे जर आपण म्हणत असाल तर ते आमच्यावर अन्यायकारक आहे. बिल पास करण्याची एवढी घाई आणि गडबड कशासाठी ? प्रत्येक बिलावर सविस्तर चर्चा होणार नसेल तर ते आमच्यावर अन्याय करण्यासारखे आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्हांला याबाबतीत आपला निर्णय अपेक्षित आहे.

उसभापती : आता 2 वाजून 16 मिनिटे झालेली आहेत. मध्यंतरानंतर 2.45 वा. सभागृह सुरु होईल. दरम्यानच्या काळात माझी सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार,मधुकर चव्हाण,डॉ.दीपक सावंत यांना विनंती आहे की, त्यांनी माननीय सभापतींच्या दालनात यावे मी स्वत:ही येतो आणि आपण या बिलांच्या संदर्भात आपली भूमिका मांडावी.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.45 वा. पुन: भरेल.

(2.17 ते 2.45 मध्यंतर)

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. म्हणून सभागृहाची बैठक कॅबिनेट मंत्री उपस्थित होईपर्यंत स्थगित करावी, अशी आमची विनंती आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवरुन बोलत असतात.)

उपसभापती : ठीक आहे, मी सभागृहाची बैठक 2 वाजून 50 मिनिटांपर्यंत म्हणजेच तीन मिनिटांसाठी स्थगित करतो. या तीन मिनिटांच्या काळात जर माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित झाले नाहीत तर दिवसभरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 47 मिनिटांपासून दुपारी 2.50 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी मा.उपसभापती.)

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, तीन मिनिटांमध्ये तीन मंत्रिमहोदय सभागृहामध्ये उपस्थित झाले आहेत.

उपसभापती : तीन मिनिटांसाठी सभागृहाचे कामकाज आतापर्यंत कोणीही स्थगित केले नसेल. ते मी केले आहे, हे आपण सर्वांनी लक्षात घ्यावे. आज माननीय सभापतींच्या दालनात गट नेत्यांची बैठक घेतली असता विधेयक पुर:स्थापित झाल्यानंतर चार दिवसानंतर विचारार्थ घेण्यात यावे हा नियम यापुढे काटेकोरपणे पाळण्यात येईल,असे ठरले आहे. ईश्वर कृपेने हे सर्व पार पाडण्याची जबाबदारी कृपा करून माझ्यावर येता कामा नये. आता आपल्याला सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 1 - कारखाने (महाराष्ट्र सधारणा) विधेयक 2006 आणि सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 11 - महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) (सुधारणा) विधेयक, 2006 या दोन विधेयकांवर चर्चा करावयाची आहे. आता आपण शासकीय विधेयकांवरील चर्चेला सुरूवात करूया.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय कामगार मंत्री श्री.गणेश नाईक हे विधानसभेमध्ये आहेत. तेथे त्यांच्या विभागावर चर्चा सुरू असल्यामुळे आपण प्रथम सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक-11 चर्चेसाठी घ्यावे.

उपसभापती : ठीक आहे. आता सन 2006 च्या वि.प.वि.क्रमांक-11वर प्रथम चर्चा होईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) विधेयक.

L.C.BILL NO. XI OF 2006.

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA STATE ENTERPRISES (RESTRUCTURING AND OTHER SPECIAL PROVISIONS) ACT, 2000.)

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 11 - महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) अधिनियम 2000 यामध्ये सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

राज्य सार्वजनिक उपक्रमांची आर्थिकदृष्टया वृद्धी होण्यासाठी कोटेकोरपणे आर्थिक शिस्तीचे पालन करता यावे तसेच कार्यात्मकदृष्टया बळकट होण्यासाठी स्वत:चे पुनरुज्जीवन अथवा पुनर्संघटन व पुनर्रचना करता यावी यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने, शासनाला आणि राज्य सार्वजनिक उपक्रमांना अनिवार्य सल्ला व सहाय्य देण्याकरिता "महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना मंडळ" या नावाच्या एका तज्ज्ञ मंडळाची सेवा उपलब्ध करून देण्याच्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) अधिनियम, 2000 हा अधिनियमित केला आहे.

या अधिनियमातील कलम 15 मध्ये सुधारणा सुचविण्यात आली आहे. जो मूळ अधिनियम आहे, त्यातील कलम 15 मधील, पोट-कलम (2) मध्ये "अशा उपक्रमांना निदेश देणे" या मजकुराऐवजी "मंडळाचा अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत अशा उपक्रमांना निदेश देणे" अशी सुधारणा सुचविण्यात आली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक 11, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) (सुधारणा) विधेयक आणल्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. परंतु मी त्यांना विचारु इच्छितो की, राज्यामध्ये आज सार्वजनिक उपक्रम किती आहेत ? तुम्ही फक्त एवढीच सुधारणा आणली की, महामंडळाने उपक्रमांसंदर्भात जे प्रस्ताव आणले असतील त्याच्या पुनरुज्जीवनाच्या संदर्भात जे प्रस्ताव येतील त्यांना तीन महिन्यांच्या आत शासनाने निदेश द्यावेत. परंतु शासनाने निदेश दिल्यानंतर त्या सार्वजनिक उपक्रमांची परिस्थिती काय आहे हे पाहण्यासाठी मात्र आपल्याकडे कोणतीही पध्दत नाही. आपल्याकडे शेकडो महामंडळे आहेत. त्यांचे वार्षिक अहवालही सादर केले जातात. सार्वजनिक उपक्रम समितीच्या माध्यमातून सुध्दा अहवाल सादर केले जातात. समितीच्या अहवालामध्ये महामंडळासंदर्भात अनेक ताशेरे ओढलेले असतात. उपक्रमाच्या भ्रष्टाचाराबद्दल, व्यवस्थेबद्दल आणि कार्य पध्दतीबद्दल बोलले जाते. परंतु त्यावर कसल्याही प्रकारची कारवाई शासनामार्फत होत नाही हा आजचा अनुभव आहे. सगळी महामंडळे काय काय करतात हे पाहण्यासाठी मला वाटते एक ठरावच आणावा लागेल. मध्यंतरी काही सार्वजनिक उपक्रम राज्यात सुस्थितीत यावेत म्हणून शासनाने आदेश दिले होते. उदा. एस.टी.महामंडळाला शासनाने निदेश दिले होते की, महामंडळाकडे ज्या मोक्याच्या ठिकाणी जागा आहेत त्या बी.ओ.टी. तत्वावर देऊन त्यातून निधी उभारावा. वास्तविक पाहता महामंडळाला आर्थिक स्थिती प्राप्त व्हावी हा त्यामागील उद्देश होता. परंतु खरी गोम कोठे मारली हे मी तुम्हाला सांगतो. त्या आदेशामध्ये असा क्लॉज टाकला की, जे भूखंड कोटयावधी रुपयांचे असतील त्यापैकी 50 टक्के जागाच बी.ओ.टी. तत्वावर द्यावी, उर्वरित जमीन देता कामा नये. याबाबत संभाजी नगर येथील उदाहरण देता येईल. संभाजीनगर येथे एस.टी. महामंडळाचे वर्कशॉप आहे. या महामंडळाकडे 27 हजार चौ.मी.चा भूखंड मोक्याच्या ठिकाणी आहे. महामंडळाचे उपाध्यक्ष 16 ऑगस्ट रोजी त्या ठिकाणी गेले व त्यांनी संभाजीनगरच्या बाजूला चिखलठाणा येथे असलेल्या मध्यवर्ती कार्यशाळेमध्ये सदर कार्यशाळा स्थलांतरीत करण्याचे आदेश निर्गमित केले. महोदय, 16 ऑगस्टला उपाध्यक्षांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी लगेच 9 सप्टेंबरला केली गेली. या प्रकाराला कर्मचारी संघटना, इंटक आणि वर्कशॉप मॅनेजर यांनी विरोध केला. परंतु त्यांचे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

कोणीही ऐकले नाही. रिजनल इंजिनिअर आणि प्रादेशिक व्यवस्थापकाला यासंदर्भातील ठराव पाठविण्यास सांगितले गेले. जी जागा बी.ओ.टी. तत्वावर दिली आहे तिची बाजारभावाने किती किंमत येईल याचा विचार केला गेला नाही. वर्कशॉप शिफ्ट करण्यास 10-15 लाख रुपये खर्च येईल असे सांगून ते सेंट्रल वर्कशॉपमध्ये स्थलांतरित करण्यात आले. रेडी रेकनर रेट प्रमाणे त्या जागेची किंमत 10-12 कोटी रुपये ठरविण्यात आली.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदय, उद्या आपण जर एस.टी. महामंडळ विकायला गेलो तर आपल्याला ते कवडीमोल भावाने विकावे लागेल. शासनाचे धोरण हे पुढे ठरत असते. या व्यवहाराचे 12 कोटी रुपये ठरले व त्यामध्ये 4 कोटी रुपये प्रिमिअम ठरला. हे सर्व तांत्रिकदृष्ट्या किंवा आर्थिकदृष्ट्या व्हिजिबल आहे की नाही हे पाहिले गेले नाही. या गोष्टीकडे कमर्शिअल दृष्टीने पाहिले नाही. आपण दिनांक 16 ऑगस्टला दिलेल्या माहितीमध्ये त्या जागेची किंमत 60 ते 65 कोटी रुपये आहे. परंतु आपण तो भूखंड 4 कोटी रुपयांमध्ये देत आहात. ज्या वास्तुची किंमत 3 कोटी रुपये आहे, ती आपण तोडणार आणि नवीन वर्कशॉप करणार हे काही योग्य नाही. त्यानंतर त्या जागेची एस्टिमेट कॉस्ट पावणे चार कोटी निघाली. असा हा आपला तुघलकी कारभार आहे. विधेयक पास करुन टाका हे तुमच्या दृष्टीने फक्त एक वाक्य आहे. पण तुमच्या या निर्णयांमुळे खाली काय वाटोळे लागते ते तुम्हीच पहा. यामुळे मूळ उद्देशालाच काळे फासले जात आहे, याचा विचार आपण केला नाही. तुम्ही दिलेल्या निर्णयाने काय वाटोळे झाले, ते कोण पाहणार ? म्हणून मी एकच उदाहरण दिले आहे. मी सार्वजनिक उपक्रमावर एक चर्चा मागणार आहे आणि त्यावेळी असंख्य उदाहरणे देणार आहे. एस.टी. महामंडळाची 60 कोटी रुपयांची जागा 12 कोटीवर आणता आणि त्यातील प्रिमिअम म्हणून 4 कोटी रुपये घेता. आपण त्याला ती जागा बी.ओ.टी. तत्वावर 30 वर्षांकरिता देणार आहात. 30 वर्षांनी हे महामंडळ राहील की नाही अशी अवस्था आहे. तेथील कर्मचाऱ्यांचे काय ? तेथील जागेचे काय ? या संदर्भात ज्यांनी कार्यवाही केली आहे, त्यांच्यावर तुम्ही कारवाई करणार का ? हा माझा पहिला प्रश्न आहे. बी.ओ.टी. तत्वावर एस.टी. महामंडळाने किती जमिनी दिल्या व कोणत्या भावाने दिल्या, याचीही माहिती देणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आपण मार्केटमधील भाव पाहणार आहात की नाही ? जेव्हा डिझेल व पेट्रोलचे भाव वाढतात किंवा बाकीच्या अन्य गोष्टींचे भाव वाढतात, तेव्हा एस.टी. महामंडळाला ताबडतोब प्रवासी तिकिटाचे दरही वाढवावे लागतात. पण त्यासाठी त्यांना स्वतंत्र निर्णय घेता येत नाही. त्यामुळे आपण तीन महिन्यांच्या आत अशा उपक्रमांना निदेश देण्याबाबतची जी सुधारणा करत आहात ती स्वागतार्ह करणे. सभापती महोदय, मी ज्या गोष्टींसाठी भांडत आहे, त्या सर्व गोष्टींचे माझ्याकडे पुरावे आहेत. असाच प्रकार ठाण्यामध्ये देखील करण्यात आला आहे. सभापती महोदय, जेवढ्या जमिनी विकल्या गेल्या त्यातून एस.टी. महामंडळाला किती पैसे मिळाले ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

हे आपणच पहा. या प्रकरणांमध्ये जे कोणी दोषी सापडेल त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. मघाशी जसे गोविंदस्वरुपांचे प्रकरण आले तसे एक नवीन स्वरुप प्रकरण याही ठिकाणी येईल. एस.टी. महामंडळाने कोट्यावधीच्या जमिनी आपल्याच धोरणानुसार मातीमोलाने विकून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. तरी, त्यांच्यावर तातडीने कारवाई झाली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या विधेयकाचा उद्देश चांगला आहे. राज्य सार्वजनिक उपक्रम मंडळाने विहित कालमर्यादेत सर्व कामकाज करावे हा या विधेयकाचा उद्देश आहे. सभापती महोदय, कितीतरी दिवस ते काम भिजत घोंगडे पडल्यासारखे होते. या संदर्भात मला आपल्याला काही गोष्टी सांगावयाच्या आहेत. बदलत्या जगाचा विचार करता, पुनर्रचना मंडळाचे कायदे करताना अधिक लक्ष देण्याची गरज होती. आपले सरकार हे वेल्फेअर गव्हर्नमेंट म्हणून फक्त गव्हर्नन्स न करता बाकीच्या वेल्फेअर ॲक्टिव्हिटीजमध्ये देखील शिरत आहे. पूर्वीच्या काळामध्ये एस.टी. असेल, एम.एस.ई.बी. असेल त्या सर्व महामंडळांचा कारभार शंभर टक्के शासनाच्या अखत्यारित असलेल्या मंडळाडूनच होत होता. त्यावेळी मोनोपोली राईट्स होते. एम.एस.एस.आय.डी.सी. ने लघु उद्योजकांना काही कारभार पुरवावयाचे होते तर एस.टी. महामंडळाला ट्रान्सपोर्ट मोनोपोली होती व एम.एस.ई.बी. ला विजेची मोनोपोली होती.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. गुरुनाथ कुलकर्णी)

श्रीकांत जोशी....

आता हळूहळू खाजगीकरणाकडे आपण वळत आहोत व सगळया कंपन्या खाजगी होत आहेत. सर्व महामंडळाचा कारभार छोटा होत चाललेला आहे. सगळी महामंडळे खाजगी कंपन्याकडे टेकओव्हर होत आहेत. यातून सरकारचा काय फायदा होणार आहे. सरकार यामुळे पंगू होणार आहे. सरकारने काही चांगल्या गोष्टी केल्या तर आम्ही त्यांचे अभिनंदन करु. परंतु जागतिक स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी आपणास नेमकी पावले उचलने गरजेचे आहे. एमएसईबी, शिक्षण यांचे आपण खाजगीकरण केले, उच्च शिक्षणाचे खाजगीकरण केले, सगळीकडे खाजगी विभाग सुरु करीत आहात. मी आपल्याला या निमित्ताने सांगू इच्छितो की, पुनर्रचना महामंडळाचे काम नीट चाललेले नाही. महामंडळे घेऊन उद्योगपतीं मोठे होत चालले आहेत. पुनर्रचना महामंडळास 3 महिन्याचा कालावधी दिलेला आहे पंरतु पुनर्रचना महामंडळाकडे मॅनपॉवर आहे काय ? सर्व महामंडळाचा विचार करण्याची क्षमता या महामंडळाकडे नाही. मराठवाडा विकास महामंडळ या प्राधिकारणाची स्थापना केलेली आहे. मराठवाडयामध्ये उद्योग यावेत यासाठी या महामंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. पुणे, पिंपरी चिंचवड, येथपर्यंत उद्योजक येतात. पंरतु लातूर, नांदेड येथे उद्योजकांनी जर उद्योग काढले तर मुंबई मध्ये त्यांना मार्केटींगसाठी येण्यास अडचणीचे होते म्हणून मराठवाडयातील नांदेड व इतर परिसरामध्ये उद्योजक येण्यास तयार होत नाहीत. यासंदर्भात पुनर्रचना महामंडळाने काय केले, यासंदर्भात 10 टक्क्यांचा निर्णय देऊन सांगितले आहे की मराठवाडा विकास महामंडळ बंद करुन टाकावे. मराठवाडा विकास महामंडळाचा मूळ उद्देश काय होता ? या महामंडळाकडे नैसर्गिक साधनसंपत्ती होती तरी या महामंडळाच्या अखत्यारित येणारे 21 उद्योग बंद करण्यात आलेले आहेत. कारण सदर ठिकाणी चुकीची माणसे नेमलेली आहेत भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी चांगले राहिलेले नाहीत. जागतिक स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी त्यांचे मोलाचे सहकार्य व्हावयास पाहिजे परंतु तसे होत नाही. सर्व महामंडळांना पैशांची अडचण भासत आहेत, त्यामुळे हे उद्योग स्पर्धेत टिकून राहत नाहीत. ही महामंडळे टिकविण्याचे आव्हान भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी उत्तम रीतीने पार पाडत नाहीत. 21 उद्योग असलेले मराठवाडा डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन बंद केलेले आहे.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी....

तसेच दुसरा मुद्दा असा आहे की, जे डेअरी प्रकल्प होते त्यांच्या जमिनी प्राईम लॅन्ड अशा ठिकाणी होत्या, ते प्रकल्प सुध्दा बंद करण्यात आलेले आहेत. हे उद्योग व्हायबल कसे होतील याकडे कोणीही लक्ष देत नाही यासंदर्भात कोणी विचार विनिमय करीत नाही. विविध 4 महामंडळाच्या संदर्भात ती यशस्वी करण्याबात कोणताही प्रयत्न करण्यात आलेला नाही. पुनर्रचना महामंडळाने 3 महिन्याचा कालावधी दिलेला आहे यामध्ये काही महामंडळाची वाट लागेल, व काही महामंडळे वाचतील. महामंडळाची पुनर्रचना करण्यासाठी 3 महिन्यांचा कालावधी हा अत्यंत कमी आहे ही प्रक्रिया कमीत कमी वर्षभर तरी सुरु राहावयास पाहिजे. महाराष्ट्र शासनाकडे मोठी वीलपावर आहे 70 ते 72 हजार कोटी रुपयांचा महसूल जमा होतो. 19 हजार कोटी रुपये शासनाच्या कर्मचाऱ्यांवर खर्च होतो. सगळेच आयएएस अधिकारी महाराष्ट्रामध्ये येण्यासाठी धडपडत असतात. म्हणून सार्वजनिक उपक्रम हे वाचवायला पाहिजेत. मी ओएनजीसीच्या टर्न ओव्हर एवढे सक्षम सर्व महामंडळे झाली पाहिजे असे म्हणणार नाही. परंतु हे विधेयक आणीत असतांना या विधेयकाची ओरिजनल प्रत आम्हाला अभ्यासण्यासाठी मिळावयास पाहिजे. हे विधेयक चर्चेला आले तेव्हा आम्ही ओरिजन प्रत मिळविण्यासाठी लायब्ररीमध्ये धाव घेतली. एखाद्या विधेयकामध्ये सुधारणा करतांना सदर विधेयकाची ओरिजनल प्रत सदस्यांना अभ्यास करण्यासाठी मिळावयास पाहिजे. एक तर विधेयकावर चर्चा केव्हा होईल हे निश्चित नसते. सभापती महोदयांनी या विधेयकावर चर्चा करण्यासाठी आज परवानगी दिल्यामुळे ते आज चर्चेला आलेले आहे. या विधेयकाच्या संदर्भात माझी अशी मागणी आहे की, पुनर्रचना महामंडळाचे काम हे वर्षभर चालले पाहिजे. 42 महामंडळे ही चांगल्या स्थितीमध्ये चाललेली असतांना वर्षभर हे काम चालू राहावयास पाहिजे.

यानंतर श्री. सांगळे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री.श्रीकांत जोशी ...

सार्वजनिक उपक्रम समितीचा सदस्य या नात्याने काम करीत असताना महामंडळांना बॅलन्स शीट तयार केले किंवा नाही ? असा प्रश्न विचारावासा वाटतो. महाराष्ट्र शासनाच्या चेह-याला काळिमा फासणारी अशी ही गोष्ट आहे की, एवढे संगणकीकरण होऊन सुध्दा एकाही महामंडळाचे बॅलन्स शीट तयार नाही. दि. 30 एप्रिलच्या आत ऑडिटेड बॅलन्स शीट होणे सहज शक्य आहे. परंतु मी दाव्याने सांगू शकतो की, एकाही महामंडळाचे बॅलन्स शीट तयार नाही. चुकून एखादा महामंडळाचे बॅलन्स शीट तयार झाले असेल तर मला माहिती नाही. आज सगळीकडे संगणकीकरण झाल्यामुळे ज्या दिवशी पेमेंट होते त्याच दिवशी संगणकावर डाटा एन्ट्री केली जाते. महामंडळ हे शासनाचे काम करीत असल्यामुळे त्यांचे अकांऊट सस्पेन्स असण्याची आवश्यकता नाही. तसेच एखादे बील येणे बाकी आहे म्हणून ऑडिट करता येत नाही अशीही परिस्थिती नसते. पार्शल ऑडिट होऊ शकेल कदाचित सबमिशनचे ऑडिट नंतर होऊ शकेल. परंतु महामंडळाच्या हेड ऑफिसचे ऑडिट हे 31 मार्च रोजी झाल्यानंतर 1 किंवा 2 एप्रिल रोजी, या ठिकाणी आपण केव्हाही यावे, आमचे कागदपत्रे तयार आहेत असे त्यांनी ठामपणे सांगितले पाहिजे. यामध्ये शासनाचे 25 टक्क्यांपेक्षा जास्त शेअर्स आहेत. ही महामंडळे व्यापार आणि उद्योग यामध्ये असल्यामुळे त्याच पध्दतीने ती चालण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी सार्वजनिक उपक्रम समितीने बजाज कारखान्याने भेट दिली होती. तेथील कामकाज अतिशय चांगल्या प्रकारचे होते. बजाज कारखान्याचे कामकाज कसे चालते हे आमच्या एमडी व सीईओना दाखविण्याची आवश्यकता आहे. ज्या दिवशी मोटरसायकल तयार करावयाची असते त्याच्या दोन तासांपूर्वी कारखान्यामध्ये नट बोल्ट आलेले नसतात तर मोटार सायकल तयार करण्याच्या आदल्या दिवशी आवश्यक असलेल्या रॉ मटेरियलची सकाळी 10.00 वाजता नोंद होते. दुपारी 12 वाजेपर्यंत रॉ मटेरियलची नोंद पूर्ण होते. दुपारी बारा साडेबाराच्या दरम्यान व्हाऊचर्स तयार होतात. 48 तासांच्या आतमध्ये त्यांचे सगळे पेमेंट पास होतात. महत्वाचा मुद्दा म्हणजे 12 तासांच्या आत मोटारसायकल तयार होऊन 24 तासांच्या आत डिलरकडे पोहचवली जाते. 24 तासांत मोटारसाईकल तयार होऊन बाहेर पडते त्यासाठी 48 दिवस पैसे अगोदर आलेले असतात. अशाप्रकारे संपूर्ण फिनीश गुड्सचे पेमेंट कंपनी 48 तास अगोदर वसूल करीत असते. संपूर्ण कच्च्या मालाचे पेमेंट 48 दिवसांनंतर केले जाते. अशा प्रकारच्या कंपन्याशी स्पर्धा करण्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ...

आपल्याला महामंडळांना स्पर्धेमध्ये उतरावयाचे आहेत. म्हणून सार्वजनिक उपक्रम पुनर्रचना महामंडळासाठी तीन महिन्याचा कालावधीत 3-4 गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. यासाठी महामंडळांची व्याप्ती वाढवण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आवश्यकेप्रमाणे चार्टड अकांऊटंटस नेमण्याची आवश्यकता आहे. त्यांनी वार्षिक ऑडिट प्रत्येक महिन्याला तयार करुन त्यानुसार रिपोर्ट देण्याची पध्दत सुरु करणे आवश्यक आहे व त्यानुसार दर महिन्याला सूचना देणे आवश्यक आहे. त्यानुसार वर्षभरात दर महिन्याला केलेल्या सूचनांचे पालन केले नसेल तर त्याबाबतचा रिपोर्ट पुनर्रचना महामंडळाला करणे आवश्यक आहे. त्याबाबत पुनर्रचना महामंडळाकडून तीन महिन्यांनंतर निदेश दिले जातील की, एवढया वेळेस सूचना देऊन सुध्दा आपल्यामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा होत नसल्यामुळे Show the performance or quit the job. या सर्व बाबी आपल्याला गर्व्हनन्स म्हणून करता येऊ शकतील. त्यामुळे घाईघाईने विधेयक आणण्यामागे आमचा एवढयासाठीच विरोध असतो. या दृष्टीकोनातून महामंडळाचा परफॉर्मन्स् आणि फंक्शनिंगबाबत वल्ड कॉंपेटेटीव्ह परफॉर्मन्सशी तुलना करणे आवश्यक आहे. आपण पहिल्या वर्षी कोणतीही त्याला क्विट करण्याची कारवाई न करता प्रथम त्याची वेतनवाढ थांबेल, दुस-या वर्षी पगार कमी होईल, तिस-या वर्षी संबंधित आय.ए.एस. यांना सांगता येईल की, 3-3 वर्षे महांमडळावर ठेऊन सुध्दा आपण काम करण्यासाठी पात्र नाही यामुळे आय.ए.एस. पदावर काम करणा-या अधिका-यांना कामामध्ये गोंधळ करण्याची हिंमत होणार नाही. काही आय.ए.एस. अधिका-यांमुळे 90 टक्के लोकांवर संशयाचे सावट निर्माण होते. असे केल्यास चांगल्या पध्दतीचे वातावरण निर्माण होऊ शकेल. आम्ही आज या विधेयकाला पाठिंबा देतो. पुढील विधेयक अधिक चांगल्या पध्दतीचे असले पाहिजे...

(यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी .....

मेंबर सेक्रेटरी किंवा मॅनेजिंग डायरेक्टरवर देखील आपल्याला कारवाई करता येऊ शकते. त्यांनाही अशा ॲक्शन घेण्याचे अधिकार आपल्याला द्यावे लागतील. अशा प्रकारे विशिष्ट पद्धतीचे अधिकार दिल्यानंतर.., आपण त्यासाठी ट्रिब्यूनल्स नेमलेली आहेत. त्यामध्ये खूप किचकट कायदे आहेत. तरीसुद्धा या पद्धतीमध्ये आपल्याला खूप काही सुधारणा कराव्या लागतील, कायद्यात दुरूस्त्या कराव्या लागतील. तरच यांचा कारभार पारदर्शक पद्धतीचा, चांगल्या पद्धतीचा होऊ शकेल. पण अशी महामंडळे टिकली पाहिजेत., ती वाढली पाहिजेत. ती बंद करणे हे काही पुरूषार्थाचे लक्षण नाही. म्हणून आपले मंत्री पद आता थोड्याच दिवसासाठी आहे, तेव्हा जसा जमेल तसा हात मारून काम करायचे. आणि मग एक तर महामंडळ बंद करा किंवा कमी करा... अर्थात मंत्री महोदय, असे काम तुमच्याकडून होणार नाही याची आम्हाला खात्री आहे, पण हे काम करताना काही जण असाही विचार करणारे आहेत. म्हणून कोठे तरी ही महामंडळे टिकली पाहिजेत. विशेषत: एमडीसीचे दुखणे हे माझे आहे आणि ते तुम्ही समजू शकता. कारण मराठवाड्यातील 21 उद्योग, ते प्रोटो टाईप उद्योग होते. म्हणजे here is the raw material, here is the technical knowledge.. तांत्रिक ज्ञान आमच्याकडे आहे, रॉ मटेरिअल आमच्याकडे आहे, मनुष्यबळ आमच्याकडे आहे. मार्केट सरकार स्वत: करायला तयार आहे. अशा परिस्थितीत मार्केटची उपलब्धता आहे. तेव्हा हे उद्योग चालवावे कसे, चालावे कसे हे लोकांना समजले तर त्याचे अनुकरण शंभर उद्योगपती करतील. त्यांनी अत्यंत चांगले काम केले. आज मराठवाड्यातून हजारो उद्योगपती तयार झालेले आहेत. मग मध्येच मूळ उद्देशालाच बगल देऊन ते बंद करण्यात आले. तेव्हा यामध्ये देखील त्या मूळ उद्देशाचे कारण कोठे तरी स्पष्ट झाले पाहिजे. केवळ सरकारला त्यातून तोटा होतो आहे, सरकारला ते पेलवत नाही असे म्हणून चालणार नाही तर तो तोटा हा मराठवाड्याच्या विकासासाठी होता असे समजून तो सहन केला पाहिजे. हे सारे लक्षात घेऊन माननीय मंत्री महोदयांनी याचे उत्तर द्यावे अशी अपेक्षा मी करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

*****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..... एचएच 2 ..

औचित्याच्या मुद्याबाबत ....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आज सकाळी मी औचित्याचा मुद्दा येथे उपस्थित केला होता. काल या ठिकाणी घणसोली येथील घटनेसंबंधात चर्चा झाली होती. यामध्ये प्रश्न असा आहे की, सदनातील आपणा सगळ्यांचे एकमत आहे की, घणसोली परिसरामध्ये ताबडतोबीने शांतता प्रस्थापित झाली पाहिजे. पण अजूनही तेथे शांतता प्रस्थापित झालेली नाही. अजूनही तेथून आम्हाला फोनवरून माहिती मिळते आहे की, तेथे गडबड चालू आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की., आपली सगळी चर्चा झाल्यानंतर तेथे रात्री पुन्हा पोलीस ठाण्यावर हल्ला झाला त्याच्या बातम्या टीव्ही चॅनेल्सवरून दाखविल्या जात होत्या. आताही तेथील पालकमंत्री स्वत: सदनात उपस्थित आहेत. नव्या मुंबईतील स्थानिक चॅनल्सवरून ज्या बातम्या आणि दृश्ये दाखविली जात आहेत ती अशी की, लोक काही ठिकाणी जमलेले आहेत. आमची माहिती पूर्ण नसेल तर सरकारने त्याबाबत वस्तुस्थिती काय आहे याचे निवेदन सदनामध्ये केले पाहिजे. दुसरे असे की, माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री यांनी अजूनही नवी मुंबईला भेट का दिली नाही ? अशा मुळे तेथील श्री.संजीव नाईक आणि बाकी लोक प्रचंड जमाव करून विचारताहेत आणि संपूर्ण नव्या मुंबईत गडबड चालली आहे असे आमच्या कानावर आले आहे. सभापती महोदय, आपण तालिका सभापती म्हणून सभापतीस्थानी असलात तरी आपणास त्या स्थानावर बसल्यानंतर माननीय सभापतींचे सर्व अधिकार आहेत. म्हणून माझी आपणा मार्फत विनंती आहे की, गृहमंत्र्यांनी स्वत: या संदर्भात तेथे काय वस्तुस्थिती आहे याचे निवेदन करणे अनिवार्य आहे. आता दुपारचे सव्वा तीन वाजले आहेत. आमचे सहकारी सदस्य सन्माननीय श्री.मोते यांनी सकाळी हा मुद्दा उपस्थित केला होता आणि आता माननीय शिक्षण मंत्री देखील सभागृहामध्ये अुपस्थित आहेत. काल तेथे झालेल्या दंगलसदृश्य परिस्थितीमुळे मुलांचे परीक्षांच्या बाबतीत नुकसान झाले आहे त्याबद्दलही शासनाचा निर्णय काय आहे तेही कळलेले नाही. आज देखील तेथे अशांतता आहे आणि आता दुपारचे 3.30 वाजत आहेत, दुपारी शाळा सुटण्याची वेळ झालेली आहे. आज नव्या मुंबईतील सगळ्या शाळा काही बंद नाहीत, काही शाळा चालू आहेत आणि त्या सुटण्याची वेळ झालेली आहे. टीव्ही चॅनल्स वरून माहिती देताना आधीची दृश्ये दाखवित असले आणि त्यामध्ये त्या दृश्यांची वेळ कोणती आहे हेही दाखवित असले तरी ती दृश्ये बघणाऱ्यांच्या मनात एक भीती निर्माण होते. म्हणून या सदनामध्ये ताबडतोब, पुढील अर्धा तासाच्या आत शासनाने निवेदन केले पाहिजे की, नव्या मुंबईमध्ये

..... एचएच 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

वस्तुस्थिती काय आहे ? गडबड असेल तर ती कोठे मर्यादित आहे आणि सर्वत्र शांतता असेल, सारे व्यवहार सुरळीत असतील तर त्याची दृश्ये ताबडतोब साऱ्या वाहिन्यांवरून दाखविली गेली पाहिजेत तसेच सदनाच्या माध्यमातून देखील याच्या बातम्या प्रसारित झाल्या पाहिजेत. तेथील लोकांना वस्तुस्थिती समजावी म्हणून, लोकांच्या मनातील घबराट कमी व्हावी या दृष्टीकोनातून असे होणे आवश्यक आहे आणि जर का तेथे काही गडबड सुरू असेल तर ती रोखण्याच्या दृष्टीने ताबडतोब संदेश, हे सदन चालू असल्यामुळे, गेला पाहिजे. या मुद्याकडे मी या निमित्ताने आपले लक्ष वेधून त्याबाबत निदेश देण्याची विनंती करते.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी जे सांगितले ते अगदी योग्य असेच आहे. मी देखील काल जाणीवपूर्वक टीव्ही पहात होतो, अनेक चॅनेल्स पहात होतो. सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताईंनी जो शेवटचा मुद्दा मांडला आहे तो माझ या मते अतिशय महत्त्वाचा आहे. दूरदर्शनच्या चॅनेल्सवर घटना अगोदरच्या असल्या तरी ती दृश्ये वारंवार दाखविली जातात. काल त्या ठिकाणी पोलीस ठाण्यावर झालेला हल्ला, त्या ठिकाणी आलेला जमाव आणि त्यांचा व पोलिसांचा चाललेला संघर्ष याचे चित्रीकरण सातत्याने दाखविले जात होते. त्याला धरूनच नेमके सन्माननीय उपमुख्य तथा गृहमंत्र्यांचे वक्तव्य दाखविले जात होते आणि त्याचा उपहास केला. म्हणजे माननीय उपमुख्यमंत्री इस तरहसे कह रहे हैं, वहॉ यह चल रहा ... तेव्हा यातील नेमके खरे काय आहे ? टीव्हीवर ही दृश्ये दाखविताना ती कोणत्या वेळची दृश्ये आहेत त्याची वेळ देखील दाखविलेली नाही. म्हणजे ही घटना कालची आहे वा दुपारी घडलेली आहे वगैरे काहीही सांगितले जात नव्हते. माननीय गृहमंत्री सांगत आहेत की, तेथे आता शांतता आहे आणि दृश्य दाखविताहेत की, पोलीस ठाण्यावर लोकांचा हल्ला चालू आहे त्याचे. म्हणून या ठिकाणी आता सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी जो मुद्दा मांडला आहे त्याला माझे अनुमोदन आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .... आयआय 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखा नाही

श्री. अरविंद सावंत...

कारण माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी या ठिकाणी मोबाईलचा देखील गैर वापर अशावेळी होतो असे सांगितले आहे. दूरदर्शनचे चॅनेलवाले आपली विवेकबुध्दी अशावेळी कां वापरीत नाहीत हे समजत नाही? त्या चॅनेलवाल्यांना आपण जरा सांगा की, दंगल आणखी चिघळली जाईल अशाप्रकारची दृश्ये दाखवू नका. दंगल पेटविण्याचे काम करु नका, दंगल शमविण्याचे काम करा. आज मराठी माणूस मराठी माणसाचे डोके फोडत आहे हे आम्हाला पहावत नाही. आणि म्हणून त्या ठिकाणी शासनाचा मेसेज गेला पाहिजे याकरीता शासनाने तातडीने कारवाई करावी. अशाप्रकारे आपण शासनास निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी चर्चेला असलेले विधेयक अगोदर संमत होऊ द्या...

श्री. गणेश नाईक (पर्यावरण, उत्पादन शुल्क व कामगार मंत्री) : सभापती महोदय, या क्षणाला नवी मुंबईमध्ये काय चालले आहे हे मला माहीत नाही. आज संध्याकाळी 5 वाजता माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली सर्व पक्षीय नेत्यांची व माथाडी कामगारांच्या नेत्यांची बैठक घेण्याचे ठरले आहे.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी शासनातर्फे यासंबंधी निवेदन करण्यात यावे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे व माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी उपस्थित केलेले मुद्दे अगदी महत्वाचे आहेत. नियमाप्रमाणे आपल्याला आदेश देता येतात की नाहीत हे आपण एकदा पहावे. परंतु या खाजगी चॅनेलवाल्यांचे प्रसारण आपण बंद केले पाहिजे. माणसे मरत आहेत व त्यांचा धंदा होत आहे. त्यांच्या स्वातंत्र्यावर आपण बंदी आणू नका. परंतु दूरदर्शनवर ज्या प्रकारची ते दृश्ये दाखवीत आहेत त्यामुळे भांडण लावण्याचे प्रकार होत आहेत ते बंद केले पाहिजेत.

तालिका सभापती : याठिकाणी सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे व माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी घणसोली येथील दंगली संदर्भात मांडलेल्या भूमिकेविषयी शासनाने सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी निवेदन करावे.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, त्या विभागातील दहावीच्या मुलांच्या परीक्षा बुडाल्या आहेत त्याबाबत काय करणार ते शासनाने सांगितले पाहिजे?

तालिका सभापती : सभागृहामध्ये विधेयकावर चर्चा चालू होती त्यावेळी विषय महत्वाचा असल्यामुळे माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे व माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना बोलण्याकरीता मी परवानगी दिली होती.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी सकाळी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला त्यावेळी सभागृहामध्ये माननीय शिक्षण मंत्री व माननीय शिक्षण राज्यमंत्री उपस्थित नव्हते. आता माननीय शिक्षण मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. तेव्हा त्यांनी याबाबत निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO.XI OF 2006.

(A BILL TO AMEND THE MAHARASTHRA STATE ENTERPRISES (RESTRUCTURING AND OTHER SPECIAL PROVISIONS) ACT, 2000.)

(चर्चा पुढे चालू)

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2006 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 11 चर्चेकरीता सभागृमध्ये मांडण्यात आले आहे. या विधेयकावर कोणत्याही प्रकारची चर्चा होणार नव्हती. माझ्या लक्षात एक गोष्ट येत नाही की, विधान परिषदेचे विधेयक हे चर्चेशिवाय "होय"चे बहुमत करुन संमत करणे ही पध्दत योग्य नाही. हे वरिष्ठांचे सभागृह म्हटले जाते. परंतु ते खरेच आहे की नाही याचा शोध भविष्यात घेता येईल. या विधेयकामध्ये फक्त दोन शब्दांचा फरक आहे. हे विधेयक मांडावे आणि संमत करुन टाकावे. माननीय मंत्र्यांनी ज्या दिवशी हे विधेयक मांडले. त्या दिवशी या विधेयकाच्या उद्देशासंबंधी सभागृहामध्ये माहिती दिली असती तर आमच्या मनामध्ये संभ्रम राहिला नसता. त्यावेळी फक्त विधेयक मांडण्यात आले व "होय"चे बहुमत करुन मांडण्यात आले. असे प्रकार या सदनामध्ये होऊ नयेत असे मला मनापासून वाटते. या सदनामध्ये आम्ही सर्व माननीय सदस्य जबाबदारीने बसतो. प्रत्येक विषयाच्या चर्चेमध्ये जबाबदारीने भाग घेतो. काही वेळेस शासनाचा निर्णय आमच्या विरोधात गेला तर आम्ही आरडा ओरड करतो तो आमचा हक्क आहे. त्यामध्ये सुधारणा व्हावी हा उद्देश असतो, त्यामध्ये नुकसान व्हावे असा उद्देश नसतो.

(यानंतर श्री.किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे चालू...

सभापती महोदय, सार्वजनिक उपक्रमाच्या संबंधात विधेयक मांडलेले आहे. महाराष्ट्रातील सगळ्या उपक्रमाची सद्य:स्थिती तपासून पाहिली तर ते आजारी असल्याचे दिसून येईल. परंतु या मागचा आपण शोध घेत नाही. यामध्ये सुधारणा करण्यासाठी पुनर्रचना मंडळ निर्माण केलेले आहे. पुनर्रचना मंडळ हे सल्ला देईल, त्याची तीन महिन्यामध्ये अंमलबजावणी करायची आहे, अशाप्रकारचे निर्देश आपण देत आहात. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी या संदर्भात जो उल्लेख केला ते बरोबर आहे. आपल्याकडे सार्वजनिक उपक्रम समिती आहे. या समितीमध्ये हे सगळे विषय येतात. या संदर्भात अधिकाऱ्यांना साक्षीसाठी बोलाविले जाते, मंत्री साक्षीसाठी येत नाहीत. लोकसभेमध्ये समित्यांसमोर मंत्र्यांना बोलाविता येते. सचिवांकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर संबंधित विभागाच्या मंत्र्यांना बोलाविता येते. त्यांच्याशी सल्लामसलत करता येते. येथे तशी तरतूद नाही, मंत्र्यांना समितीसमोर बोलविले जात नाही. येथे फक्त सचिव जे काही सांगतील, त्याप्रमाणे कार्यवाही होते. येथे सार्वजनिक उपक्रम समितीसमोर मंत्र्यांना बोलाविता येत नाही परंतु तसा बदल केला तर मंडळाचा फायदा होणार आहे की त्याचे वाटोळे होणार आहे, हे कळून येते. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी जो विषय मांडला तोसुध्दा तेवढाच महत्वाचा आहे. शेवटी ही मंडळे जगावीत की, त्यांची अंत्ययात्रा काढावी याबातचा निर्णय शासनाने घ्यावयाचा आहे. परंतु आता प्रायव्हटायझेशनचे काम सुरु झालेले आहे. सन्माननीय मंत्र्यांनी असे सांगितले होते की, जेवढया सार्वजनिक जागा आहेत, त्या विकून पैसे जमा करावेत आणि कर्ज भागवावे. प्रायव्हटायझेशन केले की पैसे मिळतात, जमिनी विकल्या म्हणजे पैसे मिळतात परंतु ते पैसे संपून गेल्यानंतर मग उत्पन्नाचे काहीच साधन रहात नाही.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना मी सांगू इच्छितो की, मी त्यावेळेला असे म्हटले होते की, महाराष्ट्र राज्यातील डी.पी.प्लॅनमधील असणाऱ्या जागा आहेत, त्या झोपडपट्टी दादांनी, महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आणि राजकीय लोकांनी कॅपचर केलेल्या आहेत, लुटलेल्या आहेत. त्या जागा ताब्यात घेऊन त्याचे नियोजन करुन जागतिकीकरणाच्या माध्यमातून त्या विकल्या तर मिळणाऱ्या पैशातून राज्याचे कर्ज भागविता येईल. राज्यामधील ज्या महत्वाच्या गरजेच्या जागा आहेत, त्या ठेवल्याच पाहिजेत. झोपडपट्टी दादांनी जागा बळकावलेल्या आहेत, त्या जागेच्यासंबंधाने मी बोललेलो आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.मधुकर सरपोतदार : आपण जे काही बोलला, ते वर्तमान पत्रामध्ये वाचलेले आहे. तो आजचा माझा विषय नाही. एस.टी. महामंडळाच्या जागा आहेत, त्या संदर्भाने मला सांगावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी औरंगाबादचे उदाहरण सांगितले. प्रत्यक्षात कोट्यावधी रुपयाची जमीन बाजार भावाने न विकता, त्यातून जे काही पैसे मिळाले त्यामध्ये समाधान मानलेले आहे. त्यामध्ये काय व्यवहार होतो, याची आपल्याला कल्पना आहे परंतु आज भ्रष्टाचाराबाबतीतील विषय चर्चेला नाही. त्यावर दोन दिवस चर्चा केली तरी ती संपणार नाही. त्या विषयावरील गुणाकाराने चर्चा वाढत जाईल, पण भागाकाराने कमी होणारी नाही. म्हणून त्यावर भाष्य न केलेलेच बरे. It is a human face. असे त्यास संबोधता येईल. जे विधेयक सदनासमोर मांडलेले आहे, त्यामध्ये पुनर्रचना मंडळ निर्माण केलेले आहे. एस.टी. महामंडळाच्या स्वत:च्या जागा आहेत, त्यावर अतिक्रमणे आहेत. अतिक्रमण केलेली जमीन महामंडळ परत घ्यायला जात नाही, त्याबाबतीत काही कारवाई केली जात नाही. अतिक्रमण करणाऱ्यांवर पोलीस केस करत नाही, असे या एस.टी.महामंडळाचे चाललेले आहे. पुनर्रचना मंडळाने अशा ज्या काही जमीनी, इमारती अशा प्रॉपर्टीज आहेत, त्या ताब्यात घेण्याबाबत लक्ष घालावे.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

त्याप्रमाणे त्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करा. पुनर्रचना मंडळ आपल्याला सल्ला देईल. ते तीन महिन्यात अंमलात आणण्याचा प्रयत्न करतील. परवा मी परभणीच्या बाबतीत वाचले. त्या ठिकाणी एस.टी. महामंडळ अस्तित्वात आहे परंतु खाजगीकरणामध्ये सगळे डिपार्टमेंट्स बांधलेले आहेत. पोलीस खाते बांधलेले आहे. एस.टी. स्टँडच्या ठिकाणी ज्या रिक्षा असतात त्याची कॅपॅसिटी 3 प्रवासी वाहून नेण्याची असताना त्यामध्ये 10-10 प्रवासी बसतात. अशा पध्दतीची खाजगी वाहतूक चालते हे आपल्याला माहीत आहे. त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे एस.टी.महामंडळ तोट्यात चालले आहे. एस.टी. ला प्रवासी मिळत नाहीत. जे प्रवासी असतात त्यांना दुसरे वाहतुकदार उचलून घेऊन जातात. यासंदर्भात हायकोर्टाने सुध्दा निर्णय दिलेला आहे. त्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाने संरक्षण द्यावे, जे खाजगी वाहन चालविणारे आहेत त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी असे निर्देश मुंबई हायकोर्टाने दिलेले आहेत. तरी सुध्दा याबाबतीत कोणतीही कारवाई होत नाही. त्या ठिकाणी अंडरहँड डिलींग होते. पुनर्रचना मंडळ याबाबतीत काय इलाज करणार आहे ? तुम्ही त्यांना तीन महिन्यांची मुदत घालून दिली आहे. या ठिकाणी आपण छोटीशी सुधारणा आणलेली आहे असे आपण सांगितले परंतु ती महत्वाची सुधारणा आहे. हा विषय चर्चेच्या माध्यमातून सदनाला समजला पाहिजे. प्रत्यक्षात काय चालले आहे ते सगळ्या सन्माननीय सदस्यांना समजण्याची आवश्यकता आहे. असे झाले तरच जरी विधेयक मंजूर झाले तरी कमीतकमी सन्माननीय सदस्यांच्या कानावर हा विषय गेला आणि त्यांना हा विषय समजल्यानंतर मतदान करुन विधेयक मंजूर केले असे चित्र सदनामध्ये उभे राहील. त्याचा परिणाम बाहेर सुध्दा होतो. नवीन मुंबईबद्दल चर्चा करीत असताना एक गोष्ट लक्षात आली की, वातावरण पेटविण्याचे काम मिडिया करते. मिडियाव्दारे दोन दिवसांपूर्वीच्या घटना आजही दाखविल्या जातात. त्या गावातील लोक पोलीस स्टेशनवर चालून गेले असे आज दाखवितात. त्यामुळे त्या ठिकाणी लढाई चालू आहे की काय असा विचार सर्वसामान्य जनता करते. त्याचे दुष्परिणाम सर्वसामान्य रहिवाशांना भोगावे लागतात. अनेक लोक घराच्या बाहेर पडत नाहीत. अनेक मुले शाळा-कॉलेजमध्ये जात नाहीत. नोकरीवर जाणारे लोक सुध्दा जीवाच्या भीतीने घरी बसलेले आहेत. या महामंडळाच्या बाबतीत असे होऊ नये याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. आम्ही या ठिकाणी चर्चेचा आग्रह धरतो त्याच्या पाठीमागे काही तरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

उद्देश असतो. चर्चेच्या बाबतीत नियमामध्ये स्पष्ट तरतूद आहे. कोणतेही विधेयक मांडल्यानंतर कमीतकमी चार दिवस ते विधेयक वाचण्याची संधी सन्माननीय सदस्यांना मिळाल्यानंतरच ते विधेयक परत चर्चेला येऊ शकते. त्यानंतर ते विधेयक मंजूर करावयाचे की, नामंजूर करावयाचे हे ठरते. या सर्व तरतुदी डावलून केवळ एखादी गोष्ट तातडीची आहे म्हणून अशा पध्दतीने विधेयक समोर आणावयाचे हे अयोग्य आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी माननीय सभापतींची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. मला सकाळी एका गोष्टीचे दु:ख झाले. सकाळी सन्माननीय सदस्यांचा विरोध डावलून माननीय उपसभापतींनी झटकन सांगितले की, विधेयकावरची चर्चा सुरु करा आणि त्यावेळी आमचे मित्र सन्माननीय मंत्रिमहोदय झटकन उभे राहिले आणि आदेशाचे पालन करावयास लागले. इतर वेळी आदेश आला की, खरोखरच उभे राहावे की नाही याचा विचार करतात. मंत्री म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर त्यांना तो कोटा पूर्ण करावा लागतो. त्या ठिकाणी कॉम्प्रमाईज नसते. याबाबतीत मला त्यांना दोष द्यावयाचा नाही. परंतु अशा पध्दतीने विधेयक मंजूर व्हावयास नको असे आम्ही सांगत होतो. सार्वजनिक उपक्रम भराभर बंद पडतील अशी कृती करु नका. हे सार्वजनिक उपक्रम अतिशय महत्वाचे आहेत म्हणून चालू केले आहेत. कै. यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना सार्वजनिक उपक्रम सुरु केलेले आहेत. सामाजिक कर्तव्य, समाजवाद, सगळ्या लोकांना संधी मिळावी, त्यांना रोजगार मिळावा, त्यांचे कुटुंब सुखी व्हावे, जनतेला वाजवी दरामध्ये प्रवास करावयास मिळावा, त्यांना सुरक्षितता मिळावी, दरोडे पडू नये अशा उद्देशाने हे महामंडळ निर्माण केले आहे. आज ते मंडळ आजारी पडत आहे. एक एक टायर आणि एक एक चक्र निखळून पडावयास लागले आहे. एस.टी. महामंडळ आजारी पडेल की काय अशी साधार भीती निर्माण झालेली आहे. आपण अशी तरतूद करुन याला गती देत आहात परंतु ती गती टिकवून महामंडळाचा फायदा होईल अशी कृती करावी. आज ही जबाबदारी आपल्याकडे आहे. भविष्य काळात दुसरे कोणी येतील. नवीन मंत्री आले की नवीन विचार येतात आणि त्या नवीन विचारांची अंमलबजावणी सुरु होते.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...)

माणसांना हाताळण्याची निरनिराळया लोकांची निरनिराळी पध्दत आहे. या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने मला इतकेच सांगावेसे वाटते की, जे या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे त्यादृष्टीकोनातून आपण काळजी घ्यावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2006चे वि.प.वि.क्रमांक 11 - महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात माझ्या समोर जे तीन-चार मुद्दे उपस्थित झालेले आहेत ते मांडणे अनिवार्य आहे. या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये म्हटलेले आहे की, मंडळाचा अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत निर्णय करणे आवश्यक आहे. निरनिराळया सार्वजनिक उपक्रमांचे पुनरुज्जीवन करता येणे ही आवश्यक गोष्ट आहे. ब-याचशा सार्वजनिक उपक्रमांची आज काय अवस्था आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. काही सार्वजनिक उपक्रमांवर मी काम केलेले असल्यामुळे काही गोष्टी माझ्या लक्षात आलेल्या आहेत. त्यामधील पहिली गोष्ट म्हणजे प्रत्येक सार्वजनिक उपक्रमाला आर्थिक शिस्त लावण्याची आवश्यकता आहे. ब-याचशा उपक्रमांची कोणकोणत्या बँकामध्ये किती किती खाती आहेत यासंबंधीची माहिती नव्याने पदभार स्वीकारलेल्या पदाधिका-याला महिन्या दोन महिन्याच्या आत दिली गेली पाहिजे. अनुभव असा आहे की, पदाधिका-याने आर्थिक बाबीसंबंधी विचारणा केली तर त्याबाबतची माहिती त्याला लवकर दिली जात नाही. तेव्हा उपक्रमाची कार्यालयाच्या अखत्यारित असलेली बँक खाती, एफ.डी.खाती, रिव्हाल्व्हिग फंड तसेच वेगवेगळया बँकामध्ये असलेली खाती नियमानुसार आहेत की नाहीत, यासंदर्भात आर्थिक व्यवस्थापन असले पाहिजे. उपक्रमातील भ्रष्टाचाराच्या मुद्याबाबत वेगळी चर्चा होऊ शकेल. किमान आर्थिक शिस्त ही उपक्रमामध्ये ठेवली पाहिजे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, या सार्वजनिक उपक्रमांमध्ये अधिका-यांबरोबरच सामाजिक क्षेत्रातील वेगवेगळ्या व्यक्तींची पदाधिकारी म्हणून नियुक्ती केली जाते. दुर्दैवाने असे सांगावेसे वाटते की, या उपक्रमामध्ये असलेले कर्मचारी आणि मनुष्यबळ संसाधन यामध्ये उपक्रमावर नेमलेल्या पदाधिका-यांनी त्यांच्या नात्यातील आणि जिल्ह्यातील लोकांची भरती केलेली आहे. ही भरती आवश्यक असलेली पदे आणि आवश्यक असलेले मनुष्यबळ यांचा विचार न करताच केलेली असल्याचे दिसून येते. उदा. एका उपक्रमामध्ये 15 टंकलेखकांची पदे असतील आणि त्यांना संगणक येत नसेल तर अशा कर्मचा-यांचे काय करायचे ? असा प्रश्न निर्माण होतो. मग असे कर्मचारी शिपाई म्हणून बसलेले मी अनेक उपक्रमातून पाहिलेले आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे पुढे सुरु...)

सभापती महोदय, "साधना" साप्ताहिकामध्ये भारत सासणे यांनी "हर्षल नावाचा गृह" ही कथा लिहिलेली आहे. त्यामध्ये त्यांनी अनुकंपा तत्वावर घेतलेली माणसे यासंबंधी असे लिहिले आहे की कार्यालयातून दोन प्रकारची माणसे दिसतात. काम केले नाही, तरी आपल्याला कोणी विचारणार नाही म्हणून काम न केलेले बरे असे म्हणणारी व काम न करणारी माणसे असतात आणि जे काम करतात ते आपण महामूर्ख आहोत म्हणून काम करतो असे म्हणतात आणि त्यामुळे त्यांची काम करण्याची प्रेरणा पूर्णपणे नष्ट झालेली असते. उपक्रमातील कर्मचा-यांची बदली होत नाही.हे कर्मचारी निवृत्तीपर्यन्त उपक्रमामध्येच असतात. मी एस.टी.महामंडळातील दोन अधिका-यांचे एक उदाहरण देते. त्यांनी कोटयवधी रुपयांचीय माया जमवली. स्वत:चे बंगले बांधले आणि त्या बंगल्यांना रंग-पतंग अशी नावे दिली. हे उदाहरण मी यासाठी दिले आहे की, आर्थिक नियोजन आणि मनुष्यबळ संसाधन करीत असताना तज्ज्ञांचा सल्ला उपलब्ध करुन देण्यात येणार असला तरी जे उपक्रमातील निवृत्त झालेले अधिकारी आहेत अशा तज्ज्ञांचा सल्ला या उपक्रमांना उपलब्ध करुन देऊ नये, अशी सूचना मला या निमित्ताने शासनाला करावयाची आहे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ....

नाही तर त्यांच्या कार्यकाळात काही तरी गडबड करुन निवृत्त झालेले तज्ज्ञ त्याठिकाणी उपक्रमामध्ये येतील आणि तेथे आपले वर्चस्व निर्माण करतील. सार्वजनिक उपक्रमातील अधिकारी आणि मंत्रालयातील अधिकारी यांच्यामध्ये एकमेकांकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. मंत्रालयातील अनेक अधिकारी उपक्रमांसाठी पुरेसा वेळ देत नाहीत. स्वत:ची ॲडजेस्टमेंट करुन वेगवेगळया बैठकांना जातात. अनेक बैठकांना ते उपलब्ध होत नाहीत. तीन महिन्यांच्या आत शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी झाली नाही तर कशा पध्दतीने यावर नियंत्रण ठेवणार आहे हे महत्वाचे आहे. कारण वर्षानुवर्षे त्याच शिफारशी केल्या जातात आणि त्याची अंमलबजावणी मात्र होत नाही. शासनाच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी तज्ज्ञ समिती आणि पुन्हा त्या समितीवर एक तज्ज्ञ समिती असे होत आहे. शासनाचे विविध उपक्रम आहेत त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी एक समिती आणि त्या समितीवर पुन्हा एक तज्ज्ञ समिती असे होता कामा नये. उपक्रम जरी चांगले असले तरी सुध्दा राजकारणातील अपरिहार्यता लक्षात घेऊन काटेकोर स्वरुपाचे नियम कसे करता येईल हे बघणे अत्यंत आवश्यक आहे. धन्यवाद.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री): सभापती महोदय, सन 2006 चे वि.प.वि.क्र-11 महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (सुधारणा) विधेयक यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता हे विधेयक याठिकाणी मांडण्यात आले होते. या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी एस.टी. महामंडळाबद्दल याठिकाणी उल्लेख केला. महामंडळाने बीओटी तत्वावर उपक्रम राबविण्यासाठी ज्या जमिनी घेतल्या त्यांची चौकशी करावी अशी मागणी केली. त्या अनुषंगाने त्यांनी माहिती दिलेली आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, या महामंडळाकडे राज्यातील सर्वच सार्वजनिक उपक्रम पुनर्रचनेसाठी दिलेले नाहीत. महाराष्ट्रातील जे उपक्रम अकार्यक्षम आहेत,पांढरे हत्ती झालेले आहेत,आजारी आहेत किंवा कालबाहय झालेले आहेत तेवढेच उपक्रम महामंडळाकडे पुनर्रचनेसाठी दिलेले आहेत. एसटी महामंडळाच्या बाबतीत जी कागदपत्रे दिली जातील त्याअनुषंगाने चौकशी करु. एस.टी.महामंडळाप्रमाणेच राज्यातील इतर महामंडळांनी बीओटी तत्वावर ज्या जमिनी विकल्या किंवा विकसित करण्यासाठी घेतलेल्या आहेत त्यांचीही माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल. ज्या ज्या ठिकाणी गैरप्रकार झालेले आहेत त्यासंबंधी चर्चा करता येईल.

सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी मांडलेला मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे त्याच्याशी मी सहमत आहे. सुधारणेसाठी बिल मांडल्यावर चर्चा करताना मूळ बिल काय होते ते कळत नाही. कारण मूळ बिल मांडून 3-4 महिने गेलेले असतात. म्हणून बिलामध्ये अमेंडमेंड करीत असताना ओरिजनल बिल काय होते त्याची कॉपी देण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्याचप्रमाणे त्यांनी बॅलन्सशीट संबंधी महत्वाचा मुद्दा उपस्थित केला. काही काही महामंडळांमध्ये 10-15 वर्षे झाली तरी बॅलन्सशीट सादर केलेली नाहीत. बॅलन्सशीट सादर केलेली नाहीत किंवा अकौंटींग केलेले नाही त्यांचे ते एक वर्षाच्या आत करुन घेऊ. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आयएएस अधिकाऱ्यांची अकौंटीबिलीटी सुध्दा महत्वाची आहे. एखाद्या महामंडळात आयएएस अधिकारी एमडी म्हणून येण्याआधी ते महामंडळ फायद्यात असते आणि त्याचा दोन-तीन वर्षाचा कालखंड पूर्ण झाल्यावर ते तोटयात जाते. तेच आयएएस अधिकारी नंतर तज्ज्ञ म्हणून येतात. कोणकोणत्या महामंडळावरील अधिकारी त्यांचा एम.डी.म्हणून कार्यकाल पूर्ण झाल्यावर फायद्यात असलेले महामंडळ तोटयात गेले याची माहिती गोळा करुन आपल्यासमोर ठेवू. कमीत कमी त्या आयएएस अधिकाऱ्याने महामंडळामध्ये कारभार काय केला ते समजू शकेल.

यानंतर श्री.खर्चे पी.

अशोधित मूल / शीघ्रलेखी नोंद

डॉ. सुनील देशमुख .....

हा निर्णय सुध्दा या अनुषंगाने घेण्यात येईल, जेणेकरुन फायदयात असलेले उपक्रम तोटयात कसे गेले हे आपल्याला समजून येईल.

सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. सरपोतदार साहेब यांनी जे मुद्दे मांडले ते याच अनुषंगाने आहेत. सगळीच महामंडळे आपण बंद करणार नाहीत तर आर्थिक शिस्त ज्याला म्हणतो त्यादृष्टीने काही महामंडळांमध्ये ती नव्हती. त्यांनी असेही सांगितले की, आपल्याच लोकांची खोगीर भरती काही ठिकाणी करण्यात आल्यामुळे फायदयात असलेले उपक्रम आर्थिक शिस्त न राहिल्याने तोटयात गेले आहेत. त्यासाठीच आपण या तज्ज्ञ समितीची नियुक्ती करीत आहोत. म्हणून मी स्पेसिफिक असे शब्द वापरले की, या महामंडळाचे रिस्ट्रक्चरिंग करायचे की रिवायव्हींग करायचे की रिऑर्गनाईज्ड करायचे यासंबंधीच आपल्याला या एक्सपर्ट लोकांचा रिपोर्ट पाहिजे आहे. यापूर्वी असे म्हटले जात होते की, अशा प्रकारचे रिपोर्ट आल्यानंतर शासनाच्या स्तरावर त्याबाबत काहीही कारवाई होत नव्हती. या रिपोर्ट्सनुसार कारवाई करणे बंधनकारक असतांना सुध्दा त्याबाबत काहीही कारवाई व्हावयाची नाही परंतु तीन महिन्याचय आत शासनाने निदेश द्यावेत म्हणूनच ही सुधारणा आणलेली आहे व ही सुधारणा याच दृष्टीने आहे. इतरही सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना या बिलाच्या निमित्ताने व्यक्त केल्या आहेत त्यांचाही प्रामुख्याने विचार करण्यात येईल. एवढे बोलून मी सभागृहाला विनंती करतो की आपल्या राज्यातील महामंडळे कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने महत्वाचे असेलेले हे बिल मान्य करावे.

श्री. श्रीकांत जोशी : महोदय, राज्य पुनर्रचना महामंडळाची जी व्याप्ती आहे ती खरे तर वाढविण्याची गरज आहे. कारण प्रत्येक महामंडळाचे वर्षभराचे मॉनिटरिंग झाले तरच त्याला अर्थ राहिल, एकदम सर्व करणे व धिसाडघाईने ते बंद करण्याबाबत निर्णय घेणे हेही बरोबर होणार नाही, म्हणून प्रत्येक महामंडळासाठी कायमस्वरुपी सी.ए. ची नेमणूक करुन वेळच्या वेळीच त्याची तपासणी झाली पाहिजे या अनुषंगाने ही व्याप्ती वाढवावी.

डॉ. सुनील देशमुख : महोदय, आपण या विधेयकाच्या माध्यमातून हे सर्व करणारच आहेत. म्हणून त्यामध्ये आपल्याला रिस्ट्रक्चरिंग करण्याची आवश्यकता आहे काय, रिवायव्हींग करणे गरजेचे आहे की महामंडळ रिऑर्गनाईज्ड करणे आवश्यक आहे असा शब्दप्रयोग आपण केलेला आहे. तसेच यामध्ये फायनान्शिअल आस्पेक्ट देखील पहायला लागतात म्हणून आपल्या ज्या सूचना आहेत त्यांचा विचार करण्यात येईल. सभागृहाने हे विधेयक संमत करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही संम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. सुनील देशमुख : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि.क्र.11, संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2006 चे वि.प.वि.क्र.11 संमत झाले आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कारखाना (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2006

L.C. BILL NO.I OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE FACTORIES ACT, 1948, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि.क्रमांक -1 कारखाने अधिनियम,1948, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडातो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची परिस्थिती दयनीय आहे. शेती उत्तम, व्यवसाय उत्तम की, नोकरी उत्तम असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे पडला आहे. पण यातसुध्दा आता कालानुरूप बदल होत आहे. आज राज्यातील शेतकरी आर्थिक अडचणीमध्ये आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सशक्त बनविण्याचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून हे विधेयक सभागृहासमोर आले आहे. कारखाने अधिनियम 1948 यामध्ये सुधारणा करावयाचे आहे. एखाद्या कारखान्यामध्ये 10 कामगार असतील आणि त्या कारखान्याचे काम विजेवर चालत असेल तर तेथे हा अधिनियम लागू होतो. परंतु, जेथे 20 किंवा 20 पेक्षा जास्त कामगार आहेत, पण तेथील काम हे विजेवर चालत नसले तरी देखील हा अधिनियम तेथील कामगारांना लागतो. याचा फटका पुष्पसंवर्धन, फळबागायत आणि स्ट्राबेरीसह अन्य उच्च मूल्यांकित पिकांची लागवड करणाऱ्या ग्रीन हाऊसेस आणि पॉली हाऊसेसमध्ये काम करणाऱ्यांना बसत होता. शेतकऱ्यांना दोन पैसे जास्त मिळण्यासाठी या अधिनियमातून ग्रीन हाऊसेस आणि पॉली हाऊसेस वगळण्याचे शासनाने ठरविले आहे म्हणून हे विधेयक येथे मांडण्यात आले आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, कारखाना अधिनियम, 1948, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक येथे मांडण्यात आले आहे. या विधेयकाचे स्वागत करण्यासाठी मी उभा आहे. हे विधेयक आणल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो.

आपल्या देशातील जी सामजिक, धार्मिक व्यवस्था होती तिचा प्रभाव कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये होता. पण आता कौटिल्याच्या अर्थशास्त्राची उलटापालट झाली. आज नोकरी श्रेष्ठ झाली आहे. व्यापार मागे पडत चालला आहे. आपल्या शेतीला पारंपरिक श्रेष्ठत्त्व लाभले होते. पण त्याच शेती व्यवसायाची आज अत्यंत दुरावस्था झाली आहे. आपला देश कृषि प्रधान असल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचा फार मोठा वाटा आहे. आपला देश 5 लाख खेडयांचा आहे. आमच्या देशाच्या तिजोरीमध्ये जवळजवळ 70 टक्के महसूल हा शेतीद्वारा ग्रामीण भागातून जमा होतो.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे....

या देशाची प्रगती आणि सन्मान, ज्याला आपण बळीराजा म्हणतो त्याच्या हातावर अवलंबून आहे. शेतकऱ्यांच्या हातावर हा देश उभा आहे. परंतु आज मात्र शेतकरी दिवसेंदिवस कमजोर होत चालला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणे, शेतीशी संबंधित आणि अनुषंगिक असलेल्या व्यवस्थापनाचा, उद्योगाचा आणि व्यवसायाचा विचार करणे नितांत आवश्यक झाले आहे. म्हणून शेतीशी संबंधित जे व्यवसाय असतील, मग ते पुष्पसंवर्धन असो, फळबागांचे संवर्धन असो किंवा इतर कृषी उपक्रम असोत, त्यांना चालना देण्यासाठी आणि कृषी उत्पादनाला निर्यातीमध्ये वाव देण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. राज्यात जी जमीन नापिक आहे ती जास्तीत जास्त लागवडीखाली कशी येईल आणि देशाची कृषी अर्थव्यवस्था कशी बलाढय होईल या हेतूने हे जे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे ते स्तुत्य आहे.

आजच्या युगामध्ये फुलांचा शोक हा सर्वांनाच आहे. सत्कार समारंभामध्ये, स्वागत समारंभामध्ये, व्हॅलेंटाईन-डे च्या वेळी, जागतिक महिला दिनाच्या वेळी इतकेच नव्हेतर जागतिक भाषा दिन असेल त्या दिवशी सुध्दा फुलांचा वापर मोठया प्रमाणावर वाढत चालला आहे. फुले आणि फुलांची रोपे झोपडीमध्ये राहणारा माणूस, विकत घेऊन आपल्या सायकलीवरुन घरी आणतो व त्याची लागवड करतो. हीच लागवड पर्यावरणामध्ये संतुलन राखण्यास फायदेशीर ठरते. मला सांगताना आनंद होतो की, दिवसेंदिवस ही जाणीव या राज्यातील आणि देशातील जनतेमध्ये वाढत चालली आहे ही स्वागतार्ह बाब आहे. पुष्पसंवर्धन आणि फळ बागायतीच्या माध्यमातून उत्पन्न घेणे ही बाब योग्य आहे. काल-परवा राज्यात अवेळी पाऊसामुळे निसर्गाने शेतकऱ्यांवर मारा केला. मागच्या घटनांच्या जखमा दुरुस्त होण्यापूर्वीच पुन्हा एकदा राज्यातील शेतकऱ्यांना संकटाला सामोरे जावे लागले. विदर्भात आणि राज्यातील काही भागांत गारपीट झाली. त्यामध्ये शेतीतील उभी पिके नष्ट झाली. विशेषत: विदर्भातील संत्र्यांच्या आणि नाशिक परिसरातील द्राक्षांच्या बागांचे या गारपीटीमुळे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले. तसेच शेतकऱ्यांच्या पिकांचे सुध्दा नुकसान झाले. विधेयकामध्ये उच्च मूल्यांकित पिकांची लागवड असा उल्लेख आहे. परंतु उच्च मूल्यांकित पिके म्हणजे काय याचा खुलासा करण्यात आलेला नाही. हा खुलासा झाला असता तर बरे झाले असते. ज्या कृषि मालाला अधिक मूल्य प्राप्त होते आणि त्यातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ होतो त्या पिकांची लागवड या उपक्रमातून केली जाते. मग ती हरीतगृहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असतील, पॉली गृहे असतील. परंतु हे 1948 च्या कारखाना अधिनियमाच्या कक्षेतून वगळण्याचे आणि अशा शेतीशी संबंधित जे उद्योग, उपक्रम, व्यवसाय आहेत त्यांना संरक्षण देण्यासाठी, त्यांचे संवर्धन करण्यासाठी, त्यांचा विकास करण्यासाठी शासनाने हे जे विधेयक आणले आहे त्याबद्दल मी शासनाचे पुन्हा एकदा स्वागत करतो.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSK/ SBT/ MHM/ MAP/ KGS यापूर्वी श्री. बोर्डे .. 16.00

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

सभापती महोदय, कारखान्याची व्याख्या इंडिअन फॅक्टरी ॲक्टमध्ये दिलेली आहे. फॅक्टरी ॲक्टच्या कक्षेतून कृषिशी संबंधित व्यवसाय किंवा उपक्रम वगळल्यामुळे आता शेतीला मुक्तता मिळेल. शेतकऱ्यांच्या विकसासाठी, आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या पुनर्वसनासाठी जागतिकीकरणाची जी प्रोसेस सुरु आहे, त्यामध्ये शेतकरी ठामपणे उभा राहणार आहे आणि केवळ उभा राहणार नाही तर विदेशामध्ये आपल्या मालाच्या, वस्तुंच्या निर्यातीची क्षमता देखील निर्माण करेल. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी हे जे विधेयक आणले आहे, त्याचे मी स्वागत करतो. धन्यवाद !

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, कारखाना अधिनियम, 1948 संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे साहेबांनी जे विचार मांडले, त्याच्याशी मी सहमत आहे. पण या संदर्भात मी फक्त 2-3 सूचना करु इच्छितो. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे साहेबांनी, शेतकरी सक्षम झाला पाहिजे हे जे सांगितले त्याबद्दल कोणाचेही दुमत नाही. आज फुलांची मागणी दिवसेंदिवस वाढत चालली आहे, फुलांचा धंदा तेजीत आहे. आपली फुले स्थानिक बाजारातच नाही तर परदेशात देखील पोहोचू लागली आहेत. त्याचप्रमाणे फळे देखील परदेशात जाऊ लागली आहेत. सभापती महोदय, परदेशातील फळे देखील आपल्याकडे दिसायला लागली आहेत. ऑर्कीडला आपल्या मुंबईमध्ये मोठे मार्केट आहे. स्पष्टीकरणामध्ये म्हटले आहे की, जैव तंत्रज्ञानाद्वारे रोपांची निर्मिती करुन घेण्यात येणाऱ्या पिकांची लागवड. सभापती महोदय, जैव तंत्रज्ञान हे महागडे तंत्रज्ञान आहे. शेतकऱ्यांच्या नावाखाली काही व्यापारी या जैव तंत्रज्ञानाचे मार्ग अनुसरुन जर अशाप्रकारचे कन्सेशन घेण्याचा प्रयत्न करणार असतील तर ते चुकीचे आहे. जैव तंत्रज्ञानात करोडो रुपयांची उलाढाल होते. हे जैव तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी करोडो रुपये घालावे लागतात. सर्वसामान्य शेतकरी जैव तंत्रज्ञानापासून कित्येक मैल लांब आहे हे आपण मान्य केले पाहिजे. वास्तविक शेतकऱ्यांनी त्यामध्ये असले पाहिजे. परंतु दुर्दैवाने म्हणा किंवा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची आर्थिक बाजू कमजोर असल्यामुळे म्हणा, महाराष्ट्रात शेतकरी जैव तंत्रज्ञानापासून लांब आहे. कोणीतरी धनिक किंवा कारखानदार शेतकऱ्यांच्या नावाखाली अशाप्रकारची सूट घेण्याचा प्रयत्न करतील, अशी मला भीती वाटते. दुसरे म्हणजे औषधी व सुगंधी वनस्तपीची लागवड आणि प्रक्रिया उद्योग. आज कॉस्मेटिकमध्ये अनेक प्रकारचे कॉस्मेटिक आणि हर्बल प्रॉडक्ट्स पहायला मिळतात. नंतर त्यावर प्रक्रिया करणारे कारखाने उभे केले जातील. आज आपल्याला शहनाज हुसेनचे ब्युटी पार्लर प्रॉडक्ट्स तसेच अरोमा प्रॉडक्ट्स पहायला मिळतात. ते कॉस्टली प्रॉडक्ट्स आहेत. तरी, माझा आपणास प्रश्न आहे की, अशा प्रकारच्या कारखान्यांना आपण फॅक्टरी ॲक्टमधून सूट देणार का ? की, ज्यांच्या प्रॉडक्ट्सची सुरुवात शेकडो रुपयांपासून होते. सभापती महोदय, या गोष्टीचा देखील विचार करणे आवश्यक आहे. ॲरोमॅटिक्स कंपाऊंड्स आहेत, ज्यामध्ये ॲरोमॅटीकचे लाखो रुपयांचे प्रॉडक्ट्स असतात.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

या गोष्टीचा देखील आपणास विचार करणे आवश्यक आहे. कायद्यामध्ये सुधारणा करीत असतांना त्याची गरज आहे काय हे तपासणे शासनाचे कर्तव्य आहे. शासनाकडे या संदर्भातील सूचना प्राप्त झाल्या होत्या काय ? यासंदर्भात मला माहिती नाही. मशरुमचा उपयोग हा सर्व हॉटेल धंद्यामध्ये मोठया प्रमाणात होत आहे. म्हणून मला येथे बेसिक हे सांगावयाचे आहे की, ज्या शेतकऱ्यांनी यामध्ये कन्सेशन मागितलेले आहे त्यांच्या 7/12 च्या उताऱ्याचा आकार घोषित करण्याची आवश्यकता आहे. तरच यासंदर्भातील प्रॉडक्ट उत्पादन करण्यास त्यांना सहकार्य करावे. अशी माझी नम्र सूचना या विधेयकाच्या माध्यमातून आहे एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मला पॉईंट ऑफ इन्फर्मेशनवर बोलावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिपक सावंत यांनी जैविक तंत्रज्ञानाचा जो मुद्दा मांडलेला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. जैव तंत्रज्ञान अत्यंत महागडे आहे. हे महागडे तंत्रज्ञान आमच्या शेतकऱ्यांना स्वस्तामध्ये उपलब्ध करुन देण्याची सोय झाली तर शेतकऱ्यांना त्याचा चांगल्या प्रकारे लाभ मिळेल. कमर्शियल दृष्टाकोनातून जर जैविक तंत्रज्ञान कारखान्यांनी निर्माण केले तर ते शेतकऱ्यांना स्वस्त दरामध्ये देण्यात येईल काय या संदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या विधेयकाचे मी पार्शल स्वागत करणार होतो परंतु या विधेयकाच्या संदर्भात टीका करण्याची संधी मंत्री महोदयांनी दिलेली आहे. हे विधेयक अर्धवट आणलेले आहे एखाद्या सेक्टरमध्ये सुधारित शेती करतांना मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र व कोकण अशा काही मागास भागामध्ये या विधेयकाद्वारे काही नवीन सूचना सरकारने दिल्या असत्या तर चांगले झाले असते. परंतु दुर्दैवाने सरकारमधील एखाद्या कक्ष अधिकाऱ्यांने या बिलाचा ड्राप बनविला व तो जशाचा तसा आमच्या समोर मंत्री महोदयांनी आणलेला आहे. फॅक्टरी ॲक्ट आता आऊट डेटेड झालेला आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु त्या फॅक्टरी ॲक्टवर काय सोल्युशन काढले हे त्यांनी सांगितलेले नाही. एखादा कंपनी मालकांने जर तेथील कामगारांना त्रास दिला तर त्या संदर्भात काही तरतूद केलेली नाही. फॅक्टरीचे मालक सुगंधी औषधे, हर्बल उत्पादने बनविणार आहेत. परंतु ही सुगंधी औषधे बनवितांना मुख्यत्वेकरुन यामध्ये 100 प्रकार आहेत. जेट्रोफा व इतर सुंगधी वनस्पती, औषधी वनस्पतींची लागवड शेतकऱ्यांनी केली तर त्यांना प्रती एकरी 40 ते 50 हजार रुपये उत्पन्न मिळू शकते. या वनस्पतींच्या पानापासून, देठापासून, फुलांपासून, मुळांपासून सुगंधी तेले तयार होतात. परंतु हे तेल तयार करतांना सदर कारखान्याला बॉयलरची गरज भासते. परंतु असा बॉयरल जर फुटला आणि तेथील कर्मचारी त्यामध्ये मृत्यू पावले तर त्या कर्मचाऱ्यांना कारखान्याकडून काय नुकसान भरपाई मिळेल यासंदर्भात काहीही तरतूद या विधेयकात करण्यात आलेली नाही. कामगारांच्या संरक्षणाबाबत कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. अशा प्रकारच्या त्रुटी या विधेयकामध्ये राहिलेल्या आहेत त्या दुरुस्त करण्याची गरज आहे. सुंगधी औषधे, वनस्पतींची लागवड प्रक्रिया काय आहे ? ही हर्बल औषधे तयार करण्यासाठी जे जीन्स लागतात ते कसे उपलब्ध करणार ? यासाठी काही हजार रुपये खर्च येतो. सदर प्लॅन्ट हा एअरकंडीशन असावयास पाहिजे, त्यासाठी मायक्रोस्कोप मशीन लागतात, यासाठी जास्त पगार असणारे कर्मचारी लागतात.

यानंतर श्री. सांगळे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ....

या उद्योगांमध्ये 100 कोटी रुपयांपासून गुंतवणुकीला सुरुवात होते. अशा पध्दतीच्या इंडस्ट्रीज आल्याशिवाय बायो टेक्नॉलॉजीचे रिसर्चचे काम भारतात किंवा महाराष्ट्रात होऊ शकत नाही. यासाठी महाराष्ट्रात फक्त मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड या भागामध्येंच सर्व उद्योग काढावयाचे काय ? उद्योग काढण्यासाठी मराठवाडयातील अतिशय कमी हयूमन इंडिकेटर असलेल्या 8 जिल्हयांचा, विदर्भातील 10 जिल्हयांचा विचार का करण्यात आला नाही ? हा महत्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे हा कायदा विशिष्ट सिमीत क्षेत्रांपर्यत केला असता तर भंडारा, लातूर, उस्मानाबाद व 6000 रुपयांपेक्षा कमी दरडोई उत्पन्न असलेल्या हिंगोली सारख्या मागास जिल्हयामध्ये उद्योग सुरु होऊ शकले असते. पहिल्या टप्प्यामध्ये अशा पध्दतीचा कायदा करीत असताना पश्चिम महाराष्ट्रातील खटाव किंवा मान सारख्या दुष्काळी तालुक्याचा विशिष्ट भाग डोळयासमोर ठेऊन या कायद्याचे रिलॅक्सेशन देणे आवश्यक होते, जेणेकरुन तेथील भागांमध्ये उद्योग येऊन तेथील शेतक-यांना कृषि उत्पादनासाठी उत्तेजन मिळू शकेल. उदाहरण म्हणून मी सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी खूप प्रयत्न करुन लातूर येथे सोयाबीनचा प्रकल्प कार्यान्वित केला. त्यावेळी टिना नावाच्या अमेरिकन कंपनीला सुरुवातीस कोणीही सोयाबीन देत नव्हते. तेव्हा या कंपनीने तेथील शेतक-यांना प्रवृत्त केले. आज अशियातील सर्वात मोठे मार्केट म्हणून लातूरचे नाव दुस-या क्रमांकावर आहे. या टिना कंपनीची अंदाजे 450 टनाची स्वत:ची रिफायनरी आहे. त्याप्रमाणे लातूर जिल्हयामध्ये श्री.अग्रवाल नावाच्या एका उद्योगपतीने किर्ती ऑईल नावाची इंडस्ट्रीज टाकली. आज या इंडस्ट्रीजद्वारे जवळपास 500 कोटी रुपयांचे सोयाबीनचे पेमेंट केले जात आहे. त्यांच्या बॅलन्स शीटमध्ये प्रसिध्द झालेली आकडेवारी मी या ठिकाणी सांगत आहे. म्हणून आपल्याला कायदे करीत असताना याबाबतचा विचार करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी फॅक्टरी ॲक्टमधील सर्व कलमे लावण्याची आवश्यकता नाही. परंतु किमान प्रक्रिया उद्योगात कधी अपघात होईल याची शाश्वती नसल्यामुळे तेथील प्रत्येक व्यक्तीचा विमा करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे हा कायदा एवढया घाईघाईने आणण्याची आवश्यकता नव्हती. या कायद्यातील किमान काही गोष्टी बंधनकारक केल्या पाहिजेत. प्रक्रिया उद्योग वर्षभर चालू राहू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे कायमस्वरुपी नोकरीचे फायदे देता येईल की नाही हे निश्चित नसल्यामुळे यासाठी वेगळया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी ....

प्रकारचा कायदा करण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी थोडया वेळापूर्वीच कृषि उद्योगाच्या बाबतीत उल्लेख केला होता. कृषि उद्योगाच्या बाबतीत कायदा का केला जात नाही ? तसेच जिनिंगचा उद्योग हा वर्षातून फक्त सहा महिने सुरु असतो तेथे काम करीत असलेल्या एखाद्या कामगाराच्या डोळयामध्ये जर सरकी गेली तर त्यास कोणत्याही प्रकारचे फायदे मिळत नाहीत, संरक्षण मिळत नाही. कृषिवर आधारित उद्योगांच्या बाबतीत वेगळया प्रकारचे कायदे असावेत यासाठी साकल्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. हे कायदे करीत असताना जे भाग औद्योगिकदृष्टया मागे आहेत त्या ठिकाणी कायद्याचे रिलॅक्सेशन देण्यास हरकत नसावी. परंतु पुणे, मुंबई, पिंपरी-चिंचवड या ठिकाणी मोठया प्रमाणावर नवीन उद्योग येऊ शकत असल्यामुळे तेथे कायद्याचे रिलॅक्सेशन द्यावयाचे किंवा नाही याबाबत विचार केला गेला पाहिजे. म्हणून कडक पध्दतीचे कायदे केल्यास उद्योगपतींना चंद्रपूर सारख्या ठिकाणी उद्योग सुरु करावासा वाटेल. विशेषत: बायो टॅक्नालॉजीच्या बाबतीत कायद्याचे रिलॅक्सेशन करीत असताना किमान मागास भागाचा निकष त्यामध्ये असावयास पाहिजे होता. अन्यथा सर्व उद्योग मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड सारख्या भागात येतील. सध्या पावणेदोन कोटी लोकसंख्या असलेल्या मराठवाडयातून दरवर्षी 5 लाख लोकांचे स्थलांतर होत आहे, त्यापैकी 2 लाख लोक कायमस्वरुपी पश्चिम महाराष्ट्रात जात आहेत. ज्यावेळी आपण सन 2020 सालचा प्रगत भारत बघू त्यावेळी मराठवाडयाची लोकसंख्या कमी होण्याची शक्यता आहे. मी सांगितलेली वरील आकडेवारी ही माननीय मुख्यमंत्र्यांनी हयुमन डेव्हलपमेंट इंडिकेटरमध्ये स्वत: सांगितलेली आहे हे मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

(यानंतर श्री.सुंबरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी.....

ह्यूमन डेव्हलपमेंट इंडिकेटरमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: हे सांगितलेले आहे आणि घोषणा केलेली आहे की आम्ही त्याबाबतीत काहीना काही करण्याचा प्रयत्न करतो आहोत. म्हणून किमान ही उत्तेजना देत असताना, यामध्ये अजूनही काही गोष्टींची वाढ करायला पाहिजे असे माझे मत आहे. ही वाढ करीत असताना, विशेषत: कृषी उद्योगावर आधारित सगळेच उद्योग त्यात घेता आले तर पहावे. त्या दृष्टीकोनातून एक वेगळा कायदा करा. पण तो वेगळा कायदा करीत असताना, एम्प्लॉयर आणि एम्प्लॉईमध्ये किमान ॲक्सेंट बेनिफिटस् त्याला मिळालेच पाहिजेत. आरोग्याच्या बाबतीत विशेषत: काहीना काही संरक्षक अशी भूमिका सरकारची असलीच पाहिजे. कारण शेवटी या कायद्यांद्वारे बेनिफीटस् कोणाला दिले पाहिजेत ? जो सगळ्यात शेवटचा घटक आहे त्याला हे फायदा दिले गेले पाहिजे. मग सगळ्यात शेवटचा घटक कोण आहे ? एक घटक आहे कल्टिव्हेटर आणि दुसरा घटक आहे प्रोसेसिंग इंडस्ट्रीमधील कामगार. सभापती महोदय, आज प्रोसेस इंडस्ट्री मधील कामगाराकडे कोठल्याच पद्धतीचे लक्ष न दिल्यामुळे आपली प्रोसेस इंडस्ट्री ही दिवसें दिवस इर्रिलेवंट होत चालली आहे. त्या कामगाराला कायद्याचे संरक्षण हमी नसल्यामुळे त्याला त्यात करिअर वाटत नाही. मग तो ऊस तोडणी कामगार असेल वा कापूस वेचणारा कामगार असेल, जिनिंग प्रेसिंगमधील कामगार असेल किंवा तुमच्या वेगवेगळ्या ॲग्रीकल्चर प्रोसेसमधील कामगार असेल, त्याला स्वत:चे भवितव्य नाही अशा प्रकारची परिस्थिती या उद्योगांमध्ये असल्याचे वाटत असते. दुर्दैवाने सरकारने देखील या बाबत कधीही गंभीरतेने विचार केलेला नाही. तेव्हा आज निदान हा कायदा आणताना तरी सरकारने या सगळ्या गोष्टींचा साकल्याने विचार करावयास पाहिजे होता. आपल्याला मी सांगू इच्छितो की, या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची संख्या ही किमान 25 ते 30 लाख आहे आणि हे सारे कामगार टोटल अन्ऑर्गनाईज्ड आहेत. त्यांची कोठलीही संघटना नाही. ते आपली संघटना करू शकत नाहीत. ऊस तोडणी कामगारांची संघटना आहे पण ती नावाला आहे. कारण त्यांची संघटना त्यांचे मुकादमच चालवितात आणि त्या कामगारांची पिळवणूक ही होतच आहे. आता पर्यंत तरी तशा पद्धतीचे कधीही प्रयत्न झाले नाहीत. ऊस तोडणी कामगार आणि हर्बल ऑईल्सचा कामगार यामध्ये काय फरक आहे ? तोही पाला वेचणार आणि हाही ऊस तोडणार. पण पाला वेचणाऱ्याला कोठल्याही प्रकारे कायद्याचे संरक्षण नाही आणि ऊस तोडणाऱ्याला देखील सध्या कोठलाच कायदा लागू नाही. पण साखर

.... TT 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

कारखादारीमध्ये गेल्यानंतर मात्र सगळे कायदे लागू होतात. आता तुम्ही या कारखानदारीला देखील इलिमिनेट करीत आहात आणि म्हणत आहात की, कारखानदारीमध्ये काम करणाऱ्या कामगाराला सुद्धा यापुढे कोठलाही कायदा नको. त्याशिवाय तो येणार नाही. सभापती महोदय, विशिष्ट गोष्टीचे हित डोळ्या समोर ठेवून कायदा चालला आहे. हे होत असताना महाराष्ट्राचे हित आपण पाहिले आहे काय ? हा माझा मुलभूत प्रश्न आहे. तेव्हा महाराष्ट्राचे हित ओव्हरऑल बघत असताना, जो भौगोलिक असमतोल झालेला आहे, जी विषमता निर्माण झालेली आहे., आणि खऱ्या अर्थाने असे होण्याचे कारण म्हणजे ज्या पद्धतीने इन्फ्रास्ट्रक्चरवर खर्च आपण मुंबई-पुणे भागामध्ये करतो आहोत त्याचा हा परिणाम आहे. म्हणजे आयटी इंडस्ट्री ही मुंबई-पुण्यामध्येच का आली ? तर पहिली कनेक्टिविटी ही या भागातच आली. ही कनेक्टिविटी लातूर किंवा नागपूरला मिळाली असती तर नागपूर-लातूर जास्त पुढे गेले असते. पहिली कनेक्टिविटी घेण्यामध्ये पुणे आणि बेंगलोर यांनी आघाडी मारली. या उद्योगामध्ये कनेक्टिविटी हा आत्मा होता, त्यामुळे ही दोन्ही शहरे पुढे गेली. आज आय.टी. आणि बी.टी.च्या क्षेत्रामध्ये देखील निश्चितपणे इनव्याज मध्ये इन्सेंटिव आणि जो ....

(वेळ संपल्याची घंटी वाजविली जाते ..)

सभापती महोदय, विधेयकावर बोलण्यासाठी वेळेचे बंधन नसते असे म्हणतात. तर मग आपण घंटी कशासाठी वाजविता ?

तालिका सभापती (श्री. गुरूनाथ कुलकर्णी) : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, विधेयकावर बोलताना देखील त्याचा हेतू, उद्देश आणि त्या अनुषंगानेच केवळ बोलावयाचे असते.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मी या विधेयकाच्या उद्देशाच्या संदर्भातच बोलतो आहे, त्या व्यतिरिक्त मी काहीच बोलत नाही. म्हणूनच मला आपल्या मार्फत मंत्री महोदयांना असे सांगावयाचे आहे की, यातील बायोटेक्नॉलॉजी आणि हर्बल ऑईलच्या प्रक्रिया उद्योगाच्या संबंधातच जे फायदे देण्याचे चालले आहे, ते फायदे देत असताना कामगार कायदे पूर्णपणे बाजूला ठेवून एम्प्लॉयरला मोकळे रान ठेवण्याचे जे प्रयत्न होत आहेत ते केव्हाही समर्थनीय नाही. हा प्रयत्न पार्शली समर्थनीय आहे. एम्प्लॉयरवर देखील काहीना काही बंधने, नियंत्रण आणण्याची गरज आहे. नव्हे ती एक काळाची गरज आहे. हे आपणास का समजले नाही हे मला कळत नाही. म्हणजे

..... टीटी 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बॉयलर सारखी गोष्ट आहे, ती आपण पूर्णपणे कायद्यातून बाजूला करून टाकायची. आपण आयबीआरचे मंत्री आहात त्यामुळे आपल्याला कल्पना असेल की, आयबीआर मान्य नसलेले बॉयलर आले तर त्याचे परिणाम काय होऊ शकतात, किती मोठे स्फोट होऊ शकतात. सभापती महोदय, मी दोन कारखान्यांमध्ये माझ्या दोन एमटेक मित्रांना स्वत: मदत केली आहे. त्यामध्ये सगळ्यात मोठी समस्या ही रॉ मटेरिअल मिळविण्यात असते आणि त्यानंतरची समस्या म्हणजे प्रोसेसच्या बाबतीत येते. हर्बल ऑईल्स मधून वेगवेगळ्या पद्धतीचे विषारी वायू बाहेर पडू शकतात. त्यात प्रोसेस थोडी जरी चुकली तरी त्याचा फटका संपूर्ण गावाला बसू शकतो. अशा पद्धतीच्या काही गोष्टी होऊ शकतात. म्हणून आपण संपूर्णत: या कायद्यातून एम्प्लॉयरला बाजूला ठेवणे हे कितपत योग्य आहे याचे स्पष्टीकरण आपण येथे द्यायला पाहिजे असे मला वाटते. मी आपल्याला ज्यापमाणे सुगंधी गवताचे सांगितले तसे आता जिट्रोपा पुढील काळामध्ये येणार आहे. तर मग ते यामध्ये आपण घेणार आहात की नाही ? ते ज्वालाग्रही तेल आहे. जिट्रोपा पासून गाड्या देखील चालतात. हे आपणा सगळ्यांनाच माहीत आहे. तेव्हा या पुढील काळामध्ये आपण यामध्ये जिट्रोपा घेतले तर त्यावरील मोठमोठे प्लॉटस् आल्यानंतर त्यावर आपल्याला नियंत्रण ठेवावयाचे नाही का ? त्याचप्रमाणे हर्बल आणि बायोटेक्नॉलॉजी मध्ये देखील ज्या पद्धतीचे एक्स्प्रिमेंटस् चालले आहेत ते जीवघातक देखील ठरू शकतात. याचा अर्थ त्याला आपले किचकट कायदे लावा असे माझे म्हणणे नाही. पण किमानपक्षी जेथे प्रोसेस चालू आहे तेथे काहीना काही सरकारचा संपर्क हा संरक्षणाच्या दृष्टीने असण्याची गरज आहे. यापुढील काळात एखादी कोठली तरी मोठी घटना घडू शकते. असे झाले की लोक म्हणू लागतात की, कायदे करणारे तुम्हीच होता. तुम्ही त्यावेळी का लक्ष घातले नाही. तुम्ही नीट बघून कायदे का केले नाहीत ? त्यावेळेस मात्र मी सांगू शकेन की, हो बरोबर आहे, मी हा कायदा करताना सांगितले होते की, हा कायदा अर्धवट आहे. अपरिपूर्ण आहे, विचार करून केलेला नाही. म्हणून यामध्ये काही दुरूस्त्या या लौकरात लौकर आणाव्यात. एक परिपूर्ण कायदा सदनासमोर आपण घेऊन यावा अशी अपेक्षा मी या निमित्ताने आपल्याकडे व्यक्त करतो आणि माझे विचार संपवितो.

****

(यानंतर श्री.सरफरे ...यूयू 1 ..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय नामदार श्री. गणेश नाईक यांनी कारखाने अधिनियम 1948 मध्ये सुधारणा करणारे विधेयक याठिकाणी मांडले आहे त्याचे माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी अर्धवट स्वागत केले. मलाही तेच करावे लागेल. या विधेयकातील काही गोष्टी खूप चांगल्या आहेत हे पाहून खूप बरे वाटते. परंतु काही बाबी दुर्लक्षित झाल्या आहेत त्यांचा विचार कां केला नाही याचे आश्चर्य वाटते?. हे विधेयक मांडतांना आपण शेतकऱ्याला डोळयासमोर ठेवला आहे. परंतु शेतमजूराला विसरला आहात. हा शेतकरी कोणता आहे? आज महाराष्ट्रामध्ये 5 ते 10 एकर शेती असलेल्या शेतकऱ्यांची संख्या किती आहे? एवढा जरी आपण विचार केला तरी आपल्या लक्षात येईल की, एका विशिष्ट ठराविक सधन शेतकऱ्यांचा या विधेयकामुळे फार मोठा फायदा होणार आहे. त्यातून तळागळातील माणसाला किती लाभ होणार आहे याचा विचार या विधेयकामध्ये केला आहे असे मला वाटत नाही. सुरुवातीच्या काळात म्हटले जायचे की, "उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी" आता त्या उलट म्हटले जाते "उत्तम नोकरी, कनिष्ठ व्यापार आणि मध्यम नोकरी". सरकारी नोकरी असेल तर त्याला छोकरी पटकन मिळते. तसेच सरकारी नोकरीमध्ये सुरक्षितता आहे. काल पॅरीसमध्ये फ्रान्स सरकारने एक कामगार कायद्यामध्ये सुधारणा करणारे विधेयक आणले. त्यावेळी हजारोंनी तरुण वर्ग त्या पॅरीसच्या रस्त्यावर उतरला. आणि तेथून ते त्या देशाच्या पंतप्रधानांना भेटायला गेले. परंतु आपल्या देशामध्ये तसे घडत नाही. या देशात बऱ्याच गोष्टी कराव्या लागतात त्याच्या खोलात मी जात नाही. या विधेयकाच्या निमित्ताने फळझाडे, फूलझाडे यांचा विचार केला आहे. हॉलंडमध्ये, ॲमस्टरडॅमला जगातील एक सुंदर फुलांची बाजारपेठ आपल्याला पहायला मिळते. 50 ते 100 एकरामध्ये फुलांची जगातील घाऊक अशाप्रकारची प्रचंड बाजारपेठ आहे. ती परदेशी फूले आपण विकत घेतो आणि या ठिकाणी विकतो. माझा मूलभूत प्रश्न असा आहे की, ही फूलझाडांची लागवड कोण करते? जे 5-10 एकरापेक्षा कमी जमीन असलेले शेतकरी आहेत त्यांना या कायद्याचा काय लाभ होणार आहे? त्यांना जर आपल्याला लाभ मिळवून द्यायचा असेल तर त्यांच्यासाठी मार्केटींगची व्यवस्था केली पाहिजे. कोकणातील माणसांनी जिट्रापाची शेती केली तर त्यांनी ते विकायचे कुठे? त्याला माहीत नाही. त्याकरीता तुम्हाला मार्केटींगच्या संस्था उभ्या कराव्या लागतील. आज तुम्ही प्रत्येक जिल्हयामध्ये कृषी उत्पन्न बाजार संघ निर्माण केले आहेत. त्याप्रमाणे या लोकांसाठी आपण काय व्यवस्था करणार आहात? आज कोकणातील आंबा निर्यात होतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

तो मोठया प्रमाणात जगाच्या बाजारपेठेमध्ये गेला पाहिजे असे आपण म्हणतो तिथेच ग्यानबाची मेख आहे. जोपर्यंत उत्पादकाला त्याचा लाभ मिळत नाही तोपर्यंत या व्यवसायाची किंमत शून्य आहे. आज जळगावमध्ये जैन ठिबक सिंचनवाल्यांनी हजारो एकरामध्ये ग्रीन हाऊस सुरु केले आहेत. त्यांच्याकडे जैविक तंत्रज्ञान आहे. त्याठिकाणी ते केळीची बिजे तयार करतात. पुणे जिल्हयामध्ये सुध्दा गुलाबाच्या फुलांची प्रचंड शेती असलेले शेतकरी आहेत. त्यांच्या 50 ते 100 एकरातील ग्रीन हाऊस मी पाहिले आहे. त्यांच्या शेतातील तयार झालेली गुलाबाची फूले आज परदेशात निर्यात केली जातात. त्यांची शेती पाहिल्यानंतर मला अभिमान वाटला. परंतु या विधेयकाचा लाभ त्यांना मिळणार आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु..

फुलांच्या □□□ हाऊसमध्ये 700-800 मजूर □म □रतात, त्यां□ □हीच संर□□□ □ही. म्ह□□□ त्यांच्याबाबतीत □ठेतरी तरतूद अस□याची □रज आहे. □र□□ अधि□□म हा टो□चा असावा, अशातला भा□□ही. त्या ठि□□□ □म □र□ऱ्या लो□□□ □मीत□मी रोज□□र मिळाला पाहिजे,हा यामागचा उद्देश आहे. परंतु ते लो□ या □यद्या□ाली येत □ाहीत. रोज□□र हमी योज□□ी व्या□या ठरविलेली आहे, त्याप्रमा□ त्यां□ रोज□□र मिळ□□र आहे □य ? हे पहा□याची आवश्य□ता आहे. परंतु तेथील माल□□□ वाटते □, आमचा वे□ळा उद्यो□ आहे, आम्हाला □शाचे बंध□□ □ही. परंतु प्रि□या उद्यो□मध्ये □म □र□ऱ्या मा□साला मि□□म वेजेस तुम्ही दे□□र आहात □ □ही ? ते □र□□□ □□मा□च्या बाहेर आहेत, असे म्हटले तर ते सुटले. परंतु या ग्रीन हाऊसमधील फुले ही एक्स्पोर्ट केली जातात. सुदैवा□ स□□□□य मंत्री श्री.□□श □ाई□ साहेब हे □म□□र □□ामध्ये □म □र□रे □म□□र यु□□□ चे लिडर आहेत. स□□□□य सदस्य श्री.श्री□त जोशी यां□ म्हटल्याप्रमा□ □□□त्या तरी डेक्स ऑफीसर□ डू□ ड्राफ्ट ब□□विता□ ही तरतूद राहू□ □ली असेल परंतु ही चू□ ल□□त आल्या□□र आता मंत्री महोदयां□ ती सुधारावी. आ□□ ए□ माझी सूच□ आहे □, महाराष्ट्राचा भौ□□लि□, सामाजि□, आर्थि□दृष्ट्या समतोल रा□□ □रजेचे आहे. □□□मध्ये अधि□ पाऊस पडतो, तेथील उष□तामा□, आर्द्रता हे पाहू□ तेथील लो□□□ पि□चे उत्पाद□ घ्यावे. Sir, within the Green House, he can create the climatic conditions and he can take any crop. परंतु स□□□यां□ □□□ हाऊस □ने पाहिजेत असे □ाही. परंतु लो□□□ □□□ते उत्पाद□ घ्यावे,हे त्यां□ समजले तर ते सध□ होतील. मराठवाड्यामध्ये □मी पाऊस पडतो, त्यामुळे पि□चे □मी उत्पाद□ होते, त्या ठि□□□ □□□त्या प्र□रचे उत्पाद□ घ्यावे, हे □ळले तर तेथील लो□□□ सध□ □रता येईल. तेव्हा शास□□□ याबाबतीत ल□ घालावे. आज आप□ फुलां□ रॉ मटेरियल म्हणून सवलत दिलेली आहे. त्यापासू□ सु□□ी द्रव्ये तयार □ली जातात, यामध्ये □म □र□रे मजूर □र□□□ ॲक्टच्या बाहेर आहेत. जेव्हा आप□ प्रि□या उद्यो□ म्ह□□तो, त्यामध्ये ला□□डीपुरते मर्यादित आहे, हे समजू श□तो. प्रि□या उद्यो□ म्हटल्याबरोबर फार्मस्युटीकल इंडस्ट्रीज येतात, त्या आज बाहेर आहेत स□□□□य सदस्य डॉ.दीप□ सावंत या□ हर्बल प्रॉर्डक्टचा उल्ले□ □ला. शहा यांचे हर्बल प्रोडक्टस् हे महा□ वि□ले जाते. माझी सूच□ अशी आहे □, सर्वसामा□य शेत□री, शेतमजूर जे □ही प्रि□या उद्यो□मध्ये □म □रतात, त्यां□ □ठे तरी संर□□□ द्यावे, यासाठी तरतूद □र□ आवश्य□ आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरु...

तशी अमेंडमेंट आ□□ दुरुती □रावी. दुसरी □ष्ट अशी □, भौ□लि□ परिस्थितीचा विचार □रु□ रीज□ वाईज उत्पाद□ घे□याच्यादृष्टी□ शास□□ प्रयत□ □रावा, तसे लो□□ सां□वे. विदर्भामध्ये □पूस पि□विला जातो, म्ह□□ □□□मध्ये □पूस घेऊ□ चाल□र □ही. विदर्भामध्ये-मराठवाडयामध्ये सोयाबी□चे पी□ घेतले जाते म्हणून म्ह□□ आम्हीही □□□मध्ये ते पी□ घेऊन चालणार नही, महाराष्ट्रात ऊसाचे पी□ घेतले जाते म्ह□□ विदर्भामध्ये ते घ्यावे असे □रु□ चालणार □ही. त्या ठि□□□ ऊसाचे पी□ घेता यईल, परंतु त्याचा उतारा □मी आला, पुढे ऊसाचे पी□ □मी आले तर पैसे □मी मिळतील, असे हे स□ळे स□ल आहे.

सभापती महोदय, मी थोडा विषयाला सोडू□ बोल□र आहे. □र□ मंत्री महोदय □र□□याशी संबंधित आहेत. आज महाराष्ट्रामध्ये □ती तरी उद्यो□ बंद आहेत. या उद्यो□मधील उत्पाद□ दे□ील एक्स्पोर्ट होत होते. मी औरं□बादला सार्वजनि□ उप□म समितीच्या बैठ□□रिता □मो होतो. ए□ □र□□यामध्ये 4 हजार □म□र □म □रत होते. त्या □र□□याच्या माल□ला विचारले □, हे □म□र परम□ट आहेत □य ? त्यावर त्यां□ सां□मले □, They are on daily wages but they are permanent employees. माझा यासंबंधी त्यांच्याशी वाद झाला. You are exploiting them.ते स□ळे एम.आर.टी.पी.मध्ये मोडतात. ए□ बाजूला आप□ उद्यो□ यावेत, लो□□ रोज□र मिळावा असा विचार □रतो. परंतु उद्यो□ आल्या□र त्यांची दादा□री चालते. आम्ही रोज□र देतो, म्ह□जे उप□र □रतो असे ते दा□वितात..

या□र श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

आम्ही तुम्हाला रोजगार देऊन उपकार करीत आहोत असे दाखवून सर्व कायद्यांचे उल्लंघन करावयाचे अशी परिस्थिती आहे. डेलिवेजेस परंतु परमनंट अशी जी व्याख्या आहे ती मला कळली नाही. म्हणून मी मुद्दाम बिलाच्या कक्षेबाहेर जाऊन हा विषय मांडला. त्याचा आपण विचार करावा अशी विनंती करतो. मी या बिलाचे स्वागत करतो. या बिलाचा उद्देश चांगला आहे परंतु त्यामध्ये थोडी सुधारणा करुन तशी सुधारणा लवकरात लवकर आणावी अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2005 चे वि. प. वि. क्रमांक 1 या विधेयकावर सदनामध्ये चर्चा चालू आहे. या बिलाच्या मराठी प्रतीमध्ये "कारखाने अधिनियम, 1948, महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक" असा उल्लेख केला आहे आणि इंग्रजी प्रतीमध्ये "further to amend the Factories Act. 1948, in its application to the State of Maharashtra." असा उल्लेख केला आहे. यासंदर्भात आम्ही प्रत्येक वेळी सांगत असतो. काल माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर बोलत असताना मी एक मुद्दा मांडला. माननीय राज्यपालांचे भाषण इंग्रजीमध्ये झाले. ती प्रत माझ्याकडे नव्हती. त्या भाषणाची मराठी प्रत आमच्याकडे आली. इंग्रजी आणि मराठीमध्ये कसा फरक होतो याचे ज्वलंत उदाहरण आपल्यासमोर आहे. आपण फॅक्टरी ॲक्टमध्ये सुधारणा करीत आहात की, बदल करीत आहात ? सुधारणा म्हणजे जे अस्तित्वात आहे त्यापेक्षा आणखी काही तरी चांगले करतो आणि बदल करणे म्हणजे जे अस्तित्वात आहे त्यातील काही तरी काढून टाकतो. या दोन बाबींमध्ये हा फरक आहे. हा माननीय मंत्रिमहोदयांचा दोष नाही. हा विधेयक तयार करणाऱ्यांचा दोष आहे. यामध्ये आपण सुधारणा करीत नाही तर आहे त्या परिस्थितीमध्ये बदल करीत आहात. हा बदल कोणाला पोषक आहे आणि कोणाला मारक आहे हे बघणे मनोरंजक ठरेल. आमचे सन्माननीय कामगार मंत्री हे कामगार पुढारी सुध्दा आहेत. ते ट्रेड युनियन चळवळ चालवितात. त्यांच्या जीवनात सुध्दा असा योग आला की, मागच्यावेळी टेम्पररी कामगारांच्या संदर्भात त्यांनाच विधेयक आणावे लागले. कामगार क्षेत्रात कामगारांसमोर जात असताना मी असे विधेयक आणले आणि ते पास केले असे ते सांगू शकत नाहीत. कारण ते विधेयक कामगारविरोधी आहे. आज जे विधेयक चर्चेला आले आहे ते शेतकऱ्यांच्या फायद्याचे आहे असे म्हटले जाते. किती शेतकऱ्यांकडे किती जमीन आहे, किती शेतकरी या विधेयकाचा फायदा घेणार आहेत हे मला माहीत नाही. मी पुणे जिल्ह्यामध्ये काही प्रोजेक्ट्स पाहिलेले आहेत. त्या ठिकाणी तंबूमध्ये शेती होते. त्याचा उल्लेख यामध्ये आहे. त्या ठिकाणी जी प्रक्रिया चालते ती करण्यासाठी मजूर लागतात. हे विधेयक ज्या पध्दतीने आणले आहे ते पाहता सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे ॲप्लिकेबिलिटी ऑफ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुधकर सरपोतदार ....

मिनिमम वेजेस हे आपण त्यातून काढून टाकले आहे. त्या ठिकाणी कारखान्याचा कायदा लागू नाही म्हणजे किमान वेतन कायदा सुध्दा त्या कामगारांना लागू नाही. म्हणजेच मालक देईल तो पगार त्यांनी घ्यावयाचा व काम करावयाचे नाही तर बाहेर जावयाचे अशी परिस्थिती आहे. अशा प्रवृत्तीला जास्त प्रोत्साहन देणारे हे विधेयक आहे असे माझे मत बनले आहे. हे विधेयक वाचल्यानंतर प्रथमदर्शनी या विधेयकासंबंधी माझे मत चांगले बनलेले नाही. हे विधेयक धनिकांच्या सोयीचे आहे. हे विधेयक सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या सोयीचे नाही. सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे हे आता सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. त्यांनी या बिलाचे कौतुक केले. मला त्यांना सांगावयाचे आहे की, एखाद्या विधेयकाचे जरुर स्वागत करावे. काही तरी नवीन करतो त्याचा आनंद आपल्याला होतो आणि म्हणून त्याचे स्वागत करावयास पाहिजे. या विधेयकाचे स्वागत मी या दृष्टीकोनातून करतो की, धनिकांची सोय होणारे आणि गरीब कामगारांची गैरसोय होणारे हे विधेयक आहे. यामध्ये ज्या आस्थापना वगळण्याचे नमूद केले आहे त्या ठिकाणी काम करणाऱ्या सगळ्या कर्मचाऱ्यांना वेतन कशा पध्दतीने दिले जाणार आहे ? जे शेतकरी आहेत त्यामध्ये छोटे शेतकरी असले तरी त्या ठिकाणी काम करणारे जे कर्मचारी आहेत, जे कामगार आहेत त्यांना वेतन कशा पध्दतीने दिले जाणार आहे ? याबाबतीत काही बंधन आहे काय ? याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती दिली तर बरे होईल.

यानंतर श्री. शिगम ...,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार पुढे सुरु...)

हे नवनवीन प्रयोग आपल्या राज्यात होणार आहेत. कारण आपण सगळया गोष्टींचे जागतिकीकरण, खाजगीकरण केलेले आहे. जोपर्यन्त समाजवाद होता तोपर्यन्त आपण कायद्याच्या बंधनात बांधले गेलो होतो. आता आपण समाजवादापासून दूर जात खाजगीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरु केलेली आहे. खाजगीकरणाचा अर्थ असा आहे की, त्याबाबतीत कोणत्याही कायद्याचे बंधन नाही. काय द्याल एवढेच विचारायचे. किती द्याल हे विचारायचे नाही. ते विचारले की बाहेरचा रस्ता. अशी परिस्थिती आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये निर्माण होणार आहे. मी रिलायन्स कंपनीतील एक किस्सा सांगतो. रिलायन्स कंपनीमध्ये जे कर्मचारी कामावर ठेवले जातात त्यांना एक्झीक्युटीव्ह असे म्हणतात. ते एक्झीक्युटीव्ह असले तरी त्यांच्याकडून काहीही काम करुन घेतले जाते. या कर्मचा-यांना लेबर लॉ ॲप्लिकेबल होऊ नये म्हणून त्यांना एक्झीक्युटीव्ह असे गोंडस नाव दिलेले आहे. त्या एक्झ ीक्युटीव्हला कधीही मेमो दिला जातो आणि कधीही गेट आऊट म्हणून सांगितले जाते. कधीही काहीही करायला हे मालक मोकळे होतात. याचा परिणाम असा होणार आहे की, आज ना उद्या कामगार आणि कर्मचारी वर्गामध्ये असंतोष निर्माण होईल. या विधेयकामध्ये ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्यासंदर्भात एक गाईड लाईन्स देण्याची आवश्यकता होती. कायदा हा एकतर्फी असू नये. तो सर्वसमावेशक असला पाहिजे. कायद्यामधील जुन्या तरतुदी काढून नवीन तरतुदींचा समावेश करीत असताना त्यामुळे कोणाचे अहित होणार नाही हे देखील पाहाण्याची आवश्यकता आहे. अन्यथा काही काळानंतर कामगार वर्गामध्ये उद्रेक निर्माण होईल आणि तो थांबविता येणार नाही. तो उद्रेक थांबविण्यासाठी मग पोलिसांच्या बंदुका आणि गोळयांचा वापर करावा लागेल. शेतक-यांनी जरी पाण्याची मागणी केली तरी त्याला गोळी मारली जाते. यामुळे एक दिवस भीती निर्माण होते पण दुस-या दिवसापासून तो प्रश्न गंभीर होत जातो, अशा प्रकारचे चित्र आज महाराष्ट्रामध्ये उभे राहात आहे. या राज्यामध्ये सगळे उद्योग यावेत यादृष्टीने हे विधेयक महत्वाचे आहे. फुला-फळांच्या व्यापरामध्ये गेल्याशिवाय आपली प्रगती होणार नाही. या विधेयकाच्या उद्देश व कारणे यांच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "पुष्पसंवर्धन व फळबागायत आणि उच्च मूल्यांकित पिकांची लागवड हे उपक्रम करणारी हरितगृहे व पॉली हाऊसेस, कारखाने अधिनियम, 1948च्या कक्षेतून वगळण्याचे ठरविले आहे." प्रश्न असा आहे की, हरितगृहाद्वारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार पुढे सुरु...)

शेतकरी, त्याची पत्नी आणि दोन मुले शेती करु शकत नाहीत. त्याला मजूर घ्यावे लागतात. मग त्या मजुराला किती मोबदला देणार, असा प्रश्न निर्माण होतो. या प्रश्नाचे उत्तर आपण कोणत्या कायद्यान्वये देणार ? या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे.आपल्या राज्यामध्ये किमान वेतन कायदा आहे. एखाद्या मजुराला किमान वेतन मिळत नसेल तर कोर्टामध्ये जाऊन किमान वेतन मिळाले पाहिजे अशी मागणी आपण कामगार संघटनेचे प्रतिनिधी असल्यामुळे करु शकतो. कामगारांच्या हक्कांचे रक्षण करणे हे कामगार संघटनेच्या प्रतिनिधीचे काम आहे. एखाद्या कामगाराला लेबर ऑफिसर किंवा लेबर कमिशनरकडून न्याय मिळाला नाही तर कोर्टामध्ये जाऊन त्याला न्याय मिळवून देता येतो. न्याय मिळविण्याच्या बाबतीत वेगवेगळया स्टेजेस आहेत. त्याद्वारे न्याय मिळविता येतो. परंतु या विधेयकामध्ये जी सुधारणा करण्यात येत आहे त्याबाबतीत काय पर्याय आहे ?

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ....

समजा या मालकांनी ग्रीन हाऊस काढले किंवा शीतगृह निर्माण केले तर त्यामध्ये सुमारे 100 कामगार काम करीत असतील तर त्यांना वेतन कसे ठरविले जाणार ? त्यांना किमान वेतन कायदा लागू होणार काय ? कोणत्या आधारावर किमान वेतन कायदा लागू होणार हे पाहिले पाहिजे. भविष्याच्या दृष्टीने उद्योगधंदा आहे एवढयापुरताच मर्यादित हा विषय नाही. यामध्ये व्यापकपणा ठेवण्याची गरज आहे. भविष्यातील गरज लक्षात घेऊन चालले पाहिजे. 10-15 वर्षानंतर या उद्योगाची काय परिस्थिती होणार आहे हे पाहिले पाहिजे. उद्योग जोरात चालेल त्यामुळे कामगारांच्या अपेक्षा वाढतील. त्याला जर 5 रु. मिळत असतील तर तो 100 रु. कसे मिळणार याचा विचार करील. मालकाला 500 रु. मिळत असतील तर तो त्याचे 5000 रु. कसे होतील याचा विचार करील. रोजंदारीवर जो काम करीत आहे त्याला 100 रु. रोज कसा मिळेल याचा तो विचार करील. या सर्वांचा विचार करुन या विषयाकडे पाहिले पाहिजे. हे बिल मांडताना त्याच्या उद्देश आणि कारणांमध्ये असे म्हटले आहे की, राज्यात पुष्पसंवर्धन आणि फळबागायत यांना चालना देण्याच्या तसेच कृषिविषयक उपक्रमांना चालना देऊन कृषि उत्पादनांच्या निर्यातीस वाव देण्याच्या हेतूने आणि त्यायोगे अधिकाधिक नापीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी आणि भारतीय अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ असलेल्या कृषि अर्थव्यवस्थेस उत्तेजन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पुष्पसंवर्धन प फळबागायत आणि उच्च मूल्यांकित पिकांची लागवड हे उपक्रम करणारी हरितगृहे व पॉली हाऊसेस कारखाने अधिनियम 1948 च्या कक्षेतून वगळयाचे ठरविले आहे. या सगळया उपक्रमांना मनुष्यबळ लागतेच. शेतकरी कुटुंबाच्या आधारावर हे करु शकत नाही. त्या मनुष्यबळाबाबत काय विचार केला आहे हे महत्वाचे आहे. फॅक्टरी ॲक्ट 1948 साली लागू झाला तो आजतागायत चालू आहे. भविष्यकाळातही चालू राहणार आहे. आपण आपल्या गरजेप्रमाणे त्यामध्ये परिवर्तन करतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना तयार केली. त्यानंतर त्यामध्ये 83-84 अमेंडमेंड आल्या. ज्यावेळी त्यांनी घटना तयार केली त्यामध्ये आता परिवर्तन करताना काय परिणाम होतील हे तपासावे लागते. महिला विषयक विधेयक 13 सप्टेंबर, 1996 मध्ये लोकसभेमध्ये आले होते. मी त्यावेळी या विधेयकाला विरोध केला होता आणि विरोध करण्याची कारणे दिली होती. आजही ते बिल चर्चेत आहे आणि ते पास झालेले नाही. त्यादृष्टीने शासनाला विनंती करावयाची आहे की, आपण जे सांगितले ते सगळे ठीक आहे. प्रश्न एकच आहे की, याची

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

व्याप्ती वाढवावी. फळबागा वाढतील,व्यवसाय वाढेल,निर्यातीमध्ये प्रगती होईल. देशाची आर्थिक प्रगती होईल. देश प्रबळ होईल. देश आर्थिकदृष्टया प्रबळ होत असताना तो प्रबळ करण्यासाठी जे हात लागतील त्या हातांची काळजी कशी करावयाची हा प्रश्न आहे. त्यावर विचार करावा. आपण जे करीत आहात ते करीत असताना भविष्यकाळाचा विचार करुन पुढील 50 वर्षामध्ये त्यात बदल करावा लागणार नाही अशी काळजी घ्यावी. प्रत्येक कलमामध्ये लक्ष देऊन सुधारणा करणे आवश्यक आहे. बदल करताना त्याचे परिणाम काय होतील याचा विचार करावा. आज आपण कामगार मंत्री आहात. भविष्यकाळात आपल्याला परत कामगारांबरोबर यावे लागेल. आपण प्रगती करावी अशी आमची इच्छा आहे. परंतु आपण जे पद भूषवीत आहात त्यातून समाजाची प्रगती कशी होईल आणि कामगार वर्गाचे भले कसे होईल याचा विचार करावा. धनिकांकडे अनेक पर्याय आहेत. त्यांच्याकडे कोटयवधी रुपयांची मालमत्ता आहे. त्या आधारावर ते शीतगृहे,ग्रीन हाऊसेस निर्माण करु शकतात. कारखाने उभे करु शकतात काहीही करु शकतात. पण हा जो "पण किंवा परंतु" आहे हेच अतिशय महत्वाचे असते, तेच विचारात घ्यावे असे मला वाटते. का कायदा मंजूर करण्यापूर्वी यासंबंधीचा खुलासा करावा आणि त्या ठिकाणी काम करणाऱ्या हातांना संरक्षण देण्यासाठी काय पर्याय निर्माण करणार आहात यासंबंधीची देखील माहिती द्यावी, अशी सूचना करुन माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / शिघ्रलेखाची नाही

पृ.शी.: "नवी मुंबईत झालेल्या दंगलीमुळे दहावीच्या परीक्षांवर झालेला परिणाम"

मु.शी.: "नवी मुंबईत झालेल्या दंगलीमुळे दहावीच्या परीक्षांवर झालेला परिणाम" यासंदर्भात माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन.

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : महोदय, आपण निदेश दिल्याप्रमाणे मी पुढीलप्रमाणे निवेदन करीत आहे.

"कालच्या दंगलीमुळे दहावीच्या परीक्षांवर कुठलाही परिणाम झालेला नाही. कालचा पेपर संपलेला आहे, आणि दोन पेपर अद्याप बाकी आहे. आज आणि उद्या पेपरला सुट्टी आहे. यानंतर 21 व 22 मार्च रोजी शेवटचे दोन पेपर्स शिल्लक राहिले आहेत. त्यासाठी स्पेशल पोलीस फोर्स मागवून परीक्षा केंद्रांना संरक्षण देण्यात येईल."

डॉ. नीलम गो-हे : महोदय, वेगवेगळया वाहिन्यांवर ज्या बातम्या दिल्या जातात त्यासंदर्भात विचार करुन शासनाने तशी व्यवस्था करावी, अशी आमची सूचना आहे.

प्रा. वसंत पुरके : यासंबंधीची माहिती घेऊन तशी व्यवस्था करण्यात येईल.

यानंतर श्रीमती फौजिया खान यांचे भाषण

श्री. शर्मा यांचेकडे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कारखाना (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. I OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE FACTORIES ACT,1948, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

चर्चा पुढे सुरु .....

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, विधान परिषद विधेयक क्रमांक 1 - कारखाने (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2006 का स्वागत करते हुए मैं यह कहना चाहती हूँ कि इस विधेयक के ऑब्जेक्ट्स एंड रीजन्स में कहा गया है " In order to promote floriculture and pomology in the State and also to give boost to export of agricultural products, by promoting activities and thereby bringing more barren land under cultivation and giving fillip to agrarian economy,..." अगर इसका हेतु इस प्रकार का है तो यहां पर जो लिस्ट दी गई है, वह अधूरी है, ऐसा मुझे लगता है. इस लिस्ट में रीजनल कन्सीडरेशन का विचार करते हुए और भी एग्रीकल्चरल क्रॉप्स इसमें शामिल करने की जरुरत है. मैं आपको बताना चाहती हूँ कि इसमें सेरीकल्चर नहीं लिया गया है, जबकि हमारे राज्य में सिल्क इन्डस्ट्री एक बड़ी और महत्वपूर्ण इन्डस्ट्री है. कर्मचारियों, कामगारों और स्मॉल फारमर्स के अधिकारों का संरक्षण करने की बात इस विधेयक में शामिल होनी चाहिए. इतना कहते हुए मैं अपनी बात खत्म करती हूँ.

. . . . .

. . . भाषण पूर्ण.

....ZZ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभा सदस्याद्वारा निर्वाचित) : महोदय, विधानपरिषद विधेयक क्र.1- महाराष्ट्र कारखाने सुधारणा विधेयकावर बोलत असतांना सातत्याने आम्हाला असे वाटत असते की, या विधेयकाचा हेतू जरी चांगला असला तरी त्याचे परिणाम काय होणार आहेत याचाही विचार करणे आवश्यक आहे. कारण जे जे कामगार या उद्योगांशी संबंधित आहेत, अशा संबंधित कायदयामध्ये बदल करण्यासंबंधी शासन या ठिकाणी सांगत आहे त्यामुळे असंघटित क्षेत्रात काम करणारे मजूर आणि कामगार आहेत त्यांना संरक्षण देणार अशा घोषणा केल्याचे आम्हाला पेपरमधून समजते. पुणे, नाशिक विशेष करुन पश्चिम महाराष्ट्रारामध्ये फुलांची निर्यात होण्यासाठी माझ्या माहितीप्रमाणे खास विमान सेवेला सुध्दा प्राधान्य देण्यात आले आहे. माझा आक्षेप असा आहे की, यामुळे नर्सरीमध्ये काम करणाऱ्या मजुरांच्या ज्या संघटना आहेत त्या संघटनांपैकी विविध संघटना हया विरोधी पक्षाशी संबंधित अशा संघटना देखील आहेत. यापैकी ज्या संघटनांची भूमिका शासनाच्या समर्थनाची आहे त्यातील संघटना आपण विचारात घेतल्या नसाव्यात असे मला वाटते आणि खरा प्रश्न याच ठिकाणी आहे. विधिमंडळामध्ये विधेयक मांडत असतांना आपण लोकशाहीमध्ये किमान जी पायाभूत पावले उचलण्याच्या संदर्भात विचार करतो, चर्चा करतो, ज्या गोष्टी ग्रामसभा आणि ग्रामपंचायतीमध्ये प्रकर्षाने झाल्या पाहिजेत असे आपण म्हणतो, त्यांना ते बंधनकारक मानतो परंतु विधिमंडळात विधेयक आणत असतांना सत्ताधारी पक्षाबरोबर तर केलीच पाहिजे परंतु विरोधी पक्षाच्या संघटनांशीही चर्चा केली पाहिजे. नाही तर एकीकडे माथाडी कामगार मंडळ बंद करणार वगैरे आपण विचार करतो. त्याच वेळी आज नर्सरीमध्ये जास्तीत जास्त काम करणाऱ्या महिलाच आहेत, त्यासंदर्भातही विचार करणे आवश्यक आहे. या विधेयकाच्या माध्यमातून एकीकडे मध्यम शेतकऱ्यांच्या संस्था यामुळे सुधारणार परंतु छोटे शेतकरी अधिक फाटके होतील याकडे दुर्लक्ष करुनही चालणार नाही तसेच अल्पकालीन मजूर असणारे स्थलांतर करीत आहेत त्यांच्या संदर्भात शासन विचार करणार की नाही ? नाही तर हिंजवडी सारख्या ठिकाणी जो प्रकार झाला त्याचे कारण मुळात असेच की, या लोकांना दुसरा कुठलाही आसरा नाही. प्रश्न असा आहे की, या नर्सरीत काम करणाऱ्या महिला कामगारांना कारखान्याचे नियम लागू नाहीत, त्यामुळे प्रसूतीची रजा व इतर बेनिफिट्स जे आहेत, पाळणा घरासारख्या सोयी वगैरे नाहीत आणि दुसरीकडे कारखान्यातून त्यांची कुतरओढ होत आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

माझ्या महितीप्रमाणे गेले पाच सहा वर्षे नर्सरीमध्ये काम करण्यासाठी मोठया प्रमाणावर महिला बचत गटांना प्रमोट करण्यात येत आहे. तेथील मजुरांना, श्रमिकांना संरक्षण देण्यासाठी शासन काहीही विचार करीत नाही. त्यामुळे अशा मजुरांना, श्रमिकांना संरक्षण देण्यासाठी आपण विधेयक का आणत नाही ? माझे तर असे म्हणणे आहे की, मजुरांना किंवा श्रमिकांना संरक्षण देणारे विधेयक आणले तर त्याचा उपयोग श्रमिक/मजुरांना नक्की होईल. कारण आजकाल मजूर सुध्दा खूप हुशार होत आहेत. या सुधारणेमुळे भविष्यात फूल शेतीला मजूर मिळाले नाहीत आणि ते सर्व सिव्हील कन्स्ट्रक्शनच्या कामावर गेलेत तर त्याचे मला आश्चर्य वाटणार नाही. याचे कारण असे की, मजुरांनी स्वत:च्या संरक्षणाच्या पध्दती ठरविलेल्या आहेत. फुलासारख्या गोष्टींतून नुकसान होऊ शकते. कदाचित संघर्ष देखील वाढू शकतो. आज स्थानिक संघर्ष वाढतो आहे. आपल्या डोळयासमोर पुणे जिल्हयातील घटना ही अत्यंत ताजी आहे. पुणे जिल्हयात फूल शेती करणाऱ्यांमध्ये सुध्दा श्रमिक आहेत. आपण महात्मा फुल्यांचे नाव घेऊन त्यांना अभिवादन करतो. पण त्याच पुण्यात हडपसर पासून नारायणगांव पर्यंत माळी समाज मोठया प्रमाणावर आहे. त्यांचा फुल शेतीशी संबंध असल्याने त्यांना या विधेयकाच्या माध्यमातून शासन सूट देऊ पहात आहे. परंतु, या माळी समाजातील जे गरीब मजूर आहेत त्यांना मात्र शासन या सुधारणेमुळे वाऱ्यावर सोडून देणार आहे. बहुमताच्या जोरावर रणगाडे चालवून शासन प्रत्येक वेळेला विधेयक मंजूर करून घेत असते. परंतु लोकांचे तळतळाट शासनाच्या कानावर पोहोचत नाहीत. श्रमिक, मजुरांना कसल्याही प्रकारचे संरक्षण शासन आज कायद्यान्वये देऊ पाहत नाही. माननीय मंत्री महोदय ज्या ज्या वेळी विधिमंडळात एखादी गोष्ट मांडतात त्या त्यावेळी ते प्रेरणादायी भाषण करुन सांगतात की मी अमुक एक गोष्ट करुन दाखवीन. म्हणूनच श्रमिकांना, मजुरांना, कामगारांना संरक्षण देणारे दुसरे विधेयक सभागृहापुढे आणण्याचे आश्वासन मंत्रिमहोदयांनी द्यावे, एवढेच मी या निमित्ताने सुचवू इच्छिते. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

.....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, शेतकऱ्यांना सबळ करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या विधेयकाच्या माध्यमातून कोणाला फायदा मिळणार आहे ? असा प्रश्न बहुतांशी सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी या विधेयकाचे स्वागत केले आहे. आज राज्यात 1602 छोटी ग्रीन हाऊसेस आणि 14 मोठे ग्रीन हाऊसेस आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जैविक तंत्रज्ञानाविषयीचा, कॉस्मेटीक-हर्बल संबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. हर्बल आणि कॉस्मेटीक हे छोटया शेतकऱ्यांचे काम नाही असे त्यांचे म्हणणे आहे. याकरिता रिलायन्स इंडस्ट्रीने धिरूभाई अंबानी यांच्या नावाने लॅब उघडली आहे. हायब्रीड हा जैविक तंत्रज्ञानाचा भाग आहे. स्वीट कॉर्न आणि तैवान पपई यांच्या बियांपासून पुन्हा निर्मिती करता येत नाही. म्हणून जैविक तंत्रज्ञानामध्ये अभ्यास करण्यासाठी स्वत:ची संस्था स्थापन करण्यासंबंधी विचार केला पाहिजे किंवा नवीन तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचा विचार सुरू आहे. आज हर्बलला जागतिक मागणी आहे. निसर्गाची साधर्म्य राखणारे, पर्यावरणाशी जवळीक साधणारे म्हणून हर्बलकडे पाहिले जाते. अळंबीच्या उत्पादनासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ.सावंत यांनी आपली भूमिका मांडली आहे. हे जे विधेयक आहे ते ग्रीन हाऊसेस आणि पॉली हाऊसेस पुरता मर्यादित आहे. तरी सुध्दा येथे शेतीसंबंधीच्या इतर विषयांवर जे विचार मांडले आहेत, त्याचा देखील शासन निश्चितपणे विचार करील. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी फळ, फुले यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांसंबंधी मुद्दा उपस्थित केला होता. तेथे बॉयलरचा वापर होत असेल तर त्यासाठी स्वतंत्र बॉयलर ॲक्ट आहे. त्यामुळे संबंधित उद्योगाला रितसर परवानगी घ्यावी लागते व त्यासाठी नियम देखील पाळावे लागतात.

यानंतर श्री.बोर्डे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.गणेश नाईक....

किमान वेतन ही बाब वेगळी आहे. ग्रीन हाऊसच्या संदर्भातील हा कायदा पास झाला तर वेतन आणि आरोग्याच्या अनुषंगाने ज्या स्टँडींग ऑर्डर्स असतील, बंधने असतील, इंश्युरंस असेल त्यांची या बाबीतून सुटका होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांच्या भूमिकेशी मी सहमत आहे. ते ॲमस्टरडॅमला गेले असताना त्यांनी 50 एकरांचा फुलांचा व्यापार होतांना तेथे पाहिला. आज जगाच्या पाठीवर स्पर्धा सुरु झालेली आहे. दुर्दैवाने सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांच्या मताशी मी सहमत आहे. त्यांनी आपली भूमिका विशद केली. या स्पर्धांमुळे कायदे कोलमडून पडतील की काय अशी भिती आज वाटत आहे. बायोटेक आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या क्षेत्रामध्ये एखाद्याला नोकरी उपयुक्त वाटली तर तो नोकरी करतो नाही तर दुसरीकडे जातो. अमेरिका-युरोप या देशांमध्ये बायोटेक आणि इन्फोटेक तंत्रज्ञान अवगत नसेल तर त्या ठिकाणी सेवा खंडित केली जाते. स्पर्धा असताना गुणवत्ता असणे गरजेचे आहे. पॉली हाऊसकरिता, ठिबक सिंचनासाठी शासनाकडून अनुदान दिले जाते, त्यांना विजेमध्ये सवलत वा अन्य सोयीसुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. परंतु तरीही त्या व्यवसायामध्ये सशक्तता येत नाही, म्हणून हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. 1602 शेतकऱ्यांना या विधेयकाचा फायदा होणार आहे, त्यापैकी 14 मोठे शेतकरी आहेत. राज्य किंवा केंद्र सरकारने कॉन्ट्रॅक्ट ॲग्रीकल्चर मंजूर केले आहे. कमाल जमीन धारणा कायदयानुसार एखादी व्यक्ती, संस्था, कंपनी, प्रायव्हेट लिमिटेड कंपनी शेतकऱ्यांच्या सहमतीने, Sir, with the consent of the farmers in presence of the District Collector or the Agriculture Officers,त्या ठिकाणी शेतकऱ्यांची जागा, काही कालखंडाकरिता कराराने घेऊन शेती करु शकतो. या बाबी जगाच्या पाठीवर आज सिध्द झाल्या आहेत. ऑस्ट्रेलियामध्ये एका एका शेतकऱ्याकडे हजारो एकर जमीन आहे. कारण त्या ठिकाणी लोकसंख्या कमी आहे. मजुरांना काम मिळाले पाहिजे, वेतन मिळाले पाहिजे. मजुरांच्या शरीराची हानी होऊ नये म्हणून काम केले पाहिजे. त्यांच्यावर गुलामगिरी लादता कामा नये. Have a mango and eat a mango. राज्याची प्रगती व्हावयाची असेल तर सर्वांनी तन-मन-धनाने कामाला लागले पाहिजे. एका उद्योगपतीने मला विचारले होते की, आम्ही इन्कम टॅक्स भरतो, परंतु शेतकऱ्यावर मात्र कसल्याही प्रकारचा टॅक्स लावला जात नाही. मी त्याला विचारले की, आपण आयपीसीएल मधून ग्रॅन्युअल्स आणून, ते चार्ज केले आहे. त्याच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक....

एक किलोतून उत्पादन घेण्यासाठी किती वीज लागते, किती मॅनपॉवर लागते हे तुम्हाला माहीत असते. तसेच उत्पादित झालेला माल बाजारात विकल्यानंतर किती रक्कम प्राप्त होईल हेही तुम्हाला माहीत असते. परंतु शेतकऱ्यांना शेतीतून नेमके किती उत्पन्न येईल हे माहीत नसते. कारण पेरणी केल्यानंतर किंवा पिके वर आल्यानंतर गारपीट झाली, पूर आला, अवकाळी पाऊस पडला किंवा जोरात वादळ आले तर शेतकऱ्यांचे नैसर्गिक नुकसान होते. त्यामुळे तो कधीही अगोदर सांगू शकत नाही की, शेतीतून मला अमुक इतके उत्पन्न येईल. मी त्या उद्योगपतीला सांगितले की, जर तुमची इच्छा असेल तर शेतकऱ्यांना जेव्हा शेतीमध्ये फायदा होत असेल तेव्हा त्यांना सुध्दा इन्कम टॅक्स लावला जाईल. परंतु जर त्याला शेतीमध्ये नुकसान झाले तर अशा वेळी त्याचे नुकसान भरुन दयावे लागेल.

सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी सांगितले की, पूर्वीच्या काळात शेती अतिशय उत्तम मानली जायची. त्यावेळी "मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी" असे म्हटले जायचे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक ....

सभापती महोदय, अशा शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढविण्याकरिता आपले शासन व केंद्र शासन निश्चितपणे प्रयत्न करेल. तेथे बॉयलर ॲक्ट, किमान वेतन या गोष्टी लागणारच. त्याचप्रमाणे आरोग्याच्या अटी देखील लागणार. बेबी बॉयलर्सचीच नोंद करण्याची गरज आहे. त्याचे इन्स्पेक्शन व्हायला पाहिजे. ज्या ज्या गरजेच्या बाबी असतील, त्या केल्या जातील. किमान वेतन श्रेणी, मेडिकल लिव्हज् अशा सर्व गोष्टी लागू केल्या जातील. फक्त या ठिकाणी त्यांच्यावर बंधन राहणार नाही. सभापती महोदय, मी आपल्याला एक उदाहरण देऊ इच्छितो. इस्त्रायलमध्ये किबुस नावाचे गाव आहे. त्या ठिकाणी सर्वजण कामे करतात. कोणी शिक्षण देण्याचे काम करतो, तर कोणी ट्रॅक्टर चालविण्याचे काम करतो, तर कोणी इलेक्ट्रिकलचे काम करतो. त्यातून येणाऱ्या उत्पन्नातून ते जेवत-खात असतात आणि फायदा झाला तर वाटत असतात. आता साखर कारखान्यांचा देखील हाच कॉन्सेप्ट आहे. भविष्य काळामध्ये मालक वर्गाने देखील मजुरांना सहभागी करुन घ्यावे आणि त्यासाठी आपल्यासारख्या सर्व सन्माननीयांनी त्यांना प्रोत्साहित करावे, नवीन वातावरण निर्माण करावे. सभापती महोदय, या विधेयकामध्ये फक्त हीच उद्दिष्टे सिमित आहेत. कोणत्याही मजुरांचे शोषण होणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी विचारलेल्या संदर्भात मी त्यांना असे सांगू इच्छितो की, आता तरी हे फक्त ग्रीन हाऊससाठीच आहे. नंतर सर्व क्षेत्रांचा यामध्ये विचार करण्यात येईल. सभापती महोदय, या अतिशय छोट्या बदलामुळे शेतकऱ्यांमध्ये सशक्तता येणार आहे. प्रक्रियेच्या पुढील सर्व गोष्टी नियमाप्रमाणे ठरत जातील असे मी आपल्याला आश्वासन देतो. तरी, आपण सर्वांनी हे विधेयक संमत करावे, अशी मी आपणास विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 1 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 1 संमत झाले आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नवी मुंबई येथे झालेल्या दंगलीबाबतच्या निवेदनासंबंधी</u>

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्रीमहोदय नवी मुंबईमध्ये घडलेल्या प्रकरणासंबंधी निवेदन केव्हा करणार आहेत ?

तालिका सभापती : माननीय गृहमंत्रीमहोदय निरनिराळ्या बैठकींमध्ये आहेत, अशी मला आताच माहिती प्राप्त झालेली आहे. नवी मुंबईसंबंधी आज करावयाचे निवेदन सोमवारी, 20 तारखेला केले जाईल.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्धा-तास चर्चा

पृ.शी.: मुंबईत एस.आर.ए. योजनेअंतर्गत गाळे तयार न होणे, म्हाडाला नियमानुसार भाडे न मिळणे, तसचे संक्रमण शिबिराचा ताबा न सोडणे.

मु.शी.: मुंबईत एस.आर.ए. योजनेअंतर्गत गाळे तयार न होणे, म्हाडाला नियमानुसार भाडे न मिळणे तसचे संक्रमण शिबिराचा ताबा न सोडणे,

यासंबंधी श्री. मधुकर चवहाण, वि.प.स. यांनीउपस्थित केलेली

अर्धा-तास चर्चा.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

" मुंबईतील एस.आर.ए. योजनेअंतर्गत इमारत विकसित करणाऱ्या विकासकाला मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने बांधलेल्या संक्रमण शिबिरातील गाळे या योजनेअंतर्गत येणाऱ्या रहिवाशांना त्यांची इमारत विकसित होईपर्यंत तात्पुरत्या वास्तव्याकरिता भाडयाने देण्यात येतात. परंतु एस.आर.ए. योजनेचे विकासक योजना पूर्ण न करता वा योजना पूर्ण झाल्यानंतर सुध्दा संक्रमण शिबिराचा ताबा न सोडणे, संक्रमण शिबिराच्या गाळयाचे नियमानुसार भाडेही म्हाडाकडे जमा न करणे, त्यामुळे संक्रमण शिबिरांची कमतरता निर्माण होऊन नवीन पुनर्रचना करण्यात येणाऱ्या इमारतींमधील भाडेकरुंना संक्रमण शिबिरांमध्ये गाळे उपलब्ध होऊ शकत नाहीत. मुंबई बेटावरील काही जुन्या इमारतींचे भूखंड हे अरुंद असल्याने त्यांच्या पुनर्वसनासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र शासनाने उपलब्ध करुन देणे गरजेचे असतांना शासनाने याविषयी कोणतेही धोरण गेली सुमारे 6-7 वर्ष निश्चित न केल्याने हे अरुंद भूखंड पडून असणे, आता त्यावर अतिक्रमणे झालेली आहेत. मुंबईमध्ये शेकडो धोकादायक इमारती आहेत. या इमारती पडण्याचा धोका असल्याने या इमारतीतील रहिवाशांना तातडीने संक्रमण शिबिरात स्थलांतरीत करणे गरजेचे आहे. पुनर्रचित इमारतीमध्ये खोटया कागदपत्रांच्या आधारे सुमारे 500 गाळयांमध्ये घुसखोरी झाल्यामुळे संक्रमण शिबिरात खितपत पडलेल्या मास्टर लिस्ट मधील (बृहत्सूची मधील) रहिवाशांना पुनर्रचित इमारतीमध्ये गाळे उपलब्ध होऊ शकलेले नाहीत. यावर शासनाने दोषी कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कारवाई करुन कडक धोरण स्वीकारणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

सभापती महोदय, या अर्धातास चर्चेच्या अनुषंगाने मी चार पाच मुद्दे मांडणार आहे. त्या मुद्यांबाबत म्हाडाचे आणि सरकारचे कसे दुर्लक्ष झालेले आहे ते मी सांगणार आहे. माझी मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, शासनाच्या वतीने त्यांनी थातूर-मातूर उत्तर न देता त्यांच्या उत्तरामधून काहीतरी निष्पन्न व्हावयास पाहिजे. या मुंबईतील लोकांना त्यातून काहीतरी दिलासा मिळाला पाहिजे. सभापती महोदय, या मुंबई शहरामध्ये झोपडपट्टी पुनर्रचना ही योजना युतीच्या काळामध्ये माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेतून साकार झालेली आहे. या योजनेचा मूळ गाभा असा होता की, 2.5 एफएसआय देऊन तेथील लोकांचे पुनर्वसन करावयाचे. जो विकसितकार असेल त्यांनी तेथील लोकांचे पुनर्वसन करुन सेलेबल एफएसआय त्यांनी विकायचा आणि त्यातून या मुंबईमध्ये चांगली घरे निर्माण करावयाची अशी ही योजना होती, ती योजना आपले सरकारही आता चालवित आहे. या योजनेमधून काही चांगली घरे उपलब्ध करण्यात आलेली आहेत. या विकसितकारांना शिवशाही पुनर्वसन प्रकल्पातून कोटयावधी रुपये दिले गेले आहेत. त्यांनी प्रकल्प सुरु करावा म्हणून, त्यांचे स्वत:चे पैसे व शासनाचे पैसे शिवशाही प्रकल्पातर्फे देण्यात आले होते. त्या ठिकाणी झोपडपट्टी असेल तर त्या झोपडपट्टीतील लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी तेथे बहुमजली इमारत उभी राहील व ती इमारत उभी राहीपर्यंत तेथील लोकांना संक्रमण शिबिरामध्ये हलवावे. मुंबई इमारत दुरुस्ती मंडळाचे काही संक्रमण शिबिर त्यांना देण्यात यावीत, किंवा विकसितकारांनी स्वत: व्यवस्था करावी. अशी ही योजना होती. या योजनेखाली विकासकांनी कमीत कमी 18 महिने व जास्तीत जास्त 24 महिन्यांमध्ये हया सगळया योजना पूर्ण कराव्यात अशा तऱ्हेचा आग्रह होता. परंतु या 18 ते 24 महिन्यांमध्ये फक्त 5300 गाळे उपलब्ध करुन दिलेली आहेत. 5300 गाळयांपैकी फक्त 30 ते 35 विकासकांनी आपले गाळे तेथे परत दिलेली आहेत. अजूनही तेथे 2800 गाळयांचा विकास करावयाचा होता, परंतु त्यांचा विकास केलेला नाही, किंवा पुनर्वसनासाठी एकही इमारत बांधलेली नाही. किंवा तेथील सेलेबल एफएसआय सुध्दा बांधलेला नाही, त्या जागा तशाच ठेवलेल्या आहेत, या सगळया झोपडपट्टीतील माणसांना व इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळातील माणसांना आम्ही फुकट पोसत आहोत. 4 कोटी 20 लाख रुपये भाडे अजूनही दिलेले नाही. भाडे वसूल झालेले नाही ही अतिशय गंभीर अशी गोष्ट आहे.

.....3.....

श्री. मधुकर चव्हाण..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भाडे वसूल करावयास सांगितल्या नंतर सन्माननीय मंत्री महोदयांचे खाते असे सांगते की, आम्ही हे भाडे वसूल करु शकत नाही कारण आमच्याकडे भाडे वसूलकार नाहीत. एक तर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली विकसितकारांना कितीतरी कोटी रुपये दिलेले आहेत, तसेच त्यांचे व्याज 17 टक्क्यावरुन 10 टक्केवर आणले गेले आहेत. 138 भाडेकरुंनी खोटे चेक दिल्यामुळे त्यांच्यावर दिवाणी न्यायालयात खटले भरले आहेत. फौजदारी खटले भरलेले नाहीत. या योजनेमध्ये जी जागा दिलेली आहे तेथे तर विकासकांनी इमारती बांधल्या नाहीतच, आणि 2800 गाळे जे संक्रमण शिबिरातून झोपडपट्टी धारकांकडून खाली करुन घ्यावयाचे होते, त्यातील काही गाळे त्यांनी विकले व ते परत झोपडपट्टीत राहावयास गेले. आणि 4 ते 4.50 कोटी रुपये म्हाडाने त्यांच्याकडून वसूल केलेले नाहीत. " आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते " असा हा कारभार चाललेला आहे. महामंडळातील अधिकाऱ्यांना पैसे कसे मिळतील, भ्रष्टाचार कसा केला जाईल, उपाध्यक्षांच्या ऑडरमध्ये खाडोखोड करुन स्कॅन कसे केले जाईल यामध्येच हे अधिकारी मशगूल आहेत. गेली 4-5-6 वर्षामध्ये एक फाईल हललेली नाही. या गाळयांवर कोण अतिक्रमण करीत आहेत हेही पाहिले गेलेले नाही. आज तेथील गरीब लोकांना पुनर्वसित इमारतीत 225 फूटाची जागा सुध्दा दिलेली नाही. विकसितकारांना जे पैसे दिलेले आहेत ते सुध्दा वसूल केलेले नाही. त्या विकसितकारांच्या माध्यमातून सक्रमण शिबिरात दिलेले गाळेही त्या ठिकाणी परत घेतलेले नाहीत. ही वस्तुस्थिती आपल्या लक्षात आणून देतांना सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण थातूर-मातूर उत्तर कृपा करुन देऊ नये. आपण यामध्ये खोलवर जाऊन चौकशी करावी, आजच्या चर्चेतून मुंबईकरांना काहीतरी योग्य असा निर्णय मिळेत असे पाहावे. या ठिकाणी शासन अस्तित्वात आहे हे जनतेला जाणवू द्या. 33 विकसितकारांनी अजूनही आपणाला 28 हजार गाळे दिलेले नाहीत. दुसरा विषय असा आहे की, अरुंद भूखंड, आमचे युतीचे शासन असतांना आम्ही अरुंद भूखंड शोधून काढले. एक नॅरो प्लॉट, इन फिजिबल आणि रिझर्व्ह प्लॉट असे 295 प्लॉट आम्ही शोधून काढले. समजा एखादी इमारत आहे त्या जुन्या चाळीमध्ये पूर्वी 10 x 10, 10 x 12, 10 x 15 चे 10 गाळे होते, आणि ती इमारत पडली तर ती रोड वाईडनिंगमध्ये तरी असायची त्याला आपण रिझर्व्ह प्लॉट म्हणतो.

यानंतर श्री. सांगळे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

इनफिजीबल प्लॉटच्या संदर्भात तेथे असलेल्या भाडेकरुंना सध्या असलेले चटईक्षेत्र उपयोगात आणू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. युती शासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दि. 3 मार्च, 1999 रोजी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती खुल्लर यांनी मुंबई गृहनिर्माण खात्याला पत्र लिहिले की, " सदर भूखंडावर पुनर्बांधणी योजना शक्य नसल्यामुळे, भूसंपादनाची कार्यवाही करता आली नाही. वरील भूखंडांपैकी 85 भूखंड या ठिकाणी व्यापले गेलेले आहेत. भविष्यात त्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उर्वरित भूखंडावर तळमजला किंवा तळमजला + एक एवढे बांधकाम झालेले आहे. वरील विचार करता असे सादर करण्यात येते की, वरील 85 भूखंडावरील भाडेकरु रहिवाशांची जबाबदारी मंडळाने स्वीकारलेली आहे." अशा आशयाचे पत्र पाठविले होते. त्यानंतर दोन महिन्यांनी युतीचे शासन गेले. परंतु या ठिकाणी युती शासनावर अनेक प्रकारचे आरोप केले जातात. या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, आपल्या हातामध्ये रामराज्य आणण्यासाठी युती शासनाने आपल्याला संधी दिली. दि.3 मार्च, 1999 रोजी मुंबई गृहनिर्माण खात्याला पत्र दिलेले असताना सुध्दा 295 अरुंद प्लॉटस पैकी एक सुध्दा प्लॉट शिल्लक राहिलेला नाही, त्या ठिकाणी सर्व अतिक्रमण झालेले आहे. या संदर्भात गेल्या 5-6 वर्षांपासून का निर्णय घेण्यात आला नाही ? या प्रकरणी कोण जबाबदार आहेत ? या संदर्भात शासनाने त्वरीत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. दुसरी बाब अशी आहे की, बहुतांशी संक्रमण शिबिरे उपनगरात आहेत. मध्य मुंबईमध्ये संक्रमण शिबिरे कमी असल्यामुळे त्या ठिकाणी पेरु कंपाऊंड नावाची एक वसाहत तयार करण्यात आली. या सक्रंमण शिबिरामध्ये शहरातील सर्वसामान्य जनता आहे. शहरामध्ये मोठी जागा नसल्यामुळे सन 1970 ते 1975 या कालावधीत कुलाब्यापासून सायनपर्यंत आणि वरळी पासून शिवडीपर्यंत संक्रमण शिबिरे बांधण्यात आली, हे सर्व ग्राऊंड कन्स्ट्रक्शन्स असल्यामुळे ती सर्व घुसखोरांनी व्यापलेली आहेत. मुंबई शहरामध्ये काही संक्रमण शिबिरे बांधण्यात यावी अशी मागणी होती. त्यानुसार संक्रमण शिबिरे बांधण्यात आली. परंतु या ठिकाणी सुध्दा ज्यांचा मुंबई इमारत पुनर्रचना दुरुस्ती मंडळाशी कोणताही संबंध नाही अशा लोकांकडून एक-एक लाख रुपये घेऊन जागा देण्यात आल्या त्यापैकी काही जागा विकसितकारांना देण्यात आल्या. विकसितकारांचा जुना अनुभव आहे की, शिवशाही प्रकल्पाच्या माध्यमातून विकसितकारांना जागा देण्यात आल्या होत्या. परंतु त्या जागा त्यांनी अजूनही खाली केलेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

मी 2-3 उदाहरणे देऊ इच्छितो. पेरु कंपाऊंडमध्ये असलेल्या 66 गाळयांपैकी 9 गाळे घुसखोरांनी बळकावले आहेत. याबाबत मी गेल्या एका वर्षांपासून तक्रार करीत आहे, परंतु एकाही घुसखोराला तेथून बाहेर काढण्यात आलेले नाही. त्या ठिकाणी 1600 ते 1800 रुपये भाडे असल्यामुळे तेथील मूळ रहिवाशांनी माननीय मुख्यमंत्र्यांकडे निवेदन दिले होते. एवढयाच क्षेत्रफळाच्या जागेचे दुसरीकडे 200 रुपये भाडे आहे व आमच्याकडून 1600 ते 1800 रुपये का भाडे घेतले जाते ? याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश सुध्दा दिले होते. परंतु त्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही. तसेच तपासणीच्या वेळी 30 बंद गाळे असल्याचे आढळून आल्याचे सांगण्यात आले होते. परंतु सदरील 30 गाळे दुस-या लोकांना देण्यात आलेले आहे, या गाळयापोटी दरमहा 2000 रुपये वसूल केले जात आहेत. सार्वजनिक हेतूच्या दृष्टीने मी ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. सभापती महोदय, गेल्या 10 वर्षांपासून घाटकोपर येथील माता रमाबाई आंबेडकर नगर येथे असलेल्या 300 गाळयांचे भाडे वसूल करण्यात आलेले नाही. याबाबत तेथे कार्यरत असलेल्या मुख्य भाडे वसुलीकाराला विचारणा केली असता त्याने तेथे असलेला कबड्डी संघ सदरील गाळयांचे भाडे वसूल करीत असल्याचे सांगितले.

(यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, त्यानंतर दलालांच्या बाबतीत मला काही सांगावयाचे आहे. या दलालांच्या संदर्भात युती सरकारने निर्णय घेतला होता की, जो आपला आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग आहे त्यामध्येच एक वेगळा सेल यासाठी निर्माण करावयाचा. त्यामध्ये एक पोलीस निरीक्षक, एक पोलीस उपनिरीक्षक आणि एक कॉन्स्टेबल असा स्टाफ असेल. आपल्या गाळ्यांमध्ये एखादा घूसखोर घुसला असेल तर त्याला आपण एक फॉर्म देऊन त्यातून दोन तीन प्रश्न विचारलेले असतात त्याची उत्तरे त्याचेकडून घ्यायची. हे ट्रांझिट कॅम्प कशासाठी असतात तर ज्या उपकर प्राप्त इमारती दुरूस्त करावयाच्या असतात वा पुनर्रचित करावयाच्या असतात तेव्हा त्यातील भाडेकरूंना-गाळेधारकांना दुसरीकडे कोठे निवासाची सोय नसते त्यांना त्यांच्या मूळच्या इमारतीमध्ये पुनर्वसन होईपर्यंत म्हणजे दोन अडीच वर्षे या ट्रांझिट कॅम्पमध्ये जागा दिली जाते. म्हणजेच या ट्रांझिट कॅम्पमध्ये असे लोकच निवासासाठी असले पाहिजेत. पण खरोखरी तसेच लोक त्यामध्ये असतात का ? त्या गाळ्यांमध्ये अन्य कोणी घूसखोर घुसलेले असतात ? हे पाहण्यासाठी रॅण्डम् चेक करावयाचे असते. पण आपण तसे चेकींग कधीही केलेले नाही, करीत नाही. रॅण्डम् चेक म्हणजे अचानक धाड घालून गाळ्यांची तपासणी करावयाची असते. त्यावेळी 10-25 च्या संख्येने आपले रेंट कलेक्टर्सनी प्रत्येक रूम चेक करावयाची असते. त्यावेळी त्या गाळ्यांमध्ये असलेल्यांकडून एक फॉर्म भरून घ्यावयाचा असतो. त्यामध्ये त्याला 2-3 प्रश्न विचारलेले असतात. पण अशा वेळी देखील तुमचे दलाल तेथे उभे असतात. तेथील दलालांचे स्थानिक पुढारीच तेथे असतात आणि ते पुढे येतात. म्हणून या दलालांना तुम्ही प्रथमतः जेरबंद करायला पाहिजे. सभापती महोदय, मी या ठिकाणी बोलताना 'दलालांचे पुढारी' असा शब्दप्रयोग केलेला आहे, तेव्हा अन्य कोणाला उद्देशून मी हे म्हटलेले नाही. आतापर्यंत आपण एकाही दलाला अटक केलेली आहे काय ? तेथील गाळेधारकाकडून केवळ दोन ओळी त्याचेकडून लिहून घ्यायच्या असतात. त्यावरून तो तेथे घूसखार आहे की मूळ भाडेकरू आहे हे समजून येऊ शकते. म्हणजे ही जागा तुला कोणी दिली ? मग तो सांगतो की, मला सावंत नावाच्या दलालाने ही जागा अमुक इतक्या पैशामध्ये दिली आहे. सभापती महोदय, हा सावंत नावाचा दलाल आजही सायनमध्ये गडबड करतो आहे म्हणून त्याचे नाव मी मुद्दाम घेतलेले आहे. (वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते)

..... 3एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ....

सभापती महोदय, मी दोन तीन महत्त्वाचे मुद्दे मांडून माझे भाषण संपविणार आहे. त्या नंतर या ठिकाणी कागदावर एक मोकळा भूखंड दाखविला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी काही भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांची बदली करा असे स्पष्ट आदेश देऊनही आपल्या गृहनिर्माण विभागातून त्याबाबतचे आदेश अजूनही पुढे गेलेले नाहीत. म्हणून माझी विनंती आहे की, आपल्या पुनर्रचित इमारतीतील जवळपास 500 गाळे घूसखोरांनी व्यापलेले आहेत त्यांना अजून का काढले नाही ? त्यांचेवर कारवाई का केली नाही ? ज्यांना आपण शिवशाही प्रकल्पाखाली पैसे दिलेले आहेत त्या 121 लोकांना खोटे चेक दिलेले आहेत त्यांचेवर गेली आठ वर्षात आपण फौजदारी कारबाई का केली नाही ? जे नॅरो भूखंड आहेत त्याबाबत आपल्या मुख्य अधिकाऱ्यांनी निर्णय घेतलेले आहेत त्याबाबत 1999 सालापासून आज पर्यंत का कारवाई केली नाही ? तसेच ज्या विकासकांकडे त्यांनी पुनर्वसन योजना करण्यासाठी 4 कोटी रूपये भाडे थकलेले आहे असे 2800 गाळे आहेत, ते केव्हा घेणार आहात आणि आपल्या मुख्य अधिकाऱ्यांचे आदेश खाडाखोड करणे म्हणजे खोटे दस्तऐवज तयार करणारे जे कर्मचारी-अधिकारी आहेत त्यांना तेथून बदली का केले नाही आणि त्यांचेवर फौजदारी करून त्यांना अटक का केली नाही ? .....

(यानंतर श्री.सरफरे .... 3एस 1 ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मुंबईतील अत्यंत महत्वाच्या व जिव्हाळयाच्या प्रश्नाविषयी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे याबद्दल मला खूप समाधान वाटले. सन्माननीय सदस्य श्री. चव्हाण यांचा या विषयातील गाढा अभ्यास असल्यामुळे ते विचारीत असलेले प्रश्न माझ्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असतात. त्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतांना असे सांगितले की, म्हाडाच्या उपाध्यक्षांच्या आदेशाच्या स्वाक्षरीमध्ये खाडाखोड करण्यात आली. व ज्या अधिकाऱ्यांनी ही खाडाखोड केली आहे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. माननीय सदस्यांनी घेतलेला आक्षेप जर बरोबर असेल आणि उपाध्यक्षांच्या आदेशाच्या स्वाक्षरीमध्ये खाडाखोड करण्यात आली असेल तर ती करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर ताबडतोब कारवाई करण्यात येईल. आणि हा गुन्हा क्षम्य मानला जाणार नाही अशाप्रकारचे आदेश दिले जातील.

श्री. मधुकर चव्हाण : त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला कां? त्यांना अटक केली कां? त्यांची आपण बदली केली.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, तशाप्रकारचा गुन्हा केल्याचे स्पष्टपणे निदर्शनास आल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी चौकशीचा प्रश्न नाही. श्री. सिताराम कुंटे यांनी दोन-तीन अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. ज्यांनी 42 कोटी रुपयांची फाईल लपविली ते श्री. गौतम हे त्यांच्या मूळ डिपार्टमेंटमध्ये गेले आहेत. 42 कोटींचा भ्रष्टाचार करणारे श्री. गौतम यांनी 3 वर्षे ती फाईल दाबून ठेवली. आणि त्यांनी सांगितले की, मला माझ्या ओरिजिनल डिपार्टमेंटमध्ये जावू द्या. ते ओरिजिनल डिपार्टमेंटमध्ये गेल्यानंतर आपण त्यांची चौकशी कशी करणार?

श्री. दयानंद मस्के : माननीय सदस्यांकडून जे आरोप करण्यात येत आहेत त्या संदर्भात अजून कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही. आपण या ठिकाणी स्पष्टपणे सांगत आहात की, 42 कोटी रुपयांशी संबंधित असलेली फाईल श्री. गौतम यांनी दाबून ठेवली. श्री. गौतम हे रजेवर गेले असून त्यांच्या बाबतीत असे आरोप करणे बरोबर नाही. तरीसुध्दा माननीय सदस्यांनी केलेल्या आरोपांची शहानिशा करण्यात येईल. आणि त्यामध्ये जर ते दोषी असल्याचे निदर्शनास आले तर कारवाई करण्यात येईल. परंतु या संदर्भात कोणत्याही प्रकारची शहानिशा झालेली नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के...

श्री. गौतम हे रितसरपणे रजेवर गेले आहेत. असे असतांना अशापध्दतीने आक्षेप घेणे बरोबर नाही. आणि म्हणून पुन्हा मी सांगतो की, या प्रकरणी शहानिशा करुन कारवाई करण्यात येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत मूलभूत प्रश्न विचारला आहे. माननीय सदस्यांचा म्हाडाशी निकटचा, जवळचा संबंध आहे. त्यांना आतील, बाहेरील, काळे, गोरे सर्व माहीत आहे. प्रश्न असा आहे की, एस.आर.ए. योजना ही "3 भ" मध्ये अडकली आहे. यामध्ये पहिला "भ भाई, दुसरा भ भतीजावाद, आणि तिसरा भ भ्रष्टाचार". तेव्हा माननीय मंत्रिमहोदय आणि त्यांचे सरकार या "3 भ" मधून या योजनेला बाहेर काढणार आहे काय? एस.आर.ए. योजनेमध्ये मूळ झोपडपट्टीधारकांमध्ये भांडणे लावण्याचा प्रयत्न विकासक करीत असतात. ज्या झोपडपट्टयांचे पुनर्वसन करुन त्यांचे रुपांतर एस.आर.ए. योजनेमध्ये करावयाचे असते त्याकरीता तेथील वेगवेगळया प्रकारच्या नागरीकांच्या, रहिवाशांच्या कमिटया निर्माण होतात, त्यांच्यामध्ये भांडणे लावण्याचा प्रयत्न केला जातो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु.....

इमारती बांधून तयार झालेल्या आहेत. त्यामध्ये अधिकृत झोपडपट्टीवासी असतात त्यांची नाव नोंदणी झालेली त्यांना गाळ्यांचा ताबा न देता ज्यांचा काही संबंध नाही अशा लोकांनी दिला जातो. या संदर्भाने मंत्री महोदय कारवाई करणार आहेत काय ? झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येते. त्यामध्ये झोपडपट्टीवासियांना ट्राझिट कॅम्पमध्ये तात्पुरती त्यांची व्यवस्था केली जाते. ट्रान्झिट कॅम्पमध्ये रहाणारे खरोखर झोपडपट्टी रहिवाशी आहेत, ते खरोखरच पात्र आहेत काय ? याची मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

श्री.दयानंद मस्के : ज्यांना ट्रान्झीट कॅम्पमध्ये पाठविले जाते, त्यांची पात्रता सिध्द करुनच पाठविले जाते. ट्रान्झीट कॅम्पमधील घुसखोरांचा प्रश्न आहे. याबाबत नियमितपणे शोध घेऊन घुसखोरांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जातो. सन्माननीय सदस्यांनी तीन "भ"च्या संदर्भाने प्रश्न विचारलेला आहे. भविष्यामध्ये सरकार त्याचा विचार करेल. तीन "भ"चे भ्रमण सुरु आह.

सन्माननीय सदस्यांनी एस.आर.अे.च्या संबंधाने महत्वाचा प्रश्न उपस्थित केला. विकासकांच्या संबंधात झोपडपट्टीवासियांचे मतभेद होतात. त्यामधून ते कोर्टामध्ये जातात, यामुळे कामे होण्यास विलंब लागतो. अनेक लोक वेगवेगळ्या पध्दतीने आपापले विकासक लादण्याचा प्रयत्न करत असतात.

श्री.मधु[illegible] चव्हा[illegible] : मी [illegible]ीर प्रश[illegible] उपस्थित [illegible]ला असतां[illegible] मंत्रीमहोदय "भ"बाबतच सां[illegible] आहेत. म्हाडा[illegible] 3 हजार [illegible]टीची [illegible]नवु[illegible] [illegible]रु[illegible] इमारती पु[illegible]चित [illegible]लेल्या आहेत, त्या इमारतींमधील [illegible]ळे आज पडू[illegible] आहेत, त्यासंबंधात उत्तर दिले जात [illegible]ही. इमारतींमध्ये [illegible]ट्यावधी रुपयाचे भांडवल [illegible]लेले आहे. पु[illegible]चित [illegible]लेल्या इमारतीमध्ये [illegible]ती लो[illegible] रहायला [illegible]लेले आहेत आ[illegible] [illegible]ती लो[illegible] ट्रॅ[illegible]झीट [illegible]म्पमध्ये रहात आहेत, त्यामध्ये घुसखोर किती आहेत, याचे उत्तर दिले जात [illegible]ही. या [illegible]ीर प्रश[illegible] उत्तर दे[illegible]याची आवश्य[illegible]ता वाटत [illegible]ही [illegible]य ?

श्री.दया[illegible]द मस[illegible] : आदर[illegible]य स[illegible]य सदस्य श्री.मधु[illegible]र चव्हा[illegible] साहेबां[illegible] "भ"च्या संबंधित अशाप्र[illegible]रचा प्रश[illegible] उपस्थित [illegible]लेला आहे. त्यांचा भ्रष्टाचाराचा "भ"मधीलच प्रश[illegible] आहे. तो [illegible]पटू[illegible] [illegible]ढ[illegible]याची मा[illegible]सि[illegible]ता ठेवली तर "भ" [illegible]डला जाईल.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, झोपडपट्टी पु[illegible]स[illegible] योज[illegible]अंत[illegible] वि[illegible]स[illegible] [illegible]ती [illegible]ळे उपलब्ध [illegible]रु[illegible] दिले ? त्याचप्रमा[illegible] झेपडपट्टी पु[illegible]स[illegible] योज[illegible]अंत[illegible] म्हाडा[illegible] वि[illegible]स[illegible]ला [illegible]ती [illegible]ळे दिले, त्यापै[illegible] त्यां[illegible] [illegible]ती [illegible]ळे परत [illegible]ले, त्यांच्या[illegible]डू[illegible] भाडे ये[illegible] आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.विलास अवचट (पुढे चालू....

□य, असल्यास □ती आहे ? त्याचबरोबर ए□□ घुस□□र □ती आहेत ? या घुस□□रां□ बाहेर □ढ□र आहात □य ?

श्री.दया□द मस□ : वि□स□□□ 5,315 □□ळे आतापर्य□त दिलेले आहेत. त्यांच्या□डे 2,793 □□ळे शिल्ल□ आहेत. 11 वि□स□ 856 □□ळे परत दे□र आहेत.

या□र श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के .....

आता जे काही गाळे विकासकांकडे शिल्लक राहिलेले आहेत त्यामध्ये काही लोकांना परीक्षेच्या दृष्टीकोनातून मुदतवाढ दिलेली आहे. परीक्षेनंतर अतिक्रमण हटवून ते गाळे ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

श्री. विनायक मेटे : दहिसर (पूर्व) येथे पोलीस स्टेशनला अगदी लागून असलेले संक्रमण शिबीर 15 वर्षांपूर्वी बांधलेले होते. ज्यांच्या इमारतीची दुरुस्ती करावयाची आहे असे लोक त्या संक्रमण शिबिरामध्ये न राहता 15 वर्षापासून त्या ठिकाणी आगंतूक घुसखोर घुसलेले आहेत. या 15 वर्षाच्या कालावधीत तेथील घुसखोरांना बाहेर काढलेले नाही. एकदोन वेळा प्रयत्न झाला परंतु प्रत्येकवेळी शासनाकडून स्थगिती देण्यात आली. दोन महिन्यांपूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांनी सगळ्या घुसखोरांना बाहेर काढावे असे आदेश दिले होते तरीही त्यांना बाहेर काढलेले नाही. 15 वर्षापासून ते बाहेर निघालेले नाहीत. त्यांना आता बाहेर काढणार काय ?

श्री. दयानंद मस्के : परीक्षेचा कालखंड संपल्यानंतर सगळ्या घुसखोरांना बाहेर काढण्याचा प्रयत्न करु.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील उर्दू शाळांतील शिक्षणाच्या दिवसेंदिवस वाढत असलेल्या समस्या.

मु. शी. : राज्यातील उर्दू शाळांतील शिक्षणाच्या दिवसेंदिवस वाढत असलेल्या समस्या यासंबंधी प्रा. फौजिया खान, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

प्रा. फौजिया खान (नामनियुक्त) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"राज्यातील उर्दू शाळांतील शिक्षणाच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असून कायम विनाअनुदानित तत्वावरील मंजूर तुकड्यांना कालावधी पूर्ण झाल्यानंतर देखील अनुदान न देणे, पहिली-दुसरी नंतर तुकड्यांमध्ये कपात होत असणे, राज्यात एकच अपंग शाळा आणि एकच जवाहर नवोदय विद्यालय असणे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बी.एड. करण्याची संधी नसणे, यासारख्या ज्वलंत प्रश्नांमुळे उर्दू भाषिक विद्यार्थ्यांची शैक्षणिक हेळसांड होत असून त्यामुळे उर्दू भाषिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली असून त्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना "

सभापती महोदय, महाराष्ट्र में उर्दू बोलने वाले लोगों की संख्या लगभग 20 प्रतिशत है. शिक्षा नीति-1996 के अनुसार बच्चों को मातृभाषा में शिक्षा लेने का अधिकार है. बच्चों को दी जाने वाली शिक्षा अच्छे दर्जे की हो, पर्याप्त संख्या में स्कूल हो, आवश्यक संख्या में शिक्षक हो, शिक्षा के दर्जे की जांच करने के लिए स्वतंत्र मशीनरी हो एवं नैसर्गिक बढ़ोतरी के साथ-साथ स्कूलों को समय पर अनुदान प्राप्त हो, ये सब बातें शासन से अपेक्षित है. लेकिन यह देखा गया है कि इनमें से एक भी जरुरत पूरी होते नज़र नहीं आ रही है. इस कारण से उर्दू भाषिकों में असंतोष फैल गया है, उनमें निराशा फैल गई है. इसलिए उर्दू भाषिकों की भावनाओं को समझते हुए उनकी समस्या हल हो, इसी उद्देश्य से मैंने इस सदन में यह अर्धातास चर्चा उपस्थित की है.

सभापति महोदय, वैसे देखा जाए तो शिक्षा पर जितना ध्यान दिया जाना चाहिए उतना ध्यान न तो केन्द्रीय सरकार देती है और न राज्य सरकार. शिक्षा पर हमारी सरकार राज्य में सिर्फ ढाई से तीन प्रतिशत खर्च करती है जबकि दूसरे देश और विकसित देश शिक्षा पर करीब 6 से 7 प्रतिशत खर्च करती हैं. जिन जिन देशों ने शिक्षा पर अधिक खर्च किया है वे देश विकसित

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देशों की पंक्ति में खड़े हैं. दूसरे शब्दों में यह कहा जा सकता है कि सरकार द्वारा शिक्षा पर जो खर्च किया जाता है, वह खर्च नहीं है बल्कि वह इनवेस्टमेंट साबित होती है. हमारा राज्य पुरोगामी राज्य है. हम सब महात्मा फुले,शाहू महाराज और बाबासाहब आंबेडकर की विचारधारा से प्रभावित है. मैं एक बात की ओर सदन का ध्यान आकर्षित करना चाहती हूं. महात्मा फुले, शाहू महाराज और बाबासाहेब आंबेडकर के द्वारा जो मूवमेंट की गई थी, उनमें उन्होंने शिक्षा के प्रसार पर भी जोर दिया था. इतना ही नहीं बल्कि शाहू महाराज जी अपने कोल्हापुर संस्थान के अन्तर्गत हर साल शिक्षा पर लगभग 23 प्रतिशत धनराशि खर्च करते थे. यह एक विश्व किर्तीमान है.जिसको आज तक किसी ने नहीं तोड़ा. अगर इच्छा शक्ति हो तो हम भी इस उदाहरण से प्रेरणा लेकर आगे बढ़ सकते हैं. लेकिन जैसा मैंने शुरु में कहा कि हमने शिक्षा क्षेत्र को इतना ज्यादा गंभीरता से नहीं लिया. मैं यह कहना चाहती हूं कि, उर्दू भाषा के स्कूलों की शिक्षा की बहुत ही खस्ता हालत होती जा रही है. शासन के जो प्रचलित नियम है, उसके अनुसार अल्पसंख्यांक संस्थाओं को भी कायम बिना अनुदान तत्व पर मान्यता दी जा रही है लेकिन यह समझना चाहिए कि एक गरीब घटक बिना अनुदान तत्व पर अधिक दिनों तक शिक्षा संस्था नहीं चला सकता. वास्तव में यह अपने आप में नेचरल जस्टिस है कि, जो पीड़ित घटक है उन्हें विशेष अवसर दिए जाने चाहिए. यह बात भारतीय संविधान में कही गई है. अगर मुस्लिम समाज आर्थिक व सामाजिक दृष्टि से पिछड़ा है, जो कि वास्तव में पिछड़ा है तो क्या सरकार द्वारा उन्हें विशेष मौका नहीं दिया जाना चाहिए ? मैं यह पूछना चाहती हूं कि क्या उर्दू भाषिक लोकसंख्या के आधार पर आवश्यक शासकीय विद्यालय उपलब्ध है ? अगर शासन लोकसंख्या के आधार पर आवश्यक संख्या में विद्यालय उपलब्ध नहीं करा सकता है तो बिना अनुदान तत्व पर विद्यालयों को मंजूरी देने के बाद उनके लिए कायम बिना अनुदान तत्व पर रखने की नीति क्यों अपनाई गई है ? यह मैं पूछना चाहती हूं कि वर्ष 2001 में 8 से 10 वीं तक के स्कूलों में कायम बिना अनुदान तत्व पर मंजूर टुकड़ियों को कालावधी पूरा होने के बाद भी अनुदान क्यों नहीं दिया जा रहा है ? ऐसे स्कूलों को तत्काल अनुदान दिया जाए. इसलिए मैं इस ओर आपका ध्यान आकर्षित करना चाहती हूं. दूसरी बात यह है कि, नैसर्गिक बढ़ोतरी के तहत अतिरिक्त टुकड़ियों को समय पर मान्यता न मिलने के कारण उर्दू भाषा की शिक्षा के साथ साथ उर्दू भाषा के स्कूलों में पढ़ने की इच्छा रखने वाले बच्चों का भी नुकसान हो रहा है.

इसके बाद श्री शर्मा....

अशोधित पाठ / शोधित नहीं

. . . श्रीमती फौजिया खान जारी (पूर्वी तालेवार)

पहली और दूसरी कक्षा के बाद टुकड़ियों में होने वाली कटौती की वजह से ड्रॉप आउट का प्रमाण बढ़ता जा रहा है. पहली कक्षा की अगर 4 टुकड़ियां होती है तो तीसरी कक्षा में 2 और पाँचवी कक्षा में एक टुकड़ी रह जाती है. इस तरह से हम ड्रॉप आउट को प्रोत्साहन दे रहे हैं, ऐसा मैं समझती हूँ.

सभापति महोदय, एक तरफ तो हम सर्व शिक्षा अभियान की बात करते हैं और दूसरी तरफ सर्व शिक्षा अभियान के माध्यम से उर्दू भाषिक टीचर्स को जो ट्रेनिंग दी जाती है, वह उर्दू में नहीं होती है. उनको ट्रेनिंग मराठी में दी जाती है. जब उनको ट्रेनिंग उर्दू में नहीं दी जाती है तो फिर उर्दू भाषिक लोग अच्छी तरह से ट्रेनिंग कैसे ले सकते हैं ?

सभापति महोदय, जहां तक लिटरेचर और टेक्स्ट बुक का सवाल है तो उर्दू भाषिक विद्यार्थियों को टेक्स्ट बुक पूरा साल गुजरने के बाद भी नहीं मिल पाती हैं. अध्यापकों को उनकी पुस्तकें उर्दू भाषा में नहीं दी जाती हैं. सर्व शिक्षा अभियान के अन्तर्गत जहां अपने राज्य में मदरसों को सुविधाएं नहीं दी जाती है, वहीं दूसरी ओर उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश और बिहार में ये सुविधाएं दी जाती हैं. केवल इतना ही नहीं, बल्कि बिना अनुदानित टुकड़ियों के विद्यार्थियों को शालेय पोषण आहार से भी वंचित रखा जाता है. एक टुकड़ी को शालेय पोषण आहार दिया जाता है, जबकि दूसरी टुकड़ी को नहीं दिया जाता है. बच्चे इसके बारे में क्या सोचते होंगे ?

सभापति महोदय, मैं शासन से पूछना चाहती हूँ कि उर्दू भाषिक लोगों की संख्या को देखते हुए क्या हमारे राज्य में पर्याप्त मात्रा में उर्दू भाषिक स्कूल हैं और क्या उन स्कूलों में पर्याप्त संख्या में शिक्षक हैं ? अगर नहीं हैं तो फिर शासन इस बारे में क्या कदम उठा रहा है ?

सभापति महोदय, हमारे राज्य में सिर्फ एक अपंग शाला है और एक नवोदय विद्यालय है. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ में उर्दू भाषा में पोस्टल बी.एड. की सुविधा उपलब्ध नहीं है. उर्दू भाषिक लोगों के लिए 4 स्वतंत्र महाविद्यालय निर्माण किए जाएं, यह बात मैंने बार बार इस सभागृह में उठाई है, लेकिन आज तक इन महाविद्यालयों का निर्माण नहीं हो सका है. शासन की तरफ से कभी कहा जाता है कि यह विषय पॉलिसी से संबंधित है, कभी कहा जाता है कि इसमें आर्थिक बाब शामिल है. इस प्रकार से एक भी महाविद्यालय इस राज्य में नहीं है, जबकि हजारों की संख्या में उर्दू मीडियम के स्कूल और जूनियर कॉलेज हैं. मैं शासन से पूछना चाहती हूँ कि

. . . . 3J-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्रीमती फौजिया खान जारी

क्या यह उर्दू भाषिक विद्यार्थियों के साथ अन्याय नहीं है. ऐसा प्रतीत होता है कि शासन उर्दू भाषिक लोगों को नजरंदाज कर रहा है. उर्दू भाषिक लोगों के साथ खिलवाड़ केवल यहीं तक सीमित नहीं है, हमारे विधान भवन में जो बहुत बड़ा ग्रंथालय है वहां पर उर्दू भाषा का कितना साहित्य है, उर्दू भाषा के कितने संदर्भ ग्रंथ हैं, उर्दू भाषा की कितनी बुक्स हैं और उर्दू भाषा के कितने न्यूज पेपर्स इस ग्रंथालय में आते हैं. मैं यह कहना चाहती हूँ कि अगर पर्याप्त संख्या में उर्दू भाषा से संबंधित बुक्स उपलब्ध नहीं होंगी तो फिर उर्दू भाषिक लोगों की समस्याओं के बारे में हमारे विधायकों को कैसे पता चलेगा ? उर्दू भाषा के न्यूज पेपर्स खस्ता हालात में चल रहे हैं. क्या उर्दू भाषा के न्यूज पेपर्स को शासन की तरफ से जाहिरात नहीं देने चाहिए. किसी भी न्यूज पेपर के लिए जाहिरात बेक बोन का काम करता है. इसलिए अगर उनको जाहिरात नहीं दी जाएगी तो फिर उर्दू भाषा के न्यूज पेपर्स नहीं चल सकते हैं.

सभापति महोदय, विदर्भ में उर्दू मीडियम के स्वतंत्र स्कूल हैं, वहां पर अटैच सेक्शन नहीं है और उस स्कूल का एक स्वतंत्र हैड मास्टर होता है. जबकि मराठवाडा में उर्दू मीडियम के अटैच सेक्शन हैं और इस स्कूल में मराठी भाषा का हैड मास्टर होता है. मेरी शासन से मांग है कि मराठवाडा में भी उर्दू मीडियम के लिए स्वतंत्र हैड मास्टर होना चाहिए, नहीं तो एडमिनिस्ट्रेशन किस तरह से चलेगा. उर्दू मीडियम के स्कूल के लिए ई.डी.आई. या जो इन्सपेक्शन स्टाफ है, वह उर्दू स्पीकिंग होना चाहिए. अगर वह मराठी स्पीकिंग होगा तो फिर उर्दू मीडियम के स्कूल में शिक्षक क्या पढ़ा रहा है, कोर्स कैसे पूरा कर रहा है, इन सारी बातों को वह कैसे देख सकते है ? उर्दू मीडियम स्कूल के शिक्षकों के साथ भेदभाव किया जाता है, उनकी सीनियरिटी लिस्ट अलग कर दी जाती है. उर्दू मीडियम स्कूल के शिक्षकों को इस बारे में न्याय मिलना चाहिए. नॉन सेलरी ग्रान्ट के बारे में एक अलग प्रकार की समस्या है. मेनेजमेंट में डिस्प्यूट होता है और मॉयनोरिटी इन्सटिट्यूशन की वजह से कुछ लोग कोर्ट में जाते हैं तो दूसरा मेनेजमेंट सामने आ जाता है. मैं माननीय मंत्री महोदय से पूछना चाहती हूँ कि इस प्रकार से उर्दू मीडियम स्कूलों के प्रश्न कैसे हल होंगे ?

. . . . 3J-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, मेरे पास समय कम है, इसलिए मैं सभी प्रश्न यहां पर उपस्थित नहीं कर पा रही हूँ. मैंने जो समस्याएं आपके सामने रखी हैं, वे सिर्फ "टिप ऑफ द आइसबर्ग" हैं. शासन इस ना-इन्साफी को दूर करेगा और उर्दू भाषिक शिक्षण के साथ न्याय करेगा, इतना कहते हुए मैं अपना भाषण पूर्ण करती हूँ.

. . . भाषण पूर्ण (नंतर कानाडे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती फौजिया खान यांच्या हिंदी भाषणानंतर)

श्री. वसंत पुरके (शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून एक अतिशय महत्वपूर्ण असा विषय सभागृहामध्ये उपस्थित केला आहे. उर्दू माध्यमातील शाळातील शिक्षक,पर्यवेक्षक,या शाळांची तपासणी,मुलांची संख्या,मिळणारे अनुदान असे अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. राज्यामध्ये 20 टक्के उर्दूभाषिक आहेत. त्यांच्या शिक्षणाची हेळसांड होऊ नये आणि त्यांना सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा मिळाव्यात अशी सूचना माननीय सदस्यांनी याठिकाणी केली आहे. विशेषत: उर्दू शाळांवर होणारा खर्च अतिशय कमी आहे अशी चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. मी याठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की,अनुदानित,विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित हे तत्व काळाच्या ओघात राबविले गेले. ज्या संस्था अनुदान तत्वावर आलेल्या आहेत आणि ज्यांचे मूल्यांकन झालेले आहे त्यांना निश्चितपणाने अनुदान मिळेल. कायम विनाअनुदानित तत्वावरील शाळा असतील आणि सोशली बॅकवर्ड लोक आहेत त्यांच्यासाठी सुध्दा विचार केला जाईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, " If the lower class are not given preferential treatment, they will not rise. विनाअनुदान तत्वावरील ज्या शाळा आहेत त्यांच्या बाबतीत राज्य सरकारने ॲफेडेव्हीट केले आहे की शासनाची वित्तीय स्थिती सुधारल्यावर अनुदान या शाळांना अनुदान देण्याबाबत गांभीर्याने विचार करु. राज्यामध्ये कायम विनाअनुदानित 6077 शाळा आहेत. आजच्या घडीला या शाळांना अनुदान देण्याची मागणी मान्य करता येत नसली तरी नजिकच्या काळात राज्याची आर्थिक स्थिती सुधारेल आणि या शाळांना अनुदान प्राप्त होईल.

यानंतर श्री. खर्चे पी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

लोकसंख्येच्या प्रमाणात शाळा असाव्यात अशी सन्माननीय सदस्या यांची मागणी आहे तसेच त्यांनी मान्य केले की, आठवी ते दहावीच्या तुकडयांना अनुदान मिळाले नाही. यासंदर्भात मी असे सांगू इच्छितो की, बजेटमध्ये त्यासंबंधीची तरतूद करु शकलो तर नक्की अनुदान देण्यात येईल. परंतु मला असे सांगावयाचे आहे की, दोन वर्षे जरी तुकडी बंद असली आणि त्यानंतरच्या वर्षात जर विद्यार्थ्यांची संख्या ती संस्था मेंटेन करु शकली तरी अनुदान देता येईल. परंतु पाच-सात वर्षे मुलांची संख्या सारखी कमी कमी होत असेल आणि संस्था मुलांची उपस्थिती टिकविण्यामध्ये असमर्थ ठरली तर मात्र ती शाळा बंद करावी लागते म्हणून ही उपस्थिती मेंटेन करणे ही संस्थेची जबाबदारी आहे. तसेच उर्दू भाषेतून साहित्य उपलब्ध होण्यासंबंधी देखील त्यांनी मागणी केली आहे. मागील वर्षी शासनाने "लेखन-वाचन हमी कार्यक्रम" सुरु केला होता. त्यावेळी उर्दू भाषेतून पुस्तके उपलब्ध करुन देता आली नाही. यावर्षी मात्र शासनाकडून अशा प्रकारचे उर्दू साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेतला आहे. सन्माननीय सदस्यांची मागणी अशी आहे की, विधान भवनातील लायब्ररीमध्ये सुध्दा उर्दू वर्तमानपत्र व साहित्य उपलब्ध व्हावे. या सूचनेचाही विचार करण्यात येईल. त्याचबरोबर उर्दू भाषेतील शिक्षकांची ज्येष्ठता डावलून त्यांच्यावर अन्याय होत असल्याची तक्रार सन्माननीय सदस्या यांनी केली आहे, त्या अनुषंगाने सूचना देण्यात येतील. शाळेसाठी स्वतंत्र मुख्याध्यापक देण्याबाबतची त्यांची मागणी आहे. हे सांगत असतांना त्यांनी विदर्भातील उर्दू शाळांचा संदर्भ दिला. त्याबाबत मी असे स्पष्ट करु इच्छितो की, विदर्भामध्ये उर्दू शाळा हया स्वतंत्र संस्था आहेत, त्यांचे स्वतंत्र इन्स्पेक्शन होते. याच प्रकारची दखल आपल्या भागात देखील घेण्यात येईल. कारण मराठवाडयामध्ये उर्दू शाळांची तपासणी करणारे जे गट शिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी असतात त्यांना उर्दू शाळांतील शिक्षकांनी काहीही लिहीले तरी ते "ओके" म्हणून पुढे जातात आणि ज्यावेळी गुणवत्ता विकासासंबंधी तपासणी होते त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंबंधीच्या सूचना केल्या जातात. त्यावेळी हे तपासणी करणारे अधिकारी म्हणतात की, आम्हाला उर्दू भाषेचे नॉलेज नाही. म्हणून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, उर्दू भाषेतून स्वतंत्र शब्दकोष निर्माण करण्यात यावा. कारण इन्स्पेक्शन करणाऱ्यांना जर त्या भाषेचे ज्ञान नसेल तर ही गंभीर बाब आहे. म्हणून एज्युकेशनल ॲटमॉसपिअर, सुपरविजन, कंट्रोलिंग आणि इन्स्पेक्शन या चारही बाबी निश्चितपणे यशस्वीपणे होणे आवश्यक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी नवोदय विद्यालयांच्या संदर्भात आपला मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत मला असे स्पष्ट करावेसे वाटते की, शासनाने प्रत्येक महसुली विभागामध्ये एकच नवोदय विद्यालय देण्याबाबतचे धोरण स्वीकारलेले आहे. म्हणून एका व्यतिरिक्त आणखी जर नवोदय विद्यालय घ्यावयाचे असेल तर त्यासाठी कॅबिनेटसमोर जावे लागणार आहे. सध्या जरी ही सूचना स्वीकारण्यासारखी नसली तरी आम्ही यासाठी कॅबिनेटसमोर जाऊन मान्यता घेऊ. कारण जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकावयाचे असेल तर इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे तितकेच आवश्यक आहे, याचाही विचार आपल्याला करावा लागणार आहे. तसेच अपंगांच्या संदर्भात परभणी जिल्हयामध्ये एक शाळा असून त्यात 30 मुले उर्दू माध्यमाची आहेत व यासंदर्भात समाजकल्याण विभागाला आम्ही कळविलेले आहे. तसेच माझ्या विभागाच्या संदर्भात ज्या ज्या सूचना येथे केल्या त्यांचा आदर तर होईलच परंतु त्यांची अंमलबजावणी करण्याचाही विचार आम्ही जरुर करु.

श्री. श्रीकांत जोशी : महोदय, उर्दु भाषेतील शिक्षक तयार करण्यासाठी एम.एड.कॉलेजची स्थापना करण्याबाबत शासनाचा काय विचार आहे ? मराठवाडयाच्या भौगोलिक परिस्थितीचा आपाण विचार केला तर हे आवश्यक आहे. कारण निजामाच्या राज्यातून महाराष्ट्रामध्ये सामील होण्यापुर्वी जवळपास 400 संस्था निजामांनी या भागात सुरु केल्या होत्या. त्यापैकी 75 माध्यमिक संस्था आपल्याला संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर बंद कराव्या लागल्या आणि फक्त 325 संस्थाच आपण टिकवू शकलो. त्या काळात मराठवाडयाची मुख्य देन म्हणजे चांगल्या दर्जाच्या उर्दू शाळा ही होती. आताच सांगितल्याप्रमाणे ज्यांच्यावर कारवाई होणार आहे त्यांना उर्दू भाषेचे काहीच ज्ञान नाही आणि त्याचा परिणाम म्हणून उर्दू आणि मराठी भाषिक असा वाद सुरु होतो. कारण इन्स्पेक्शन करणाऱ्यांना काहीच कळत नाही त्यामुळे गुणवत्ता विकास अभियान योजनेचा आढावा घेतांना अे.डी.आय. आणि बी.इ.ओ. वर कारवाई होते.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी...

मग ते आमच्याकडे येतात आणि सांगतात की, आम्हाला उर्दू भाषा कळत नाही तर ॲक्शन कशी काय घेणार ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मराठवाडयामध्ये लोकसंख्येप्रमाणे शाळा दिल्या पाहिजेत तसेच शिक्षकांना मातृभाषेचे शिक्षण देणे गरजेचे आहे. ज्यांना उर्दू भाषा येत नाही अशा अन्य भाषिक शिक्षकांविरुध्द वेतनवाढ रोखण्याची शासनाने कारवाई केली आहे, ती कारवाई शासन मागे घेणार आहे काय ? या बरोबरच युती शासनाच्या काळात एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला होता. मराठवाडा विभागामध्ये उर्दू विषय शिकविण्यास सुरूवात केली होती. परंतु, उर्दू भाषेच्या विकासासाठी अद्यापपर्यंत स्वतंत्र बोर्ड स्थापन करण्यात आलेले नाही. शासन कालबद्ध कार्यक्रम आखून उर्दू भाषेसाठी बोर्ड स्थापन करणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, उच्च शिक्षित म्हणजे उर्दू विषयात एम.एड.झालेले शिक्षक मिळणे सध्या तरी आवाक्याबाहेर आहे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, खाजगी संस्थांनी प्रपोजल पाठविले तर शासन त्याचा जरूर विचार करील.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, गुणवत्ता विकास अभियानांतर्गत ज्यांना उर्दू भाषेचे ज्ञान नाही अशा शिक्षकांवर कारवाई केली असेल तर ती मागे घेण्यात येईल.

डॉ.एम.ए.अझिज : सभापती महोदय, राज्यातील उर्दू शाळेतील शिक्षकांच्या समस्येसंबंधी सन्माननीय सदस्या प्रा.फौजिया खान यांनी जी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली, त्यावर माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले आहे, त्यास अनुसरून मला दोन-तीन प्रश्न शासनाला विचारावयाचे आहेत. औरंगाबादमधील 50 प्राथमिक शाळांना शासनाने मान्यता दिलेली आहे. त्याला एक वर्ष झालेले आहे. परंतु, त्या शाळा आजपर्यंत कायम करण्यात आलेल्या नाहीत. यासंबंधी मी सी.इ.ओ.यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, फक्त 50 शाळांना परवानगी देण्यात आलेली आहे. असे असले तरी प्रत्यक्षात 18 शाळा सुरू करण्यात आल्या आहेत. आज 162 उर्दू प्राथमिक शिक्षकांच्या जागा भरण्यात आलेल्या नाहीत. त्या शासन केव्हा भरणार आहेत ? असा प्रश्न सी.इ.ओ.यांना विचारला असता त्यांनी सांगितले की, हा प्रश्न शासनस्तरावर प्रलंबित आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज...

माझा दुसरा मुद्दा असा आहे की, मराठी शाळेतील शिक्षकांना ज्येष्ठता यादीप्रमाणे उर्दू माध्यमाच्या शाळेत मुख्याध्यापक पदावर पाठविले जाते. मात्र, उर्दू माध्यमातील शिक्षकाला ज्येष्ठता यादीप्रमाणे मराठी शाळेमध्ये पदोन्नतीने पाठविले जात नाही. शिक्षण विभागाचे असे म्हणणे आहे की, उर्दू माध्यमातील शिक्षकाला पदोन्नती दिल्यानंतर तो मराठी शाळेमध्ये प्रशासनिक काम करू शकत नाही. ही चुकीची गोष्ट आहे. ही एक गंभीर बाब आहे. तेव्हा माझा असा प्रश्न आहे की, उर्दू व अन्य भाषेतील शिक्षकांची ज्येष्ठता यादी स्वतंत्र न करता ती एकत्र करून त्याप्रमाणे पदोन्नती देण्याच्या विषयाकडे शासन लक्ष देणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 3-4 प्रश्न विचारले आहेत. मराठवाडा विभागामध्ये 50 शाळा दिलेल्या आहेत, त्या कायम कराव्यात असे त्यांचे म्हणणे आहे. याकडे जातीने लक्ष घालण्याचा प्रामाणिक प्रयत्न माझ्यातर्फे करण्यात येईल. 162 जागा भरणे अपरिहार्य आहे काय ? त्या का भरल्या गेल्या नाहीत ? तेथे एकूण मंजूर पदे किती आहेत ? याबाबतची माहिती निश्चितपणाने घेण्यात येईल व त्या रिक्त जागा नियमानुसार भरल्या नसतील तर त्या भरण्यासंबंधीची कार्यवाही देखील करण्यात येईल. मराठीतून उर्दू आणि उर्दूतून मराठी संबंधीचा मुख्याध्यापकांचा जो प्रश्न आहे तो सोडविण्यासाठी प्रयत्न केला जाईल.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापति महोदय, हमारे सदन की सम्माननीय मोहतरमा श्रीमती फौजिया खान ने उर्दू स्कूलों की शिक्षा की समस्याओं के बारे में इस सदन में बुनियादी चर्चा उपस्थित की है. अब चूंकि उन्होंने उर्दू शिक्षा के बारे में चर्चा उपस्थित की है इसलिए मैं भी उर्दू भाषा में बोलना मुनासिब समझता हूं. उन्होंने शिक्षा के संबंध में जो सवाल यहां उपस्थित किए हैं, उससे मैं सहमत हूं. मंत्री महोदय ने प्रस्तुत किए गए सवालों के संबंध में जो आश्वासन दिया है, उसके लिए मैं मंत्री महोदय को धन्यवाद देता हूं. लेकिन यह जो स्थिति है, उसके संबंध में मेरा पहला सवाल यह है कि उर्दू स्कूलों के संबंध में भेदभाव की स्थिति समाप्त करने के लिए कितना समय लगेगा. ? दूसरा सवाल मेरा यह है कि उर्दू भाषिक अवाम के अनुपात में उनके लिए शिक्षा का इंतजाम होगा या नहीं ? माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान ने यह सवाल उठाया है कि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ में बी.एड. करने की व्यवस्था नहीं है. चूंकि इस सवाल का जवाब माननीय मंत्री जी नहीं दे सकते हैं, क्योंकि वे इस बारे में कुछ नहीं कर पायेंगे. लेकिन मैं यशवंतराव चव्हाण विद्यापीठ के बोर्ड ऑफ मैनेजमेंट का सदस्य हूं इसलिए मैं निश्चित रुप से यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ में बी.एड. पाठयक्रम को शुरु करने के बारे में कोशिश करुंगा. मैं माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान को धन्यवाद देता हूं कि उन्होंने इस प्रश्न के बारे में हमारा ध्यान आकर्षित किया.

प्रा.वसंत पुरके : भेदभाव हा कधीही न संपणारा प्रश्न आहे. 750 वर्षांपूर्वी संतांनी म्हटले होते की, " साधु की जात मत पूछिए, पूछिए उनका ज्ञान ". मी आपल्याला सांगू इच्छितो की, जगाच्या पाठीवर भारत हा एकच असा देश आहे की, दुनियेतील कोणताही माणूस आला तरी त्याला उदार अंत:करणाने सामावून घेतले जाते. "सबके लिए खुला है मंदिर ये हमारा." त्यामुळे सन्माननीय कवाडे सरांनी सांगितल्यानुसार निश्चितपणाने त्यासंदर्भात प्रयत्न केले जातील. तसेच त्यांनी यशवंतराव चव्हाण विद्यापीठामध्ये ऊर्दू माध्यमाचा बी.एड.अभ्यासक्रम असावा अशी मागणी केली. आहे. हे खरे आहे की, यशवंतराव चव्हाण विद्यापीठामध्ये बी.एड.चा मराठी माध्यमाचा अभ्यासक्रम आहे. या ठिकाणी सन्माननीय सुरेश शेट्टी उपस्थित आहेत. त्यांनी या दृष्टिकोनातून पुढील कार्यवाही केली तर योग्य होईल असे मला वाटते.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नतिकोद्दीन खतिब :सभापति महोदय, मैं माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान को धन्यवाद देना चाहती हूं कि उन्होंने इस सदन में उर्दू स्कूलों की शिक्षा की समस्याओं के बारे में यहां पर चर्चा उपस्थित की है. मेरी माननीय मंत्री जी से यह मांग है कि जिस प्रकार आदिवासी भाइयों की शिक्षा के लिए अनुदान दिया गया है उसी प्रकार से अल्पसंख्याकों की शिक्षा के लिए भी अनुदान दिया जाए. बिना अनुदान तत्व पर जिन स्कूलों को मान्यता दी गई है, उन्हें तत्काल अनुदान दिया जाए तथा अतिरिक्त सेक्शन को जहां मान्यता दी गई है,उनको भी तत्काल अनुदान दिया जाए. दूसरा मेरा यह सवाल है कि, बालापुर में एक डी.एड. कॉलेज है. इस कॉलेज में अभी तक पूरा स्टाफ नहीं है. जिसकी वजह से बच्चों का पढ़ाई में नुकसान हो रहा है. इसलिए मेरी यह मांग है कि इसके लिए कालबध्द कार्यक्रम तय करके तत्काल रिक्त पद भरे जाए ताकि अल्पसंख्याक बच्चों को पढ़ाई में कोई दिक्कत न आए.

नंतर श्री.कांबळे....

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांच्या अर्धा तास चर्चेमध्ये देखील हाच महत्वाचा मुद्दा होता आणि या अर्धा तास चर्चेमध्ये देखील क्रिम क्वेशन कोणता असेल तर तो हाच आहे की, आदिवासी परिसरातील शाळांना ज्याप्रमाणे आपण अनुदान तत्व स्वीकारले, त्याप्रमाणेच ते तत्व शिक्षण विभागासाठीही स्वीकारण्यात येईल का ? सभापती महोदय, आम्ही हा प्रस्ताव कॅबिनेटपुढे सादर करुन त्यांना यासंबंधी कन्व्हिन्स करण्याचा प्रयत्न करु.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वैद्यकीय शिक्षणाचा खालावत जाणारा दर्जा व रुग्णांची होणारी हेळसांड.

मु.शी.: वैद्यकीय शिक्षणाचा खालावत जाणारा दर्जा व रुग्णांची होणारी हेळसांड यासंबंधी डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. दीपक सावंत (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो :-

" राज्यात एम. बी. बी. एस नंतर पदव्युत्तर पदविकांसाठी व डिप्लोमॅट ऑफ नॅशनल बोर्ड (दिल्ली) सी. पी. एस तर्फे अनेक कोर्सेसना देण्यात आलेली मान्यता, अनेक खाजगी रुग्णालयातून देण्यात येणाऱ्या दोन वर्षांच्या पदविका व डी. एन. बी. साठी एम. सी. आय तर्फे दिली जाणारी मान्यता, त्यामुळे राज्यातील पदव्युत्तर पदवी धारकांशी सदर पदविका धारकांची होत असलेली तीव्र स्पर्धा, शिक्षणाचा खालावत जाणारा दर्जा व रुग्णांची होणारी हेळसांड, वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर पदवीधारकांमध्ये असलेली अस्वस्थता, यावर शासनाचे नियंत्रण नसणे, शासनाचे याबाबत कोणतेही धोरण नसल्याची कबुली देण्यात येणे, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना. "

सभापती महोदय, एम.बी.बी.एस. नंतर काय ? असा एम.बी.बी.एस. झाल्यानंतर डॉक्टरांपुढे प्रश्न उपस्थित होत असतो. त्यातील काही लोक प्रॅक्टिस करतात तर काही लोक पोस्ट ग्रॅज्युएशन करतात. पण महाराष्ट्र राज्यामध्ये पोस्ट ग्रॅज्युएशनशिवायही अजुन दोन पर्याय उपलब्ध आहेत. त्यातील एक म्हणजे कॉलेज ऑफ फिजिशियन यांच्याकडून देण्यात येणारी सी.पी.एस.ची पदवी आणि दुसरे म्हणजे डी.एन.बी. - डिप्लोमॅट ऑफ नॅशनल बोर्ड जी दिल्लीची एक संस्था पदविका देते. अशाप्रकारे या त्या व्यतिरिक्त दोन पदविका आहेत. ज्या विद्यार्थ्यांना एम.डी.एम.एस.ला किंवा महाराष्ट्राच्या एम.एच.सी.ए.टी. मधून पोस्ट ग्रॅज्युएशनला किंवा प्रायव्हेट मेडिकल कॉलेजच्या पोस्ट ग्रॅज्युएशनच्या सी.ए.टी. मधून एम.डी.एम.एस.ला किंवा त्यांनी चालू केलेल्या डिप्लोमा कोर्सेसना ॲडमिशन मिळत नाही, ते विद्यार्थी अशाप्रकारच्या डी.एन.बी. किंवा सी.पी.एस. पदविका घेण्यासाठी ॲडमिशन घेतात. सन 1944 मध्ये कॉलेज ऑफ फिजिशिअन आणि सर्जन अस्तित्वात आले. त्यानंतर मध्यंतरीच्या काळात एम.सी.आय.ने सी.पी.एस.ची मान्यता काढून घेतली होती. एम.सी.आय.ने असे सांगितले होते की, सी.पी.एस.चे कोर्स महाराष्ट्रामध्ये

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

रन करायचे नाहीत. या संदर्भात आपण एक उदाहरण घेऊ या. पेडिॲट्रिकमध्ये जर एखाद्या विद्यार्थ्यांने डी.सी.एच. म्हणजे डिप्लोमा इन चाईल्ड हेल्थ हा कोर्स केला आणि एका विद्यार्थ्यांने एम.डी. पेडिॲट्रिक केले तर दोन्ही विद्यार्थी सारखीच प्रॅक्टिस करतात, सारखीच कन्सल्टींग करतात. त्याचप्रमाणे दोघेही तेवढीच फी आकारतात आणि त्यांच्या ट्रीटमेंटच्या कार्यकक्षा देखील तेवढ्याच असतात. सभापती महोदय, तीच गोष्ट सर्जरीची आहे. एखाद्या विद्यार्थ्याने जर सी.पी.एस.चा डिप्लोमा इन ऑर्थोपेडिक्स केलेले असेल किंवा ऑपथॅल्मालॉजीमध्ये डी.ओ.एम.एस. केले असेल तर ते दोघेही कॅट्रीक सर्जरी करतात आणि यामुळे वैद्यकीय व्यावसायिकांमध्ये तीव्र स्पर्धा निर्माण झालेली आहे. आम्ही चार वर्षे एवढे सगळे करुन सी.ई.टी.मध्ये रँक मिळवून आम्हाला पोस्ट ग्रॅज्युएशनला ॲडमिशन मिळते आणि सी.पी.एस.ची कुठेतरी एक पोस्ट करुन पुन्हा हे आमच्याबरोबर प्रॅक्टिस करतात, अशा प्रकारचा संदेह वैद्यकीय व्यावसयिकांमध्ये निर्माण झालेला आहे. ते एकमेकांशी तीव्र स्पर्धा करत आहेत आणि हे वैद्यकीय व्यावसायिकांच्या आणि शासनाच्या दृष्टीकोनातून देखील हानीकारक आहे. कारण शेवटी Practice should be for the good health. जर एखादा डॉक्टर एखादी शस्त्रक्रिया करण्यासाठी लायक नसेल तर त्याने ती जरुर करु नये. पण जर एखादा डॉक्टर लायक असेल तर त्याला कदाचित पेशंट मिळणार नाहीत आणि लायक नसणाऱ्याला पेशंट मिळतील, असे होऊ शकते. त्यामुळे हा वादंग वैद्यकीय व्यावसायिकांमध्ये निर्माण झालेला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे डिप्लोमॅट ऑफ नॅशनल बोर्ड. सभापती महोदय, डी.एन.बी. अशी पदवी आहे की जी एम.डी. च्या समकक्ष आहे, असे मानले जाते. परदेशातही या पदवीला खूप मागणी आहे. एखादा सी.पी.एस. झालेला विद्यार्थी परदेशात पटकन जाऊ शकणार नाही, एम.डी. झालेला विद्यार्थी जाऊ शकणार नाही. पण डी.एन.बी. झालेला विद्यार्थी परदेशात जाऊ शकतो, कारण ते एम.सी.आय. रेकगनाईज्ड आहे. आज एम.सी.आय., डी.एन.बी. सारख्या कोर्सेसना मान्यता देण्यात येते. आज महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी छोट्या छोट्या हॉस्पिटल्समध्ये डी.एन.बी.चे कोर्सेस सुरु आहेत, ही वस्तुस्थिती शासन नाकारु शकत नाही. महाराष्ट्रामध्ये डी.एन.बी. झालेले किती आहेत, सी.पी.ए. झालेले किती आहेत याचा आकडा कदाचित शासनाकडे नसेलही. पण जर त्यांच्याकडे हा आकडा असेल तर

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

त्यांनी जरुर मला द्यावा. हे डी.एन.बी. झालेले विद्यार्थी आज छोट्या छोट्या हॉस्पिलटमधून डी.एन.बी. ऑर्थोपेडिक्स म्हणून आहेत. डी.एन.बी. रिट्रोव्हटायनस सर्जरी अशा प्रकारच्या डिग्री घेऊन ज्यावेळी हे विद्यार्थी प्रॅक्टिसमध्ये उतरतील, त्यावेळी त्या हॉस्पिटलचा इनटेक किती आहे, तेथे किती पेशंट्सना पाहण्यात येते हे देखील पाहणे जरुरीचे आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे एम.सी.आय.च्या नियमाप्रमाणे जेथे एम.डी., एम.एस. सारखे पोस्ट ग्रॅज्युएट कोर्स सुरु आहेत, तेथे पॅरेलल कोर्सेस चालू ठेवण्यासाठी परवानगी नाही तरी देखील आपल्या हॉस्पिटल्समध्ये अशाप्रकारचे कोर्सेस सुरु आहेत. सभापती महोदय, अगदी गव्हर्नमेंट हॉस्पिटलमध्ये देखील असे कोर्सेस सुरु आहेत.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....
महानगरपालिकांच्या हॉस्पिटलमध्ये हे कोर्स चालू आहेत, प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये देखील हे कोर्स चालू आहेत. जर अशा प्रकारची शासन परवानगी देणार असेल तर मग एम.सी.आय.चे नॉर्म्स् कशासाठी आहेत ? या संदर्भात शासनातर्फे उत्तर देतांना मंत्री महोदय सांगतील की हा विषय आमच्या कक्षेमध्ये येत नाही. सी.पी.एस. ही प्रायव्हेट बॉडी आहे. Sir, C.P.S.is not a University. It is not a Medical Institution also. How they are giving Degrees to do medical practice? डॉ. आहेर साहेब ज्यावेळी आरोग्य मंत्री होते त्यावेळी त्यांनी हाच प्रश्न उपस्थित करुन यावर त्यांनी बंदी आणण्याचा प्रयत्न केला होता. एम.सी.आय.ला तशा प्रकारची परवागनी दिली होती. तरी देखील आज अव्याहतपणे सी.पी.एस. चे अनेक कोर्सेस सुरु आहेत. डिप्लोमॅट ऑफ नॅशनल बोर्ड तर्फे देखील एखाद्या सांगली कॉलेजमध्ये एखाद्या जाधव व्यक्तिचे एखादे सर्जरीचे कॉलेज आहे तेथे ऑर्थोपॅडिक डी.एन.बी.साठी ॲडमिशन मिळते. एखाद्या आय हॉस्पिटलमध्ये कोठे तरी दोन तीन स्पेशंट येत असतील तेथे व्हेटर रेटायनर सर्जन सुपर स्पेशालीटी करीत आहेत. येथे सगळे लागेबांधे आहेत, येथे लाखो रुपये डोनेशन घेतले जाते हा त्यातील मुख्य गाभा आहे. आज सी.पी.एस. ची ॲडमिशन घ्यावयाचे असेल तर 4 ते 5 लाख रुपये दिल्याशिवाय ॲडमिशन मिळत नाही. तेथे जागा मिळत नाही. डी.एन.बी. साठी 10 ते 12 लाख रुपये दिले जातात. तेलगीपेक्षा मोठा भ्रष्ट्राचार वैद्यकिय क्षेत्रामध्ये चाललेला आहे हे या चर्चेच्या माध्यमातून मला आज येथे सांगावयाचे आहे. या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, आज आपल्याकडे ग्रामीण भागामध्ये डॉक्टरांची कमतरता आहे. पदव्युत्तर पदविका धारक म्हणजे एम.बी.बी.एस. झाल्यानंतर पदविका केलेले त्या त्या विषयातील आपल्याकडे डॉक्टर नाहीत. शासनाने अशा प्रकारचे कोर्सेस जरुर ग्रामीण हॉस्पिटलमध्ये सुरु करावेत आणि लोकांना प्राधान्यांने ॲडमिशन देऊन त्या मुलांनी तेथेच एक वर्षे प्रॅक्टीस करावी असे बंधन त्यांच्यावर घालावे अशा प्रकारची कार्यवाही करावी अशी माझी पहिली सूचना आहे. माझी दुसरी सूचना अशी आहे की, शासनाने सी.पी.एस. कोर्सेच्या कॉलेजमध्ये एक मॉनिटरिंग कमिटी नेमावी. ज्या ज्या कॉलेजेसमध्ये कॉलेज ऑफ फिजिसिएन ॲन्ड सर्जन अशा जाहिराती करीत आहेत. त्या आपण तपासून पहाव्यात, आतापर्यंत ज्या लोकांनी ॲडमिशन घेतल्या आहेत, त्यांचे ठिक आहे, परंतु यापुढे जे ॲडमिशन घेतील त्यासाठी तेथील हॉस्पिटलचा दर्जा काय आहे, त्यांच्याकडे, एम.डी., एम.एस. सारखे

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...
पदव्युत्तर पदविचे कोर्सेस चालू आहेत किंवा नाहीत हे पाहावे.

तिसरी गोष्ट अशी आहे की, डिप्लोमॅट ऑफ नॅशनल बोर्डचे ज्यांनी ज्यांनी रजिष्ट्रेशन घेतलेले आहे. त्या हॉस्पिटला दर्जा आपण तपासून पहावा. मी आपल्याला सांगतो की निम्म्याहून अधिक कॉलेजेस आपणाला रद्द करावे लागतील. आपण याचे उत्तर द्याल की, त्यांना डायरेक्ट एम.सी.आय.ची परवानगी मिळते आम्ही काय करणार ? सभापती महोदय, मंत्री महोदय या राज्याच्या आरोग्याचे रक्षणकर्ते आहेत, आपण आरोग्य मंत्री, वैद्यकीय शिक्षणमंत्री आहात, या राज्यातील लोकांच्या आरोग्याची जबाबदारी आपली आहे, या राज्यातून जास्तीत जास्त चांगले डॉक्टर व्हावेत अशी आपली अपेक्षा असावयास पाहिजे. या मुंबई व महाराष्ट्रातून जो डॉक्टर बनून जातो त्याच्याकडे एका वेगळया नजरेने पाहिले जाते, ती परंपरा आपण कायम ठेवली पाहिजे. तसेच दुसरे म्हणजे 50 टक्के कोटयातून या राज्यात डॉक्टर होण्यासाठी परप्रांतातून लोक येतात. आज शासन त्यांच्यावर कोटयावधी रुपये खर्च करते. आपण सांगाल की आम्ही परवाच्या मार्डच्या बैठकीमध्ये याबाबत चर्चा केलेली आहे. परंतु आपण प्रत्येक विद्यार्थ्यामागे 4 लाख रुपये खर्च करतो. मार्ड ची मुले जी डॉक्टर आहेत ती येथे काम देखील करतात. पण ही डीग्री घेतल्यानंतर हे विद्यार्थी पुन्हा परराज्यात जातात, आणि तेथे प्रॅक्टीस करतात, त्याचा फायदा आपल्याला मिळत नाही. आज सुपर स्पेशालीटीमध्ये महाराष्ट्रातील हाताच्या बोटावर मोजण्याइतके स्थानिक डॉक्टर आहेत. सगळे डॉक्टर हे बाहेरुन आलेले आहेत त्यामध्ये कोणी कर्नाटक, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश येथून आलेले आहेत. हे प्रत्येक लोक आपआपल्या राज्यात जाऊन प्रॅक्टीस करतात. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, सदर विद्यार्थ्याकडे कमीत कमी 5 वर्षाचे महाराष्ट्राचे डोमेसाईल प्रमाणपत्र असावे. अशाच लोकांना तुम्ही ॲडमिशन द्यावी. सी.पी.एस. चे कोर्स चालू ठेवायचे की बंद करावयाचे हे आपण ठरवावे, याला एम.सी.आय. ने मान्यता दिलेली नव्हती. पुन्हा ते कसे चालू झालेले आहेत हे आपण पहावे. यावर एक मॉनिटरिंग बॉडी जरुर नेमावी. डिप्लोमॅट ऑफ नॅशनल बोर्ड चे कोर्स ज्या ज्या हॉस्पिटलमध्ये चालू आहेत त्यांचे आपण परीक्षण करावे. यामध्ये एक एक्सपर्ट ची टीम नेमावी. आणि यातून ज्या ज्या हॉस्पिटलचा दर्जा राखला जात नाही. अशा हॉस्पिटलची मान्यता काढून घेण्यासाठी एम.सी.आय.ला पत्र लिहावे, आणि एम.सी.आय.सी सुसंवाद साधून आपण याबाबतीत अतिशय कडक अशी स्टेज घ्यावी, अशी माझी या अर्धातास चर्चेच्या निमित्ताने विनंती आहे.

------ (यानंतर श्री. सांगळे...

अशोधित प्रत / प्रशिक्षणासाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने सी.पी.एस. आणि डी.एन.बी. या पदविका कोर्सेसबाबत मुद्दे उपस्थित केलेले आहेत. हे दोन्ही कोर्सेस महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणामध्ये नसल्याचे सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितलेले आहे. या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, सी.पी.एस. हा कोर्स कॉलेज ऑफ फिजिशिअन ॲड सर्जन ऑफ मुंबई कंडक्ट करते व डी.एन.बी. हा कोर्स डिप्लोमॅट ऑफ नॅशनल बोर्ड आणि नॅशनल बोर्ड ऑफ एक्झ ामिनेशन, मिनिस्टरी ऑफ हेल्थ, फॅमिली वेलफेअर, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया या दोन संस्था कंडक्ट करतात. या दोन्ही संस्थांचे रजिस्ट्रेशन आहे, ऑर्गनायझेशन आहे, त्यांचे लेड डाऊन रुल्स आहेत, लेड डाऊन प्रोसिजरस आहेत. They have their own laid down procedure and rules in relation to the Post Graduate Courses. या दोन्ही संस्थांद्वारे कोणत्या मेडिकल कॉलेजला हे कोर्सेस द्यायचे, किती सीटस् द्यावयाच्या याबाबतचे नियम ठरलेले आहेत. याबाबतचे असलेले सर्व नियम मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. तसेच सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी 2-3 मुद्दे उपस्थित केलेले आहेत. त्यापैकी त्यांनी ग्रामीण भागांतील कॉलेजांमध्ये डिप्लोमा कोर्सेस सुरु करीत असल्याचे सांगितले. परंतु सी.पी.एस. आणि डी.एन.बी. चे कोर्सेस सुरु करण्यासाठी नियम ठरलेले आहे हे मी यापूर्वीच सांगितलेले आहे. याबाबत जेवढे शिक्षक आहेत त्यानुसार किती विद्यार्थी असावेत याबाबतचा रेशो असणे आवश्यक आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाची भूमिका काय असू शकेल ? मी या संदर्भात आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांनी महाराष्ट्रातील सर्व खाजगी मेडिकल कॉलेजांमध्ये कोणत्या प्रकारच्या फॅसिलिटीज आहेत, याबाबत सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते. याबाबतची संपूर्ण तपासणी करुन त्याबाबतचा रिपोर्ट माननीय राज्यपालांकडे सादर करण्यात आला होता व त्याच्या प्रति एम.सी.ए. आणि भारत सरकारकडे पाठविल्या. त्यामुळे विशिष्ठ इन्स्टिटयुटसमध्ये जर फॅसिलिटीज उपलब्ध नाहीत असे आपल्याला वाटत असेल तर त्याबाबतची चौकशी करण्यासाठी डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशन यांना त्या ठिकाणी पाठवून तपासणी करण्यात येईल. नागपूर येथे सुपर स्पेशालिटीजमध्ये डी.एन.बी. चे कोर्सेस सुरु आहेत. तसेच लातूर, अकोला व धुळे जिल्हयांसाठी डी.एन.बी. च्या 10 सीटस् मिळण्याबाबतचा प्रस्ताव भारत सरकारकडे पाठविला आहे, त्या प्रस्तावास थोडया दिवसांनी मंजुरी मिळेल. सन्माननीय सदस्यांनी ज्या ठिकाणी पोस्ट ग्रॅज्युएटचे कोर्सेस आहेत तेथे डी.एन.बी.चे कोर्सेस करु शकत नाही असे सांगितले आहे. याबाबतीत मी सांगू इच्छितो की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MJS/ MAP/ KGS/ प्रथम श्री.विठ्ठल खर्चे 18:10

श्री.सुरेश शेट्टी ....

एम.सी.आय.चे मेडिकल कॉलजांसाठी बेसिक नॉर्म्स ठरविल्याबाबतचे एक परिपत्रक आमच्याकडे आले आहे. त्या नॉर्म्सद्वारे ज्या इन्स्टिटयुटसमध्ये जास्त फॅसिलिटीज उपलब्ध असतील तेथे डी.एन.बी.चे कोर्सेस सुरु करता येऊ शकतात असे त्यामध्ये नमूद केलेले आहे. यासाठी मुंबईमध्ये व नागपूर येथील ग्रँड मेडिकल कॉलेजांमध्ये डी.एन.बी. कोर्सेसच्या नवीन काही सीटस मंजूर करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

(यानंतर श्री.सुंबरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, त्या नंतर सन्माननीय सदस्यांनी जो मॉनेटरींगचा मुद्दा मांडला आहे त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपण म्हणता त्याप्रमाणे या संदर्भात मॉनिटरींग करणे हे राज्य सरकारचे काम आहे किंवा काय याबद्दल मी तरी साशंक आहे. कारण या संस्था एमसीआयच्या ...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण महाराष्ट्र राज्यात राहतो. आपण याचे कर भरतो. तेव्हा आपल्याला चांगली आरोग्य सेवा चांगल्या क्वालिफाईड डॉक्टरांकडून मिळावी अशी अपेक्षा करणे चुकीचे आहे काय ? आता या ठिकाणी माननीय राज्य मंत्री महोदय, याची जबाबदारी झटकत असतील तर ती शोकांतिकाच आहे. कायद्याने आपले हात बांधले असतील तर तसे त्यांनी स्पष्टपणे सांगावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी अगोदरसुद्धा सांगितले आहे की, आपण स्पेसिफिक संस्थांची नावे घेऊन आम्हाला सांगितले तर आम्ही तेथे चेकिंगची व्यवस्था आम्ही करू. परंतु जनरल मॉनिटरींगसाठी नवीन यंत्रणा तयार काही आपण करू शकत नाही. In this case, certain guide-lines have been fixed and these guide-lines are laid down for both the courses. तेव्हा कोणी संस्था या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करीत असतील तर आपण त्या संस्थांची मान्यता रद्द करू. मात्र त्यासाठी कोणत्या संस्था आपल्या सूचना पाळत नाहीत याबाबत स्पेसिफिकली सांगितले तर ते शक्य होऊ शकेल. But to monitor and regulate them will not be a possible task for the Government. दुसरा मुद्दा आपण डोमिसीलचा येथे उपस्थित केला. जे पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्सेस आहेत .., सभापती महोदय, मला आठवते आहे की, आपण गेल्या दोन तीन वर्षापूर्वी या संबंधात एक विधेयक पास केले होते आणि त्यामध्ये असा कोटा राहू नये या दृष्टीने तरतूद केली आहे. That has been made null and void because the Medical Council of India and the Government of India are insisting that 50 per cent of the quota for Post Graduate students have to be kept for all India level. I think, for Post Graduation, five years domicile condition, we can not insist. But, still if the hon. Member say that for super specialty courses five years condition should be there, we will examine the matter; and we will get back to you.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Dr.M.A.Aziz: Mr. Panel Chairman, Sir, as far as the Medical Education is concerned, hon. Member, Dr. Deepak Sawant has raised a very important discussion on the floor of the House today. Sir, just now, the Hon. Minister of State for Medical Education has stated that C.P.S. is a private Organization.

Shri Suresh Shetty: No. It is not a private Organization.

Dr. Deepak Sawant: Sir, it is a private Institution.

Shri Suresh Shetty: Sir, it is an independent Institution.

The Panel CHAIRMAN: Dr. M.A.Aziz please put your question.

Dr. M.A. Aziz: Sir, the Hon. Minister of State for Medical Education has rightly said that the State Government has no control over such Organizations. I would like to put a question to the Hon. Minister. My question is that if the Government has no any sort of control over these Organizations, then how can they send their students to our Government Medical Colleges and what is a criteria for it? Sir, there is a thinking that they all dictate terms to the Government and due to this reason Government Institutions and our Medical Colleges accept their students for Post Graduate Courses. Sir, C.P.S. is a private body and earlier it was dominated by the people like Dr.Udani and all that.

The Panel CHAIRMAN: Please, put your question, Dr. Aziz, what is your question?

Dr.M.A.Aziz: Sir, as I said earlier, they send their students to our Medical Colleges and even to the Government Medical Colleges for Post Graduation. Sir, I would like to know that on what basis they send their students? And what is the number of students then can send to our Colleges?

3.....

Dr.M.A.Aziz contd.

There are teachers for the Post Graduate Courses in the Institutions and as per those teachers, students have been sent to the Government Medical Colleges for Post Graduations. If it is a private Institution or Organization, how can they send their students to our Medical Colleges?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Shri Suresh Shetty: Sir, C.P.S. is not a private body as such. It is up to the individual colleges to take the students for Post Graduation Courses. Nobody can force to do anything or C.P.S. can not force to take their students for such courses in the Government Medical Colleges or Private Medical Colleges. But, an option is there to start these courses in their Medical Colleges. It may be a Private Medical College or a Government Medical college and they can opt for these Diploma Courses. Sir, why we have opted this system in certain Medical Colleges? We have opted it because it is advantageous to both i.e., to the Medical Colleges and the student fraternity. We are giving an opportunity to the students, who have completed M.B.B.S. to do a Diploma Course or a Post Graduation Course. At the same time, the Government Medical Colleges or Private Medical Colleges get the additional experienced hands of a few more Doctors to help us in running the Hospitals more smoothly and provide better services to the people of those respective areas. That is a main thing behind it. It mutually benefits the student community, as well as, the Medical Colleges, Medical Institutions or the Hospital. For example, if there are 10 C.P.S. students in a particular Medical College, they are supposed to do six months Housemanship or work as a Resident Doctor in that College. So, the experience of theses Doctors is used in the O.P.D. or in the Wards of the Medical Colleges and thus it is mutually beneficial for the students and the Medical Colleges also.

Contd. on S3-1

अशुधारित प्रति / अशुद्धियाँ नहीं

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, एम.सी.आय. ने सी.पी.एस. च्या कोर्सेसची मान्यता 1999 मध्ये काढून घेतली. गेली सहा वर्षे हे सी.पी.एस. चे कोर्सेस अजूनही चालू आहेत. तेव्हा हे कोर्सेस अधिकृत आहेत की अनधिकृत आहेत याबाबत शासनाचे नेमके धोरण काय आहे?

श्री. सुरेश शेट्टी : एम.सी.आय. ची मान्यता सी.पी.एस. च्या गायनॉकॉलॉजी, पेडियाट्रीक व ॲथ्थॉल्मॉलॉजी या विषयांना आहे. अशाप्रकारच्या तीन-चार विषयांना एम.सी.आय. ने परवानगी दिली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सीपी.एस. बंद ठेवा किंवा चालू ठेवा. मला वाटते मंत्रिमहोदयांनी या सी.पी.एस. मध्ये स्वत: लक्ष घालून सर्व कॉलेजेसचा आढावा घ्यावा. याबाबत मी सर्व्हे करण्यापेक्षा आपल्याकडे असलेल्या यंत्रणेमार्फत सर्व्हे करावा. दुसरा महत्वाचा मुद्दा असा की, आपल्याला ग्रामीण भागात डॉक्टर मिळत नाहीत, पोस्ट ग्रॅज्युएट मिळत नाहीत. आपल्या राज्याच्या दृष्टीने ही एक अचिव्हमेंट होईल की, आपण कुपोषणाच्या व अनेक आरोग्याच्या प्रश्नावर लढत आहात. त्याप्रमाणे आपण शासनातर्फे ग्रामीण भागामध्ये असे कोर्स चालू केले व त्यांना एक वर्षाची सक्तीची इंटर्नशीप त्या भागामध्ये दिली तर निश्चितपणे आपण बेनिफिशल रहाणार आहात. तसे धोरण आपण राबविणार काय?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारचे जितके मेडिकल कॉलेज आहेत त्या ठिकाणी सी.पी.एस. आणि डी.एन.बी. कोर्सेस करु शकतात कां? ज्या ठिकाणी शक्य असेल त्या ठिकाणी ते सुरु करु शकतात. महाराष्ट्रामध्ये 87 खाजगी संस्था आहेत त्याठिक्राणी सी.पी.एस. कोर्सेस चालविले जातात. तसेख्, ज्या संस्थांच्या हॉस्पिटलमध्ये त्यांना हे अतिरिक्त कोर्सेस सुरु करावयाचे असतील तर त्या संस्था डायरेक्टली एम.सी.आय. कडे अर्ज करु शकतात. त्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या परवानगीची गरज नाही. ते डायरेक्टली सी.पी.एस.च्या कोर्सेससाठी मान्यता घेऊ शकतात. तुमच्याकडे कुणी अशाप्रकारचे सी.पी.एस. कोर्सेस सुरु करु पहात असतील तर शासन म्हणून त्यांना मदत करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना शासनाची आर्थिक मदत न मिळणे

मु.शी.: राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना शासनाची आर्थिक मदत न मिळणे यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील विना अनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळत नसल्याने शासकीय आदेशांचे व नियमावलीचे उल्लंघन होत असून शिक्षक शिक्षकेत्तरांची पिळवणूक व शोषण होत आहे. शासनाचा या शाळांवर अंकुश नसल्याने या शाळांमधून शिक्षणाचे व्यापारीकरण झाले आहे. पालकांकडून प्रचंड पैसा जमा करुन त्याचा विनियोग खाजगी स्वरुपात होत आहे. शासनाकडून आंकेक्षण होत नसल्याने गैरव्यवहार होत आहेत, शिक्षकांना पूर्ण वेतन व सवलती दिल्या जात नाहीत, तसेच शासनाकडून वार्षिक तपासणीही होत नाही, त्यामुळे याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रातील अनेक विषयांवर सदनामध्ये चर्चा झाली आहे. या चर्चेनंतर "आपल्या मागणीचा विचार करुन त्या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊ, चर्चा करु" अशाप्रकारची आश्वासने शासनाकडून आम्हाला मिळतात. या चर्चेच्या माध्यमातून मंत्रिमहोदयांकडून मला ठोस आश्वासन पाहिजे. ज्या आर्थिक मागण्यांच्या संदर्भात मी मुद्दे मांडणार आहे त्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत नंतर विचार केला तरी चालेल. परंतु जी प्रशासकीय बाब आहे त्यामध्ये शासनावर एक नव्या पैशाचाही आर्थिक बोजा पडणार नाही. केवळ या प्रश्नाच्या अनुषंगाने प्रशासकीय निर्णयाची अंमलबजावणी करण्यासंबंधी जरी आपण गांभीर्याने लक्ष घातले तरी या चर्चेमधून काही तरी चांगले निष्पन्न होवू शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरु.....

सभापती महोदय, आज महाराष्ट्र राज्यामध्ये अनुदानित, विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित शाळा सुरु आहेत. यापूर्वी महाराष्ट्रामध्ये विना अनुदानित, कायम विना अनुदानित अशाप्रकारच्या शाळा नव्हत्या. परंतु महाराष्ट्रातील बरेचसे विद्यार्थ्यी उच्च शिक्षणासाठी - अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षण असो ते शिक्षण घेण्यासाठी आंध्र प्रदेश आणि कर्नाटकमध्ये जात होते. आपल्या राज्यातील पैसा त्या राज्यात जात होता. त्यावेळचे मुख्यमंत्री कै. वसंतदादा पाटील यांनी राज्याबाहेर जाणारा पैसा आपल्या राज्यात यावा यासाठी विना अनुदान तत्वावर मेडिकल कॉलेजेस, अभियांत्रिकी कॉलेजेस, डी.एड,.बी.एड. कॉलेजेस सुरु केली. त्याचप्रमाणे आता शासनाने हे धोरण उच्च शिक्षणपुरतेच मर्यादित न ठेवता प्राथमिक शाळा, उच्च मध्यमिक शाळा विना अनुदान तत्वावर काढण्यासाठी मान्यता दिली आणि त्या शाळा सुरु झाल्या. विशिष्ट कालावधीनंतर त्या शाळांना टप्प्याटप्प्याने अनुदान दिले जात होते. चौथ्या वर्षानंतर 25 टक्के, नंतर 50 टक्के, नंतर 75 टक्के आणि त्याच्या पुढच्या वर्षी 100 टक्के अशाप्रकार शाळा अनुदानावर शाळा येत होत्या. त्यानंतर आता शासनाने या टप्प्यामध्ये बदल करुन 20, 40, 60,80 आणि 100 टक्के असा टप्पा करुन 10 वर्षांमध्ये 100 टक्के अनुदानावर शाळा आणलेल्या आहेत. शासनाने अनुदानित शाळा, विना अनुदानित शाळा आणि कायम विना अनुदानित शाळा अशा तीन प्रकारामध्ये शैक्षणिक संस्था महाराष्ट्रामध्ये सुरु केलेल्या आहेत.

सभापती महोदय, शासन एवढ्यावरच थांबलेले नाही तर अनुदानित शाळामध्ये नाही तुकड्या विना अनुदानित आणि नाही तुकड्या कायम विना अनुदानित तत्वावर सुरु केलेल्या आहेत. हा शासनाने विचित्र निर्णय घेतलेला आहे. यामधून वेगवेगळ्या प्रकारचे गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत. अनुदानित शाळा असो किंवा विना अनुदानित शाळा असो, त्या ठिकाणी आतापर्यंत शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे कायद्याने संरक्षण नव्हते. सभागृहामध्ये लोकप्रतिनिधींनी भांडून भांडून 1977 चा कायदा आणि 1981 चे नियम लागू करण्यास शासनाला भाग पाडले. 1977 च्या कायद्यामध्ये म्हटलेले आहे की, " (1) या अधिनियमाच्या तरतुदी महाराष्ट्र राज्यातील सर्व खाजगी शाळांना लागू होतील. मात्र त्यांना राज्य शासनाकडून कोणतेही सहायक अनुदान मिळत असो किंवा नसो." शासन 77 च्या आणि 1981 च्या नियमावलीमधील तरतुदी या अनुदानित शाळांना लागू केलेल्या आहेत, परंतु विना अनुदानित, कायम विना अनुदानित शाळांना या नियमावलीपासून मोकळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.रामनाथ मोते (पुढे चालू....

सोडलेले आहे. याचा □मीर परि□ाम वि□ा अ□ुदा□ित, □ायम वि□ा अ□ुदा□ित शाळांमधील शि□□ावर झालेला आहे. 1981 च्या □ि□मावलीमध्ये म्हटलेले आहे □ी, □ाजगी शाळा जरी वि□ा अ□ुदा□ित असल्या तरीसुध्दा अ□ुदा□ित शाळेतील □र्मचाऱ्यांएवढे वेत□ त्यां□ा दिले पाहिजे. तसेच शि□□ेत्तर □र्मचाऱ्यां□ा वेत□ देण्याची जबाबदारी संस्था चाल□ांची आहे. परंतु तेवढे त्यां□ा वेत□ मिळत □ाही. शास□ त्या□ेडे ल□ देत □ाही. सर्वात महत्वाची □मीर बाब म्ह□जे अ□ुदा□ित शाळां□ा शास□ा□ेडू□ अ□ुदा□ देत असतां□ा विद्यार्थी सं□्या □ि□ती आहे, त्या आधारावर तु□ड्यांची सं□्या मंजूर □ेली जाते, संच मा□्यता ही □ि□ती विद्यार्थी आहेत त्यावर दिली जाते. परंतु या संबंधा□ वि□ा अ□ुदा□ित आ□ि □ायम वि□ा अ□ुदा□ित शाळांच्या बाबतीत शास□ाचे □ेहीच धोर□ □ाही. त्यांच्यावर शास□ाचा □ोत्याही प्र□ारचा अं□ुश □ाही. त्यामुळे संस्था चाल□ां□ा आपल्या मर्जीप्रमा□े शि□□ □मण्याची संधी दिलेली आहे. □ोत्याही प्र□ारची तपास□ी त्या ठि□ा□ी होत □ाही. संचास मा□्यता घेतली जात □ाही, तसेच शि□□ांची वैयक्ति□ मा□्यता घेतली जात □ाही.

या□ि□र श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

आणि मग ज्यावेळी ही शाळा टप्प्याटप्प्याने अनुदानावर येते त्यावेळी तेथील शिक्षकांच्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत. यासंदर्भात मी शेवटी जो प्रश्न विचारणार आहे त्यासंदर्भात शासनाकडून ठोस निर्णय झाला पाहिजे. वैयक्तिक मान्यता सुध्दा घेतली जात नाही त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होत आहेत. तुकड्यांच्या निकषाबाबत सांगावयाचे तर 70 विद्यार्थ्यांपर्यंत 1 तुकडी आणि विद्यार्थीसंख्या 71 झाली तर दोन तुकड्या मिळतात. विनाअनुदानित शाळांमध्ये 70 विद्यार्थ्यांच्या दोन दोन तुकड्या आहेत. ते म्हणतात की, आम्ही शासनाचे अनुदान घेत नाही मग शासनाचे तुकड्यांच्या बाबतीतील विद्यार्थीसंख्येचे निकष कशासाठी पाळावयाचे ? रायगड जिल्हयामध्ये रसायनी येथे कंपनीची विनाअनुदानित शाळा आहे. कंपनी आमच्या शाळेला पैसे देते त्यामुळे आम्ही शासनाचे निकष पाळणार नाही असे ते म्हणतात. आम्ही आमच्या कंपनीच्या पालकांच्या पाल्यांसाठी शाळा सुरु केली आहे. बाहेरच्या पाल्यांना आम्ही प्रवेश देत नाही असे ते म्हणतात. चांगले शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी तेथे 35-40 विद्यार्थ्यांच्या तुकड्या केल्या. आता आर्थिक बोजा पडावयास लागल्याबरोबर त्यांनी त्या तुकड्या कमी केल्या. आज तेथील 57 शिक्षक बाहेर पडले. त्या 57 शिक्षकांना आज संरक्षण नाही. त्या शिक्षकांना मान्यता सुध्दा घेतलेली नाही. त्यांच्याकडील तुकड्यांची मान्यता घेतलेली नाही. केवळ संच मान्यता न घेतल्यामुळे, तुकड्यांना मान्यता न घेतल्यामुळे, शिक्षकांची वैयक्तिक मान्यता न घेतल्यामुळे त्या शिक्षकांचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. यासंदर्भात शासनाने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये ज्या विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळा आहेत त्यांच्या गुणवत्तेकडे आपण लक्ष देणे गरजेचे आहे. एकाही शाळेमध्ये क्वालिफाईड मुख्याध्यापक आहे काय ते पहावे. त्या ठिकाणी दरवर्षी मुख्याध्यापक बदलतात. आमच्या ठाणे जिल्ह्यात एक चांगली प्रथा सुरु केली होती. ज्या शाळेचे विद्यार्थी एस.एस.सी. बोर्डाला जातात, शालांत परीक्षा देतात त्यावेळी शालांत परीक्षेचे फॉर्म स्वीकारताना संच मान्यता आहे काय, शिक्षकांची मान्यता आहे काय, मुख्याध्यापकाला डिपार्टमेंटची मान्यता आहे काय हे पाहिले जात होते. अनेक लोकांनी त्याबाबत ऑब्जेक्शन घेतले. शासनाने त्यांना सहकार्य केल्यामुळे ही पध्दत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

बंद झाली. या पध्दतीने खरोखरच जर पडताळणी झाली असती तर शिक्षकाची मान्यता नसलेले, मुख्याध्यापकाची मान्यता नसलेले फॉर्म त्या ठिकाणी गेले नसते आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये त्या संस्थेला शिक्षकांची आणि मुख्याध्यापकाची मान्यता घ्यावी लागली असती आणि त्या ठिकाणी काही तरी सुधारणा झाली असती. त्याकडे शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

सभापती महोदय, मी अतिशय महत्वाचा प्रश्न मांडत आहे त्यामुळे आपण मला वेळ द्यावा. ज्या विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळा आहेत त्या शाळा पालकांकडून फार मोठ्या प्रमाणावर पैसे गोळा करतात. त्याचे कोणत्याही प्रकारचे ऑडीट होत नाही. मी सुरुवातीलाच उल्लेख केला. 1977 चा कायदा जर या शाळांना लागू होऊ शकतो, 1981 ची नियमावली जर त्यांना लागू होऊ शकते, जर त्यांना शासनाने मान्यता दिलेली आहे तर ते किती पैसे गोळा करतात, पालकांकडून किती पैसे गोळा करतात, कोणकोणत्या मार्गाने पैसे गोळा करतात याचा हिशेब ठेवलेला आहे काय ? शिक्षकांना पूर्ण पगार देत आहेत काय ? किती पैसे जमा झाले ? किती पैसे खर्च झाले ? मेन्टेनन्सवर किती पैसे खर्च झाले ? शाळेसाठी किती पैसे खर्च झाले ? अन्य कामासाठी किती खर्च झाले ? शाळेच्या गुणवत्तावाढीसाठी किती खर्च झाले ? शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना सोयीसवलती पुरवण्यासाठी, लायब्ररीसाठी, लेबॉरटरीसाठी किती खर्च झाला ? हे सर्व पाहण्याची शासनाची जबाबदारी नाही काय ? सभापती महोदय, हे शासनाने पाहणे आवश्यक आहे. आमचे डिपार्टमेंट असे म्हणते की, ही आमची जबाबदारी नाही. संस्था असे म्हणातात की, आमच्याकडे कसे इन्स्पेक्शनला येतात ते पाहतो. सभापती महोदय, या विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांचे सुध्दा ऑडीट होणे आवश्यक आहे. ठाणे जिल्ह्यातील सेंट झेवियर्स शाळेचे उदाहरण महत्वाचे आहे. त्या ठिकाणी कोट्वधी रुपये जमा केले. संस्था चालकांनी शिक्षकांना मारण्यासाठी पिस्तुल घेतले. शाळेच्या पैशातून, विद्यार्थ्यांच्या पैशातून गाड्या घेतल्या. शिक्षकांना मात्र पगार मिळत नाही. शासन हतबल झाले आहे. शासन काही करु शकत नाही. मग आमच्या 1977 च्या कायद्याचा आणि 1981 च्या नियमावलीचा काय उपयोग आहे ? याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. या शाळांचे इन्स्पेक्शन वेळेवर होत नाही. डिपार्टमेंट असे म्हणते की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. रामनाथ मोते .....

आमच्याकडे मॅनपॉवर नाही. आमच्याकडे 200 शाळांच्या ऐवजी 1200 शाळा झाल्या, आमच्याकडे मॅनपॉवर नाही मग आम्ही इन्स्पेक्शन कसे करणार असे ते म्हणतात. आम्हाला दररोज 4 शाळा तपासाव्यात असे वाटते पण ते आम्ही करु शकत नाही. आम्हाला या शाळा तपासण्यासाठी वेळ मिळत नाही. शासनाने यासंदर्भात गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. या शाळांचे इन्स्पेक्शन करणे गरजेचे आहे. त्याशिवाय या शाळा सुधारणार नाहीत. सभापती महोदय, यामुळे अनेक आर्थिक अडचणी निर्माण झालेल्या आहेत. आज महाराष्ट्रामध्ये विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानितच्या बाबतीत काय तत्व आहे हेच समजत नाही. त्यामध्ये कोणते प्रिन्सीपल्स आहेत ? त्यामध्ये कोणतेही प्रिन्सीपल्स नाहीत. पण कायम विनाअनुदानित आणि विनाअनुदानितचे जे काही धोरण शासनाने स्वीकारलेले आहे त्या शासकीय धोरणामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये व्यापारीकरण आलेले आहे. त्याचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते पुढे सुरु...)

गुणवत्तेच्या आधारे तुकडयांचे विभाजन करु नये अशा त-हेचे परिपत्रक शासनाने काढलेले आहे. एका बाजूला गुणवत्तेच्या आधारे विभाजन करायचे नाही असे आपण म्हणता मग ज्या विनाअनुदानित तुकड्या आहेत त्यांच्या बाबतीत काय करायचे ? ज्युनिअर कॉलेजेसच्या अशा समस्या आहेत की, त्यांच्या तीन तुकड्या अनुदानित, दोन तुकडया विनाअनुदानित किंवा कायम विनाअनुदानित आहेत. या तुकड्यामध्ये गुणवत्तेवर प्रवेश देताना पहिल्या तीन तुकड्यामध्ये गुणवत्तेनुसारच प्रवेश दिला जातो आणि कमी गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांना विनाअनुदानित तुकड्यांमध्ये प्रवेश दिला जातो. म्हणजे हे विभाजन तुमच्या नियमामुळे झालेले आहे. दोन तुकड्या अनुदानित आणि तीन तुकड्या विनाअनुदानित. अशा प्रकारचे विभाजन, अशा प्रकारची विषमता आज प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये सुध्दा आहे. माननीय सदस्य प्रा. फौजिया खान यांनी सर्वशिक्षा अभियानाचा मुद्दा या सभागृहामध्ये मांडलेला आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, एकाच शाळेमध्ये अनुदानित वर्ग आणि कायम विनाअनुदानित वर्ग असे दोन-दोन वर्ग भरत आहेत. त्यामुळे अनुदानित वर्गातील विद्यार्थ्यांना खिचडी मिळते आणि विनाअनुदानित वर्गातील विद्यार्थी त्यांच्या तोंडाकडे पहात बसतात. ही विषमता नाही काय ? या संदर्भात देखील शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे. एकाच शाळेत अशा कायम विनाअनुदानित आणि अनुदानित तुकड्या आपण देणार आहात काय ? शासनाने 1ली ते 7वी पर्यन्तच्या वर्गाना मान्यता दिली. पण अनुदान मात्र 1ली ते 4थीच्या वर्गाना दिले. 5वी ते 7वीच्या वर्गांना अनुदान दिले नाही. शासनाने 5वी ते 10वी पर्यन्तच्या वर्गाना मान्यता दिली. पण अनुदान 8वी ते 10वीच्या वर्गांना दिले. 5वी ते 7वीच्या वर्गांना अनुदान दिले नाही. अशा वेळी 5वी ते 7वीच्या वर्गांना शिकविणा-या शिक्षकांनी काय करायचे ? विद्यार्थ्यांनी काय करायचे ? आज पाच-सहा वर्षे या शिक्षकांचे अनुदान मिळत नाही. हीच विनाअनुदानित शाळा जेव्हा टप्प्याटप्प्याने अनुदानावर येते किंवा या कायम अनुदानित शाळेतील शिक्षक नोकरी सोडून दुस-या शाळेमध्ये जातो, त्याची मान्यता घेतलेली नसते... खरे म्हणजे त्याने कोणत्याही शाळेमध्ये केलेली सेवा ही शेवटी निवृत्तीसाठी ग्राह्य धरली जाते. शिक्षकाची मान्यता नसेल, संच मान्यता नसेल, वैयक्तिक मान्यता नसेल तर त्या शिक्षकाच्या सेवेचा काहीही उपयोग होणार नाही. त्याची सगळी सेवा पाण्यामध्ये जाणार आहे. सभापती मी शेवटी माननीय मंत्री महोदयांना काही प्रश्न विचारणार आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, आपण अशा प्रकारे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते पुढे सुरु...)

महाराष्ट्रामध्ये कायम विनाअनुदानित धोरण प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांसाठी रद्द करणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्रातील शिक्षण सेवक योजना, जी आपण विनाअनुदानित शाळांसाठी सुरु केलेली आहे, ती रद्द करणार काय ? माझा तिसरा प्रश्न सर्वात महत्वाचा आहे. या प्रश्नाच्या संदर्भात, तुम्हाला देता येत नसेल तर नाही म्हणून सांगा, तुम्ही करु शकत नसाल तर नाही म्हणून सांगा, मी आपले म्हणणे मान्य करीन. परंतु कृपा करुन आम्हाला असत्य आश्वासन देऊ नका. आम्हाला आशेवर ठेवू नका तर, हे आपण करणार आहात की नाही यासंबंधीचे निश्चित स्वरुपाचे आश्वासन आम्हाला द्या. संच मान्यता, वैयक्तिक मान्यता, तुकडी मान्यता आणि या शाळांना अनुदानित शाळांप्रमाणे तुमच्या ऑडिटच्या, अंकेक्षणाच्या चौकटीमध्ये आणणार आहात काय ? शासन या विनानुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांवरती अनुदानित शाळांसारखाच अंकुश ठेवणार आहात काय ? त्यांचे अंकेक्षण आपण करणार आहात काय ? अशा प्रकारच्या ज्या विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळा शासनाचे अनुदान घेत नसल्यामुळे शासनाच्या कोणत्याही आदेशाचे, शिक्षणाधिका-यांच्या आदेशाचे, शिक्षण उपसंचालकांच्या आदेशाचे पालन करीत नाहीत अशा शाळांवर आपण काय कारवाई करणार आहात ? शासनाच्या आदेशांचे पालन न करणा-या शाळांची मान्यता इन्स्पेक्शन करुन तातडीने रद्द करणार काय ? एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी काही महत्वाच्या प्रश्नांना हात घातला. या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने दोन-तीन मुद्दे समोर आलेले आहेत. अनुदान, विनाअनुदान आणि कायम विनाअनुदान तत्वावर महाराष्ट्रामध्ये ज्या शाळा सुरु झाल्या त्यामध्ये कायम विनाअनुदानित तत्वावर चालणा-या शाळांच्या बाबतीत त्यांनी विशेष जोर दिलेला आहे. या कायम विनाअनुदानित तत्वावर चालणा-या शाळांतील शालेय व्यवस्थापन, शिक्षकांच्या होणा-या नियुक्त्या, संच मान्यता, वैयक्तिक मान्यता आणि त्यानंतर त्यांना मिळणारे ॲप्रुव्हल आणि त्याही पेक्षा त्यांच्यावर होणारा अन्याय या दृष्टीकोनातून त्यांनी सूचना केलेल्या आहेत. सभापती महोदय, आजही महाराष्ट्रामध्ये 50 ते 60 हजार शिक्षकांची भरती करणे गरजेचे आहे. जवळ जवळ 9445 कोटी रुपयाचा खर्च शिक्षण खात्यावर होत आहे. शिक्षकांना पगार मिळू नये असे कोणीही म्हणणार नाही. आजही माध्यमिक आणि कायम विनाअनुदानित तत्वावर चालणा-या 2451 शाळा आहेत, 2130 प्राथमिक शाळा आहेत आणि 1496 उच्च माध्यमिक शाळा आहेत. अजूनही कायम विनाअनुदानित तत्वावर शाळा मिळाव्यात यासाठी 4 ते 5 हजार अर्ज आलेले आहेत.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत पुरके ....

या संस्थांनी ॲफेडेव्हीट करुन दिले की आम्ही भविष्यात कधीही शासकीय अनुदान मागणार नाही. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र लिहून देऊन सुध्दा शाळा मागणे सुरु आहे. माझी हात जोडून शिक्षक बांधवांना विनंती आहे की, जी संस्था कायम विनाअनुदान तत्वावर असेल त्या संस्थेमध्ये प्रवेश करावयाचा किंवा नाही हे आमच्या शिक्षक बांधवांनी ठरवावे. अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून माननीय सदस्यांनी 2-3 महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. एक तर शिक्षकांची होणारी पिळवणूक थांबवावी. कायम विनाअनुदानित संस्थांवर शासनाचा अंकुश असावा. त्यानंतर पालकांकडून प्रचंड मोठ्या प्रमाणावर पैसा गोळा केला जातो. त्याच्यावरही आपला अंकुश असावा. या संस्थांचे ऑडीट व्हावे अशीही अपेक्षा आपण व्यक्त केली. ज्या संस्थांमध्ये नफेखोरबाजीपणाने पैसे जास्तीत जास्त उकळले जात असतील, शिक्षकांचे आर्थिक आणि मानसिक शोषण होत असेल तर अशा संस्थांची आपण प्रत्यक्ष तक्रार करणे आवश्यक आहे. जरी कायम विनाअनुदानित तत्वावर या संस्था असल्या तरी सरकारने मान्यता दिलेल्या संस्था आहेत. जर अशा प्रकारची बदमाषी किंवा जिवघेणी पिळवणूक करीत असेल तर शिक्षक-पालक संघाने तक्रार करावी. जर कारवाई केली नाही तर आम्हाला संधी द्यावी. दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी असा उपस्थित केला की, कायम विनाअनुदानित तत्वावर शाळा देण्याचे जे धोरण आहे ते सरकार रद्द करणार आहे काय ? याबाबत मी सांगू इच्छितो की, ज्या क्षणी राज्याची आर्थिक स्थिती सुधारेल त्यावेळी या संस्थांना अनुदान देण्याबाबत शासन निश्चित विचार करील. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र शासनाने कोर्टात दाखल केले आहे. तूर्त शासनाला हे धोरण रद्द करता येत नाही. ज्यावेळी राज्याची आर्थिक स्थिती सुधारेल त्यावेळी या धोरणामध्ये बदल करण्याबाबत शासन निश्चित विचार करील. आम्ही शाळा देण्याबाबत जाहिरात दिली होती. काही संस्थांना आम्ही मान्यता देवू. परंतु पुढच्या वर्षी विनाअनुदानित तत्वावर शाळा द्यावयाच्या किंवा नाहीत याचा शासन गांभिर्याने विचार करील. दुसरा प्रश्न असा उपस्थित करण्यात आला की, शिक्षण सेवक हे पद रद्द करण्यात यावे. शासनाची आर्थिक स्थिती बरोबर नसल्यामुळे आणि हजारो पदे भरणे क्रमप्राप्त असल्यामुळे शिक्षण सेवकाचे पद निर्माण करण्यात आले. याबाबत अनेक शिक्षक बांधव कोर्टात गेले. परंतु कोर्टाने सुध्दा शासनाची भूमिका लक्षात घेतली. शिक्षण सेवकाचे पद तूर्त रद्द करता येणार नाही. परंतु शिक्षण सेवकाची तीन वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर त्यांची सेवा निश्चितपणे नियमित केली जाईल तशी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंत पुरके ....

शासनाने हमी दिलेली आहे. त्यामुळे तूर्त हे पद रद्द होणार नाही. संच मान्यता आणि वैयक्तिक मान्यता हे धोरण आहेत. या संदर्भात एक जी.आर. निघालेला आहे तो काळजीपूर्वक वाचावा. सर्वोच्च न्यायालयाने टी.एम.ए.ॲण्ड पै फाऊंडेशन व्हर्सेस जो निर्णय दिलेला आहे त्या संदर्भात सरकार विचार करीत आहे. परंतु तूर्त या संदर्भात आश्वासन देणे योग्य होणार नाही. परंतु संच मान्यता आणि वैयक्तिक मान्यता देता येईल किंवा कसे याबाबत जोपर्यन्त आपण त्यांना अनुदान देत नाही आणि कोर्टाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे ज्या संस्थेने जेवढी वित्तीय शक्ती खर्च केलेली असेल त्या संदर्भात ती संस्था स्वतंत्र असेल अशा प्रकारचे निर्देश असल्यामुळे या बाबीवर चर्चा करुनच निर्णय घ्यावा लागेल. अनेक संस्थांमध्ये शिक्षकांचे शोषण होते आणि एका संस्थेमध्ये तर पिस्तुल खरेदी केले असे जे सन्माननीय सदस्यांनी सांगितले ती बाब अतिशय गंभीर आहे. एखाद्या शिक्षकाने जर तक्रार करुन ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली तर निश्चितच शासन या संस्थेची मान्यता काढून घेतल्याशिवाय राहणार नाही. एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माझे दोन-तीन स्पेसिफिक प्रश्न आहेत. गुणवत्ता विकास अभियानाचे जे काम आपण अनुदानित शाळांमध्ये सुरु करीत आहोत. तेच काम कायम विनाअनुदानित शाळांमध्ये शासन सुरु करणार आहे काय ? तर ख-या अर्थाने तेथे काय होत असते ते आपल्याला समजू शकेल. ब-याच ठिकाणी संस्था चालकांचे नातेवाईक मुख्याध्यापक असतात. नवरा संस्थेचा अध्यक्ष असेल तर बायको मुख्याध्यापक असतो आणि बायको जर संस्थेची अध्यक्ष असेल तर नवरा मुख्याध्यापक असतो. तर सरकारला माझा प्रश्न असा आहे की, कायद्याने संस्थाचालकांच्या कुठल्याही नातेवाईकाला किमान मुख्याध्यापक किंवा सुपरवायझर या पदावर सामावून घेता येणार नाही अशी तरतूद करता येईल काय ? त्याचे कारण असे आहे की, या मुख्याध्यापकांना काहीच शिकविता येत नाही. हे दोघेही मिळून शिक्षकाची पिळवणूक करतात. संच मान्यता आणि वैयक्तिक मान्यता हाही महत्वाचा विषय आहे. विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांची कायम स्वरुपी सेवाज्येष्ठता सेवापुस्तक त्याची शैक्षणिक गुणवत्ता पाहणे आवश्यक आहे. त्यातील चांगल्या शिक्षकांना सरकार पुरस्कारासाठी बोलाविणार. त्याची रचना कुठेच नाही. या शाळांतील शिक्षकांना सरकार कच-यासारखी वागणूक देत आहे.

....3.

श्री.श्रीकांत जोशी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या ग्रामीण भागातील पर कॅपिटा उत्पन्न अत्यंत कमी आहे, जेथे सातवीपर्यन्त जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत, जे खेडेगाव आहे, त्याठिकाणी सहा हजार रुपये वार्षिक उत्पन्न नाही...

यानंतर श्री.पी.खर्चे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

अशा भागातील लोक फी कशी देऊ शकतात ? म्हणून ज्या भागातील उत्पन्न कमी आहे अशा ठिकाणी ज्या चांगल्या संस्था आहेत त्यांना किमान वार्षिक भेट म्हणून कॅश इन ग्रँट म्हणून देण्याबाबत विचार करावा. मी सॅलरी ग्रँट म्हणत नाही कारण इतर संस्थांच्या बाबतीत ते अडचणीचे होईल म्हणून अशा संस्था तग धरण्याच्या दृष्टीने असा काही तरी निर्णय आपल्याला जिल्हावाईज निकष लावून घेता आला तर जरुर घ्यावा. नाही तर काय होते की मराठवाडयातील दोन कोटी लोकसंख्येपैकी 45 लाख लोकसंख्येच्या भागात आठवीनंतरचे शिक्षण लोकांना मिळेनासे होईल. ज्यांचे उत्पन्न जास्त आहे ते श्रीमंत लोक तालुक्याच्या ठिकाणी जायला लागले आहेत परंतु दुर्गम भागातील लोक, ज्यांचे उत्पन्न कमी आहे अशा भागासाठी तरी आपल्याला वर्षातून काही तरी प्रमाणात व या संस्था टिकविण्यासाठी कॅश इन ग्रँटच्या स्वरुपात मदत करण्याबाबत विचार करावा लागणार आहे, तसा निर्णय शासन घेणार काय ?

प्रा. वसंत पुरके : महोदय, कायम विना अनुदान तत्वावरील संस्थांना गुणवत्ता विकासाचे तत्व लागू करणार काय हा महत्वाचा मुद्दा आहे व त्यासंदर्भात मी स्वत: गांभीर्याने विचार करीन. कारण शिक्षण हे सर्व ठिकाणी सारखेच आहे, त्यामध्ये दुजाभाव असता कामा नये, तूम्ही किती पैसे खर्च करतात हा भाग महत्वाचा नाही. मागील वर्षी सुध्दा खाजगी माध्यमिक शाळांमध्ये हा कार्यक्रम आम्ही लागू करणार होतो परंतु परीक्षा जवळ आल्यामुळे ते करणे शक्य झाले नाही, परंतु पुढील वर्षापासून हा निर्णय आम्ही लागू करणार आहोत. त्याचप्रमाणे संस्थाचालकाची पत्नी असो अथवा भाऊ असो त्यांच्यापैकी कोणी जरी मुख्याध्यापक अथवा महत्वाच्या पदावर राहत असेल तर ते बरोबर नाही. कारण हजारो मुलांच्या आयुष्याच्या बरबादीची प्रक्रिया या ठिकाणाहूनच सुरु होऊ शकते. म्हणून गुणवत्तेच्या संदर्भात मग ते नातेवाईक असोत अथवा कोणीही असोत A man must be reported on account his merit. कायम विना अनुदानित तत्वावरील संस्था असोत अथवा अनुदानित संस्था असोत अपॉइंटिंग ऑथॉरिटी हया संस्थाच असल्यामुळे गुणवत्ता ही महत्वाची असते. यासंदर्भात उच्च शिक्षणाच्या बाबतीत ज्याप्रमाणे विद्यापीठाची निवड समिती असते ते तत्व जर लागू करता आले तर हा प्रश्न शिथील होऊ शकतो. त्याचप्रमाणे कायम विना अनुदानित तत्वावरिल संस्थांमध्ये जे शिक्षक डिव्होशन आणि डेडिकेशनने डयुटी करतात त्यांचाही

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके .....

सन्मान व्हावा, त्यांच्या गुणवत्तेची बूज राखणे हे शासनाचे कर्तव्यच आहे यासंदर्भात शासन गांभीर्याने विचार करणारच आहे. ज्या ठिकाणी शाळा आहेत परंतु त्या भागातील उत्पन्न मात्र दहा हजारापर्यंतच असेल अशा प्रकारे शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या भागात सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे धोरण स्वीकारणार काय असा प्रश्न विचारला त्याबाबत मला सांगावयाचे आहे की, अशा भागासाठी शासनाने सेतू शाळा, सावित्रीबाई फुले शाळा, राजीव गांधी शाळा, वस्ती शाळा अशा वेगवेगळया प्रकारच्या शाळा सुरु केलेल्या आहेत, जेणेकरुन शिक्षणापासून कोणीही वंचित राहता कामा नये, पण काही शाळा जर दुर्लक्षित असतील तर त्यांचाही प्रकर्षाने विचार करण्यात येईल, असे मी आश्वासन देतो.

तालिका सभापती (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : सभागृहासमोरील कामकाज संपलेले आहे. आता सभागृहाची बैठक स्थगित होत असून सोमवार दिनांक, 20 मार्च, 2006 रोजी दुपारी 2.00 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 48 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 20 मार्च, 2006 च्या दुपारी 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही